१२६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्रं. ३५९



REFBK 0014272
REFBK-0014272

# जे देखी साठविले

लीलावती भाग

[illegible]

[illegible]

१०·२·'५९

अं.२११.

३५९

© नागविदर्भ प्रकाशन, अमरावती

पहिली आवृत्ती
श्रीशिवराज्याभिषेक शके २९१
१५ ऑगस्ट १९६४

प्रकाशक
पुं. ना. देशमुख
नागविदर्भ प्रकाशन
अमरावती

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे २

•

## अर्पण पत्रिका

मी आयुष्यात खूप काही बघावं करावं
असं ज्यांना नेहमी वाटत असे
त्या माझ्या
कै० वडिलांच्या
पवित्र स्मृतीस.

•

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...२७८७० ...... दि: ...
क्रमांक ...२७४९ ...... नों दि. २८।९।६९

# ' जे नेत्री—' च्या निमित्ताने

' जे नेत्री साठविले ' हे नाव आपल्या प्रवासवर्णनाच्या पुस्तकाला सौ. लीलाबाई भागवत यांनी विनयाने दिले आहे असेच म्हटले पाहिजे; कारण, पाहिले ते जसेच्या तसे त्यांनी या पुस्तकात दिलेले नाही. तो केवळ वृत्तांत झाला असता, ललितलेखन झाले नसते. इटली, फ्रान्स, इंग्लंड, स्वित्झर्लंड वगैरे देश त्यांनी कलावंतांच्या दृष्टीने पाहिले आणि प्रवासातले अनुभव त्यांनी संवेदनशील अंतःकरणाने घेतले. मुलांसाठी छान छान गोष्टी आणि कविता त्यांनी सोज्ज्वळ भाषेत लिहिल्या आहेत. त्याच सोज्ज्वळ भाषेत त्यांनी पाहिलेल्या सृष्टिसौंदर्याचे आणि घेतलेल्या अनुभवांचे वर्णन इथे केले आहे. यामुळेच हे एक सुरेख, सोज्ज्वळ प्रवासवर्णन झाले आहे.

सूर्यास्त होत असता वर झेप घेत असलेल्या विमानातून दिसणाऱ्या दृश्यांचे हे रेखीव वर्णन पहा : '...सूर्यास्ताचे सोनेरी किरण मिसळून सर्व आकाशभर इंद्रधनुष्याचे रंग पसरले होते. विमानाचे पंख त्या उजेडात लालसर दिसत होते. पंखांवरच्या भोकांतून बाहेर पडणाऱ्या निळ्या ज्वाळा फारच विलोभनीय वाटत होत्या. थोडा वेळ थांबलेला पाऊस आता पुन्हा पडू लागला होता. मला गंमत वाटली ती काचेच्या तावदानावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबांची. कारण आजवर पाण्याचा थेंब वरून खाली ओघळतो, एवढंच विज्ञानाच्या अभ्यासाने आणि नेहमी दिसणाऱ्या अनुभवाने माहीत होतं. पण या थेंबांची काही उफराटी तऱ्हाच दिसत होती. हे थेंब वरून खाली पडायचे नाहीत. काचेवर एकदम थेंब दिसायचा आणि सरकन तिरक्या रेषेत खालून वर जायचा. सात आठ थेंबांची

मिळून साखळी झाली तर ती एखाद्या सापसुरळीसारखी सुर्कन् तावदानावर फिरायची, भिंतीवर चढणाऱ्या नानेटी-सारखी....'

इटलीसारख्या अनोळखी परदेशात पाऊल टाकल्याबरोबर तिथल्या लोकांचे एक वैशिष्ट्य त्यांनी किती झट्कन् ओळखले ते सांगण्यासारखे आहे. त्या म्हणतात, '...एक गोष्ट मात्र फार फायद्याची आहे. या इटालियन लोकांची भाषा येत नसताना, बोलण्याचा अर्थ समजण्याच्या दृष्टीने ती फारच उपयोगी पडली. कारण इटालियन लोक अगदी तोंड भरून बोलतात. बोलताना प्रत्येक शब्दार्थाचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटतो आणि तदनुषंगाने हातवारे अगदी मुक्त हस्ताने होतात. अर्थात् त्यामुळे ताकास तूर लागू न देणाऱ्या इंग्रज लोकांशी बोलताना इंग्रजी येत नसेल तर जी पंचाईत होईल ती इथे होत नाही. तावरून ताकभात लगेच ओळखता येतो....'

इटलीत भेटलेल्या लिलिया–विनोलिया काय, लंडनमधली फिलोमिना काय, जर्मनीतली हेला काय किंवा स्वित्झर्लंड-मधली बेटी काय, लेखिकेला भेटलेल्या या मुली काही तासात तिच्या जिवाभावाच्या मैत्रिणी झाल्या आणि स्थल-कालातीत माणुसकीचा तिला साक्षात्कार झाला. हा साक्षात्कार तिने मोठ्या जिव्हाळ्याने रंगविला आहे.


अशा गोष्टींनी रंगलेले हे प्रवासवर्णन वाचकांना खात्रीने आवडेल.

**अनंत काणेकर**

# जे नेत्री साठविले

लीलावती भागवत





# जे नेत्री साठविले

१.

परदेशच्या प्रवासाबद्दल बरीच भवति न भवति होऊन अखेर प्रवासाला जाण्याचा दिवस उगवला. संध्याकाळी ६ वाजता विमान रोमला जाण्यासाठी सुटणार होतं. वास्तविक हा माझा पहिलाच विमान-प्रवास. आणि तोही इतक्या दूरचा. ज्या देशात जायचं तिथलीही काही माहिती नाही, आणि बरोबरच्या मंडळींची विमानतळावर करून दिलेली काही क्षणांइतकीच जुनी ओळख. त्यामुळे माझं मन जरा अस्वस्थच झालं होतं. घरच्या मंडळींचा निरोप घेऊन मी विमानात चढले. विमान अगदी पिसासारखं हलकं होऊन वर उडालं, पण माझं मन मात्र त्या विमानाला साथ न देता जड होऊन विमानाच्या आसपासच रेंगाळत होतं. अखेरीस दिवाळीच्या पणत्यांनी सुशोभित घरांसारखी दिसणारी मुंबईची रांगोळी दृष्टीआड झाली आणि मी विमानाच्या खिडकीच्या काचेला डोळे लावून उगीचच काहीतरी बघण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागले. आणि नकळत फार मोठा ठेवा माझ्या नजरेसमोर तरळू लागला.



सूर्यास्ताचे सोनेरी किरण मिसळून सर्व आकाशभर इंद्रधनुष्याचे रंग पसरले होते. विमानाचे पंख त्या उजेडात लालसर दिसत होते. पंखांवरच्या भोकातून बाहेर पडणाऱ्या निळ्या ज्वाला फारच विलोभनीय वाटत होत्या. थोडा वेळ थांबलेला पाऊस आता पुन्हा पडू लागला होता. मला गंमत वाटली ती काचेच्या तावदानावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबाची. कारण आजवर पाण्याचा थेंब वरून खाली ओघळतो एवढंच विज्ञानाच्या अभ्यासाने आणि नेहमी दिसणाऱ्या अनुभवाने माहीत होतं. पण या थेंबांची काही उफराटी तऱ्हाच दिसत होती. हे थेंब वरून खाली पडायचे नाहीत. काचेवर एकदम थेंब दिसायचा आणि सर्रकन् तिरक्या रेषेत खालून वर जायचा. सात, आठ थेंबांची मिळून साखळी झाली तर ती एखाद्या सापसुरळीसारखी सुर्रकन् तावदानावर फिरायची, भिंतीवर चढणाऱ्या नानेटीसारखी.

आता पाऊस थांबून आकाश स्वच्छ झालं होतं. डोळ्यांसमोर सतत एकच ढग दिसत असल्यामुळे आपण स्थिर आहोत की काय असा संभ्रम निर्माण होत होता. पण कानात घुमणारा वाऱ्याचा मंद आवाज आणि विमानाची मधूनच होणारी किंचित हालचाल यांवरून गती जाणवत होती तेवढीच. एखाद्या गुदामातल्या कापसाच्या गठ्ठ्यांसारख्या शुभ्र ढगांवरून संथपणे विमान आम्हांला घेऊन जात होतं. आणि मी धुंदपणे एकटक बाहेर बघत राहिले होते—

आणि मग रोमला उतरेपर्यंत वाटेत दोनच विमानतळ लागले. एक कराचीचा आणि दुसरा तेहरानचा. कराचीला विमान थांबलं, आम्ही सगळी उतरलो आणि पुन्हा विमानात बसलो. मला काहीच जाणवलं नाही.

पण तेहरानचा विमानतळ आला, तेव्हा पहाटेचा दोन वाजण्याचा सुमार झाला होता. सगळीकडे लख्ख चांदण्या चमचम करीत होत्या. पहाट होत आल्याने त्या थोड्या निस्तेज वाटल्या तरी आकाश इतकं निरभ्र होतं, आणि तेहरानचा विमानतळ इतका मोठा होता की चौफेर नजर टाकली तर आकाश अगदी ओठंगून उभं आहे असं वाटत होतं.

पहाटेचा गार वारा अंगाला जरा झोंबत होता खरा; पण मी कोट अंगात चढवला नाही. मला थंड, मोकळा वारा तोंडावर घ्यायला नेहमीच आवडतो. असा वारा सतत आठ दिवस अनुभवायला मिळाला तर एखाद्याचं जन्माचं दुखणं जाईल अशी माझी एक कल्पना आहे. त्या झोंबणाऱ्या वाऱ्याची शिरशिरी अंगात भिनत असताना आम्ही तेहरानच्या विमानतळावर चहा पिण्यासाठी म्हणून शिरलो.

आणि मी भारताची हद्द ओलांडली याचा त्याच क्षणी मला प्रत्यय आला. मला चहाची अगदी खरीखुरी हुक्की आली होती. पण तेहरानच्या विमान-तळावर असलेल्या मुलीला तीन चार वेळा समजावून सांगितल्यावर चहा मिळाला. चहाची चव काही विचित्र होती. इतर सगळेजण कोराच चहा पीत होते, पण मला मात्र दुधाशिवाय चहाचा घोट घशाखाली उतरेना. 'दूध हवंय्!' हे दोनच शब्द, पण तिथल्या वेटरला कसे समजवायचे? भाषेची अडचण आणि तिचं सामर्थ्य या वेळी जाणवलं. पण कसंतरी करून दूध घातलेला आणि तरीही चहाखेरीज करून दुसरी कसलीही विचित्र चव असलेला चहा मी चवीचवीनं घेतला. कारण चहाचा सर्वांत मोठा गुण गरमपणाचा, तो तरी निदान होता. जरा पोटात ऊब आल्यावर इकडे तिकडे बघितलं. आणि विमानतळावरच्या मुली–मार्गदर्शिका आणि वेटरमंडळी यांचे चेहरे फारच देखणे असल्याचं दिसून आलं. निव्वळ गोरी कातडी नव्हे, तर चेहरा अगदी नाकीडोळी नीटस. शिवाय हसतमुख.

तेहरानहून निघण्याची सूचना झाली आणि पुन्हा विमानात बसल्यावर आपण आता परदेशच्या जवळ जवळ येत आहोत हे जाणवलं. पहाटेचे

३।। वाजले होते. छानदार ऊब आली होती. पांघरूण घेऊन सगळे विसावले होते. पण मला झोप येईना. खिडकीच्या काचेतून मी पुन्हा पाहू लागले. समोर दिसले सप्तर्षी. या सप्तर्षींनी सतत डोळ्यांसमोर राहून अगदी रोमपर्यंत माझी सोबत केली.

मी किती वेळ अशी धुंदीत नक्षत्रांकडे बघत राहिले असते कोण जाणे! पण इतक्यात विमानातले दिवे लागले. सकाळ झाली. ब्रेकफस्टची एकच गड-बड उडाली. पण यानंतरही पुन्हा मला खिडकीच्या काचेने लोहचुंबकासारखं आकर्षून घेतलं. ब्रेकफस्टनंतर थोड्याच वेळात रोम येणार हे जाहीर झाल्यामुळे सगळ्यांची एकच गडबड उडाली होती. कुणी आळस देत होते आणि आखडलेले हातपाय मोकळे करीत होते; कुणाचे डोळे अजूनही पेंगत होते. पण ते उठण्याची धडपड करीत होते. एकमेकांच्या नावागावाची अगदी निरोप घेताक्षणी माहिती करून घेण्याची कुणाकुणाला हुक्की आलेली दिसत होती. पण माझे डोळे मात्र काचेला चिकटले होते.

कारण खाली फारच सुंदर दृश्यं दिसत होती. मी आमच्या रोह्याच्या धाविराच्या डोंगरावरून सारं रोहं गाव कितीदातरी पाह्यलं आहे. पर्वतीवर चढून सगळ्या पुणे शहराचं अवलोकन केलं आहे. मलबारहिलवरून कितीदा तरी मुंबईचं विहंगम दृश्य नजरेखालून घातलं आहे. पण आता रोम शहर जवळ येऊ लागल्यामुळे विमानाच्या काचेतून दिसणाऱ्या दृश्याशी या कशाचीच मला तुलना करता येईना. ते अगदी वेगळं होतं. धुंद करणारं होतं.

विमान हळूहळू खाली येत होतं. आता ढग एखाद्या चित्रकाराने चितारल्या-सारखे संथ, निःस्तब्ध दिसत होते. खाली शेतं, घरं, रस्ते, गावं दिसू लागली. ही रांगोळी विलक्षण खरीच. विजेच्या तारांसारखे पांढरे नागमोडी आणि सरळ रस्ते. मधूनच शेतांवरून, घरांच्या छपरांना हलूच स्पर्श करून उडणारा एकाकी ढग! सगळं विलोभनीय होतं. ढग नाहीसे झाले की ही खालची रांगोळी काचेच्या चौकटीत बसवलेल्या भूगोलाच्या प्रदर्शनातल्या नकाशासारखी वाटे. मध्ये ढग आले की वाटे, आपण पाण्याच्या तळाशी असलेलं दृश्य पाहत आहो. शेतांच्या आणि झाडांच्या हिरव्या रंगात सात, आठ तरी छटा होत्या. मधूनच दिसणारे पिवळसर जमिनीचे तुकडे चटया पसरल्यासारखे भासायचे. शेतं वस्त्रगाळ हिरवा रंग भरल्यासारखी– आम्ही

पुण्याला दिवाळींत गालिचे काढताना वस्त्रगाळ रंग भरीत असू तशी. तर झाडं बोटानं रखरखीत रांगोळी टाकून रंगवल्यासारखी.

मुंबईच्या गजबजलेल्या रस्त्यांची, खुराड्यासारख्या घरांची आणि गर्दीची सवय झालेली माझी दृष्टी हे निसर्गसौंदर्य आधाशासारखं पिऊन घेत होती. आणि या सौंदर्यपानाच्या धुंदीतच माझा पहिला-वहिला विमानप्रवास न कळता संपला.

● ●

आम्ही रोमच्या विमानतळावर पोचलो त्या वेळी माझं मनगटावरचं घड्याळ जरी ११–२० ही वेळ दाखवीत होतं तरी रोम शहरात मात्र नुकतंच तांबडं फुटू लागलं होतं. विमानतळावरच्या घड्याळात सकाळचे फक्त ७ वाजले होते. एक सकाळ विमानात झाली. त्याच दिवशीची दुसरी सकाळ शहरात! एकंदर १८ तासांचा विमानप्रवास इतक्या झर्रकन् आणि नकळत झाला की सर्वस्वी नवख्या असणाऱ्या इटलीच्या वातावरणाशी समरस होण्याइतकी मनाची तयारीच झाली नव्हती. कारण दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचारही मनात न येण्याइतकं विमानातून दिसणाऱ्या सौंदर्यानं मन भारावून टाकलं होतं.

पण विमानतळावर उतरून रोमच्या जमिनीवर पाऊल टाकल्याबरोबर एक विलक्षण संवेदना जाणवू लागली. या देशात आपलं स्वागत कसं होईल, बरोबरच्या मंडळींत मराठी बोलणारं कुणीच नसल्यानं आधीच थोडा परकेपणा वाटत होता तो परकेपणा या आणखीच अनोळखी देशात वाढेल की काय अशी एक अस्पष्ट चिंतेची छटा मनाला व्यापून टाकीत होती. आणि त्याबरोबर, एक प्रकारे दोष गणल्या जाणाऱ्या माझ्या बडबडेपणाचं अशा वेळीं गुणात रूपांतर होईल आणि मी सर्वांशी जमवून घेऊ शकेन अशी एक खात्रीची जाणीवही दिलासा देत होती.

इतक्यात आमच्या स्वागतासाठी आलेल्या इटालियन सरकारच्या प्रतिनिधीने एकदम माझ्याजवळ येऊन म्हटलं 'बोना जिओर्नो सिनोरा बॅजवत!' मी क्षणभरच गोंधळले. पण तेवढ्यात मी अंदाज बांधला की 'बॅजवत' हे माझ्या नावाचं इटालियन रूप तयार झालेलं असावं आणि आपल्याशी

बोलणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावरचे हावभाव तो आपले स्वागत करीत आहे असं सांगताहेत हे निश्चित! तेव्हा मीही तोंडभर हसून तेच शब्द पटकन् उचलून म्हटलं 'बोना जिओर्नो सिनोरा!'

आणि इथूनच घोटाळ्याला सुरुवात झाली. अर्धे वाक्य बरोबर होतं. कारण 'बोना जिओर्नो' म्हणजे 'गुड मॉर्निंग'. पण मी गडबडीत 'सिन्यॉरे' म्हणण्याऐवजी बाईशी बोलावे तसे 'सिन्योरा' म्हटलं हे माझ्या नंतर लक्षात आलं तेव्हा तो इटालियन मनुष्य का हसला त्याचा उलगडा झाला.

पण त्या लोकांनी जणू हे घोटाळे गृहीतच धरले असावेत. एक गोष्ट मात्र फार फायद्याची आहे या इटालियन लोकांची. भाषा येत नसताना, बोलण्याचा अर्थ समजण्याच्या दृष्टीने ती फारच उपयोगी पडली. कारण इटालियन लोक अगदी तोंड भरून बोलतात. बोलताना प्रत्येक शब्दार्थाचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटतो आणि तदनुषंगाने हातवारे अगदी मुक्तहस्ताने होतात. अर्थात त्यामुळे ताकास तूर लागू न देणाऱ्या इंग्रजी लोकांशी बोलताना इंग्रजी येत नसेल तर जी पंचाईत होईल ती इथे होत नाही. ता वरून ताकभात लगेच ओळखता येतो.

आमच्या स्वागतकर्त्यांने आम्हांला एका मोठ्या आलिशान हॉटेलजवळ नेऊन आरामगाडीतून उतरवलं. विमानतळावरून गावात येईपर्यंत दोन्ही बाजूंनी शेतं फुललेली होती. छोटी छोटी लाल कौलांची घरं मधूनच डोकवायची. अंगणात लाल, पिवळे भडक रंगाचे कपडे घातलेली मुलं किलबिलाट करीत असलेली दिसली. आसपासची माहिती आमचा वाटाड्या आम्हाला देत होता. आता तो त्याला येत असलेल्या इंग्रजीत बोलत होता. ते समजायला कठीण नव्हतं खरं; पण या–इतिहासाची टिपणं करण्यायोग्य सांगितलेल्या—माहितीपेक्षा मी प्रत्यक्ष दृश्य माहितीच डोळ्यांनी टिपून घेत होते.

हॉटेल पॅसिफिकमध्ये उतरल्याबरोबर प्रथम तिथल्या मॅनेजरने आमचे पासपोर्ट मागून घेतले. कारण आम्ही इटलीत आल्याची नोंद करायला हवी होती. ही पद्धत मग नंतर प्रत्येक देशात गेल्यावर माझ्या अंगवळणी पडली. पण प्रथम पासपोर्ट देण्याबद्दल मी साशंकच झाले. कारण परदेशाचा दौरा

करून अनुभवी बनलेल्या आमच्या शरद भावोजींनी मला बजावलं होतं ना— ‘ वहिनी, आपला पासपोर्ट संभाळा हं ! तो कधीही कोणाला द्यायचा नाही एवढं लक्षात ठेवा ! ’ पण याचबरोबर ‘ शहर–प्रवेशाच्या नोंदीसाठी तो आपल्या निवासस्थानीसुद्धा द्यावा लागतो आणि सुरक्षितपणे परत मिळतो ’ हे त्यांनी सांगितलं नाही.

म्हणून मी सुरुवातीला काय करावं यासंबंधी विचार करीत होते. हॉटेलच्या मॅनेजरने माझी अडचण ओळखली असावी. त्याने आपल्यापरीने मला पासपोर्टची ही भानगड समजावून सांगितली. तो सांगत असताना मी त्याच्या चेहऱ्याकडे पाह्यलं. ठेंगणा, बुटका होता तो. डोक्यावर मोठ्ठं थोरलं टक्कल होतं. का कोण जाणे, पण टक्कल असणारी माणसं प्रेमळ असतात असा माझा समज आहे खरा आणि त्याच्या बोलण्यावरून तो सांगत आहे ते संपूर्ण सत्य असल्याची माझी खात्री पटल्याने मी माझा पासपोर्ट त्याच्या हवाली केला. त्याबरोबर खूष होऊन एक मोठी समस्या सुटली म्हणून तो आनंदाने हसून म्हणाला, ‘ ग्रात्सीए ’ आणि मी दुसरा इटालियन शब्द शिकले. ग्रात्सीए म्हणजे ‘ आभारी आहे. ’

आम्ही एकंदर अकराजण होतो. सर्व एकमेकांचे मित्र किंवा इतर कोणत्या तरी नात्याने परिचित होते. मी मात्र अगदी एकटी होते. इथे राहण्याची व्यवस्था कशी काय असेल असा विचार माझ्या मनात आला. इतक्यात मॅनेजर म्हणाला, ‘ सिन्योरा ब्रेजवट, आपल्यासाठी १०२ नंबरची सिंगल रूम राखून ठेवली आहे. आपलं सामान कोणतं ? ’

मुंबईच्या इटालियन प्रतिनिधीने सर्व गोष्टींचा नीट विचार करून आमची इतकी व्यवस्थित आणि उत्कृष्ट सोय केल्याबद्दल मी मनोमन त्याचे आभार मानले आणि माझं सामान हॉटेलच्या नोकराला दाखवून लिफ्टमध्ये चढले.

मला दिलेली खोली पाचव्या मजल्यावर एका कडेला होती. फारच सुंदर होती–लहानशी पण व्यवस्थित. मी खोलीत गेले आणि माझ्या पाठोपाठ तिथल्या मोलकरणीने येऊन माझा कोट, छत्री, बॅग आणि इतर सर्व सामान इतक्या झटपट लावलं की मी चकित झाले. तसा प्रवासाचा शीण आला नव्हताच. तरीही नळातून येणाऱ्या गरम पाण्याने स्नान करून एक झोप काढायचं मी ठरवलं. तरीही जेमतेम आंघोळ करून तयार होते तेवढ्यात खोलीतली

टेलिफोनची घंटा खणखणली. मॅनेजरसाहेब ब्रेकफस्टसाठी खाली बोलवीत होते. ही या दिवशीची दुसरी ब्रेकफस्ट. [कारण खऱ्या ब्रेकफस्टच्या वेळेला आम्ही विमानात होतो. पण रोममध्ये आता सकाळ होती ना ! ब्रेकफस्टनंतर आमच्याबरोबर असलेले दोघे पारेख बंधू, मी आणि सरोजिनी गांगुली, आम्ही चौघेजण बाहेर पडलो. आम्हांला पोचल्याची पत्रे टाकायची होती. पोस्ट फार लांब नव्हते. पण पोस्टात गेलो तर दोन बायका मोटमोठे झाडू घेऊन पोस्ट ऑफिस धूत होत्या. त्या दिवशी पोस्टाला सुट्टी होती. आता तिकिटे कुठून घ्यायची ? बरं, एअर मेलसाठी किती तिकिटं लागतात ? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं...विमान, जहाज या सर्व गोष्टींच्या साभिनय वर्णनाने केल्यावर 'तबाची'कडे म्हणजे सिगरेट आणि तंबाखूच्या दुकानात पोस्टाची तिकिटं मिळतील इतपत समजलं. विडी-तंबाखूवाल्याकडे पोस्टाची तिकिटं घ्यायला गेलो. पुन्हा भाषेची कसरत करून तिकिटं घेतली, पाचच शब्द लिहून बऱ्याच ठिकाणी पोचल्याची पत्रं टाकली, आणि एक मोठं काम केल्याच्या समाधानात पुन्हा हॉटेलात परत आलो. पण आमच्या अभिनयकौशल्याने दगा दिला हे नंतर समजलं; कारण एअर मेलने न जाता आमची पत्रं साध्या डाकेने जाऊन तीन आठवड्यांनी पोचली. मात्र हे आम्हाला, निदान मला, परत आल्यावर समजलं एवढंच समाधान !

खरी पंचाईत झाली जेवताना. कारण मी संपूर्ण शाकाहारी. तेव्हा माझ्यासाठी फारसे पदार्थ नव्हतेच. त्यातल्या त्यात सुप्रसिद्ध इटालियन पक्वान्न स्पॅगेटी....म्हणजे शेवया, उकडलेल्या भाज्या यांचा मी समाचार घेतला. पण नेहमीच्या सवयीने पाणी मागितलं आणि माझ्या भारतीयत्वाने इथेच दगा दिला. जेवताना साधं पाणी पिण्याची पद्धत तिकडे नसते हे मी तरी लक्षात ठेवायचं की नाही ? मी आपलं सरळ 'वॉटर' म्हटलं आणि त्या इटालियन वेटरने माझ्यापुढे शुभ्र पांढऱ्या पाण्याने भरलेला ग्लास आणून ठेवला. मी अगदी एका घोटात ते पिण्यासाठी, भरलेला ग्लास आधाशासारखा तोंडाला लावला आणि पाण्याऐवजी हलाहल प्राशन केलं. त्या वेटरने माझं बोलणं न समजल्यामुळे 'व्होडका' आणून दिली होती. अगदी पाण्यासारखी शुभ्र पण अतिशय कडक. त्या एका घोटातच माझा घसा असा काही भाजला ! पण नंतर मात्र मी आमच्या प्रेमळ मॅनेजरला सांगितलं आणि मग रोज माझ्या

टेबलावर जेवताना काचेचं लोटीभांडं ठेवलं जाऊं लागलं.

तो दिवस सुट्टीचा म्हणून राखून ठेवलेला असल्याने जेवण झाल्यावर मी दुपारभर वाचीत पडले होते. चांगला आराम केला आणि संध्याकाळीं फिरायला कुठे नेतील, काय काय बघायला मिळेल याचा विचार करीत असतानाच पटकन् डोळे केव्हा मिटले ते समजलंच नाही.

● ७

सकाळीं उठले तर हवा फार चांगली होती. दोन दिवस परदेशच्या मानाने उष्मा जाणवत होता. पण आज अगदी कोवळं ऊन पडलं होतं. वेताची थंडीही होती. त्यामुळे कुठे तरी बाहेर हिंडायला जावं असं वाटत होतं. अंगावर पातळशी शाल पांघरावी, उन्हाची कोवळीं तिरीप अंगावर घेत स्वच्छ मोकळ्या रस्त्याने मनसोक्तपणे हिंडावं असं माझ्या मनानं घेतलं. कामाचा लकडा पाठीशी नाही, अमूकच वेळात घरी परत आलं पाहिजे असं बंधन नाही आणि ‘ अग, घरांत काय बसलीस, चल ना बाहेर ’ असा आग्रह करणारी हवा ! मग मात्र माझ्याच्याने राहवेना. आमच्यापैकी कुणी सोबतीला येणार की काय याची चौकशी केली. पण मुलींपैकी कुणीच बाहेर पडायला तयार नव्हतं. वास्तविक बाकीच्या तिघीजणी माझ्यापेक्षा वयाने लहान होत्या. माझ्यापेक्षा उत्साहाचं वारं त्यांच्यातच भिरभिरायला हवं ! पण त्यांनी बाहेर पडण्यापेक्षा घरीच पांघरूण घेऊन वाचीत पडणं पसंत केलं.

आणि मी एकटीच बाहेर पडले. जाताना सर्व खाणाखुणा लक्षात ठेवायच्या म्हणजे रस्ता चुकायचा नाही याची खूणगाठ बांधली आणि नाकासमोरचा रस्ता सुधारला. खोलीतून बघतांना मला वाटत होतं—हा रस्ता असाच मोकळा लांब-सडक असेल. पण मी दोनतीनशे पावलं गेले असेन नसेन तोच एक भला मोठा चौक लागला आणि मी एका मोठ्या पुतळ्यापुढे येऊन ठाकले. चौफेर बाजार भरला होता आणि रंगीबेरंगी चेहरे आणि माणसं जिकडे तिकडे भिरभिर हिंडत होती. मला बाजारात घ्यायचं काहीच नव्हतं; कारण पैसे फारच थोडे होते. पण दुकानदार जसं म्हणतो ‘ घेऊ नका, पण बघायला काय जातं ? ’ तशाच वृत्तीनं मी दुकानांच्या काचांमधून माल बघायला सुरुवात केली. इतक्या तऱ्हतऱ्हेच्या सुंदर वस्तू होत्या पण किंमतीचा

आकडा पाहिल्यावर जीव दडपूनच जायचा. तिकडे बहुतेक दुकानांतून कपड्यांजवळ, वस्तूंजवळ किंमतीची चिठ्ठीही ठेवलेली असते. एका दुकानात एक छोटीशी बॅग मला फार आवडली. पण किंमत होती ७०० लीरा. मी म्हटलं, बाप रे! एवढीशी वेताची बॅग आणि इतकी किंमत? पण हा विचार करता करताच काहीतरी चुकतं आहे असं मला जाणवत होतं आणि थोड्या वेळात माझ्या ते लक्षातही आलं! हात्तिच्या! आपण उगीचच घाबरलो. इथे इटलीमध्ये लीरा हे एकच नाणं असल्याने शेकड्यात, हजारात आणि लाखात त्याचा हिशेब करावा लागतो आणि तो भला मोठा आकडा पाहून छाती दडपून जाते. पण लीरा म्हणजे असं काय मोठं नाणं?—आपला नवा पैसा म्हणा ना! म्हणजे त्या वस्तूची खरी किंमत—माझं गणित कच्चं असलं तरी—माझ्या हिशेबाप्रमाणे ७०० लीरा म्हणजे अंदाजे ७ रुपये झाली आणि मी ती बॅग विकत घेतली. यापुढे मात्र मी झटपट शून्यांची वजाबाकी करून वस्तूंच्या अंदाजे किंमती ठरवू शकले.

मी अशा तऱ्हेने एकटीच इकडे तिकडे बघत हिंडत होते—माझा अंबाडा, साडी, कुंकू, साध्या चपला यांमुळे तिथल्या लोकांच्या कुतूहलाचा विषय बनत होते. माझ्याकडे इतके लोक पाहत आहेत याची मला शुद्धच नव्हती; इतकी मी त्या विविध वस्तू पाहण्यांत गर्क झाले होते. पण मी एकटी परकी बाई कुठे रस्ता चुकले असेन असं वाटल्यामुळे की काय, एका इटालियन गृहस्थाने मला विचारलं—'इंडियानी!' त्याच्या प्रश्नाने मी एकदम भानावर आले आणि मी उगीचच दुकानं न्याहाळीत बावळटासारखी हिंडते आहे हे लक्षात आल्यावर फारच खजील झाले.

पण त्याच्या प्रश्नाला उत्तर देणं भाग होतं. मी म्हटलं—'इंडियानी!'

त्यानं विचारलं—'आँग्ले? फ्रॉंसे?'

मी सांगितलं—'आँग्ले!'

या संभाषणावरून मी इंडियन आहे आणि मला इंग्रजी येतं हे त्याला समजलं आणि त्याने माझ्याशी इंग्रजीत बोलायला सुरुवात केली. ठेंगणा, ठुसका, गोरापान गृहस्थ होता तो. साधारणपणे पन्नास वर्षांचा असावा. बोलायला खूपच मोकळा. त्याने माझी सगळी माहिती विचारून घेतली. मला सगळा बाजार हिंडून दाखवला. आणि घरी यायचं आमंत्रण दिलं. त्याचं नाव

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ दि: ........

पावलिनी ! लोणी लावलेल्या पावासारखा लुसलुशीत स्वभाव आहे याचा असं मला वाटलं ! का कोण जाणे ! त्याच्या नावातल्या त्या शब्दसाहश्याचा परिणाम असेल तो कदाचित. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मी त्याच्या घरी गेले होते. मात्र त्याची बायको आणि मुलगी त्या वेळीं बाहेरगावी गेल्यामुळे त्यांची ओळख झाली नाही. त्याने माझे खूपच आगतस्वागत केलं. आणि म्हणाला, ' मी इंडियात मुंबईला येईन त्या वेळीं नक्की तुझ्याकडे येईन. पण जेवणार मात्र नाही; काही खाणारही नाही. '

त्याने असं म्हटल्याबरोबर मी माझ्यापुढची बशी दूर करून म्हटलं, ' मग मीही तुमच्याकडे काही खात नाही. तुम्ही कारण सांगा आधी. '

' कारण कसलं आलंय ? पण तुम्ही भारतीय लोक तिखट आणि मसाल्याचे पदार्थ करता असं मी ऐकलं आहे; आणि आम्हांला तर तिखटाचं वावडं ! त्यामुळे मी कसा जेवणार–खाणार तुझ्याकडे ? '

भारतीय अन्नपूर्णेला हे आव्हानच नाही तर काय ? मी त्याला म्हटलं, ' हेच कारण असेल तर तुम्ही मुंबईला माझ्याकडे जरूर या. मी तुम्हाला असे काही पदार्थ करून खायला घालीन की तुमचा गैरसमज नक्की दूर होईल. '

आणि त्यांना असं वचन देऊन मी हे आव्हान स्वीकारलं आहे. भारतीय अन्नपूर्णेची कसोटीची वेळ केव्हा तरी येईल आणि त्या कसोटीत मी पूर्णपणे उतरेन अशी मात्र माझी मनोमन खात्री आहे. आणि ही खात्री थोड्या वेळातच पटली––प्रत्यक्षात आली.

मी बाजारातून हिंडून परत आले तो जेवणाची वेळ झाली होती. माझा गृहिणीधर्म मला काही आज स्वस्थ बसू देईना. आतापर्यंत हॉटेलच्या वेटरशी आणि मुख्य स्वयंपाक्याशी––म्हणजे चेफशी––माझी चांगलीच ओळख झाली होती. त्याला मी विचारलं, ' तुम्ही ' व्हेजिटेबल कटलेट्स ' वगैरे काही बनवीत नाही का ? ' त्याला ' कटलेट्स ' हा पदार्थ माहीत होता, पण ती ' व्हेजिटेबल 'ची कशी बनवायची ते समजेना. तो म्हणाला, ' ती व्हेजिटेबल कशी होतील ? हॅम आणि अंडी घातल्याशिवाय कटलेट्स करायची कशी ? '

' करायची कशी ? थांबा, मी तुम्हांला दाखवते. ' असं म्हणून मी

त्याच्याबरोबर स्वयंपाकघरात गेले.'

एखाद्या अन्नपरिषदेच्या अगर अन्नप्रदर्शनाच्या प्रात्यक्षिकाला जमत असेल त्याच्या चौपट गर्दी माझं कटलेट्सचं प्रात्यक्षिक बघण्यासाठी जमली. मी भराभर त्यांच्याकडून पावाचा आटा, खायचा सोडा, पीठ, साखर, असतील त्या सर्व भाज्या आणि मोहरीचा खार--हा नेहमी तिथे तयार असतो--मागून घेतला. मी भराभर हुकूम सोडीत होते आणि कापलेल्या भाज्या वगैरे माझ्यापुढे येऊन पडत होत्या. मी ते सगळं घेतलं. योग्य मीठमसाला-तिथे मिळाला तोच, म्हणजे मोहरीचा खार वगैरे-घालून पीठ कालवलं आणि दोन थाळ्यांत थापून भट्टीत भाजून काढलं. भट्ट्या अतिशय सुरेख; त्यामुळे अगदी थोड्या वेळात कटलेटसचा थाळा भाजून बाहेर आला. मी त्याच्या शंकरपाळ्यासारख्या वड्या कापल्या आणि चेफच्या हातात थाळा देऊन म्हटलं, '--जा, एकेक वडी वाढून या सर्वांना!'

जेवायला बसलेल्या लोकांना काय चाललं आहे कळेना. पण नेहमी गिळगिळीत स्वयंपाक जेवणारांना तो तिखट नसूनही चमचमीत आणि चविष्ट लागणारा पदार्थ फारच आवडला. भारतीय अन्नपूर्णेने आपलं नांव राखलं आणि त्या लोकांनी त्या पदार्थाला 'लिलियाना डिश' असं नाव ठेवलं. कदाचित यापुढे तो पदार्थ तिथे पुन्हा शिजणारही नाही, पण मी घेतलेला आणि त्या लोकांना दिलेला त्या दिवशीचा अनुभव मजेशीर होता. त्यानंतर रोजच्या मेन्यूपेक्षा एखादा वेगळाच शाकाहारी पदार्थ माझ्या पानात पडू लागला, हा फायदा थोडा का म्हणायचा?

● ●

रोमला आल्यापासून गेले काही दिवस मी एकटीच कुठे कुठे भटकत होते. अजून तसं ठरवून आम्हांला कोणीच हिंडायला नेलेलं नव्हतं. कारण आल्यानंतर लगेच आमची वरात काढणं फारसं योग्य वाटलं नसेल त्या मंडळींना. काही असो, पण नंतर मात्र आम्हांला फार उत्सुकता वाटायला लागली आणि ती ओळखून शिवाय आमच्या कार्यक्रमाच्या अनुरोधाने प्रेक्षणीय स्थळं पाहण्याचा आमचा दौरा सुरू होणार होता. आज आम्हाला रोममधील देवळं आणि शिल्पकृती पाहायला नेणार असं ठरलं. वेळ होती सकाळी आठ वाजता.

आत्तापर्यंतच्या अनुभवावरून आमची व्यवस्था ठेवणारे आणि आम्हाला बाहेर हिंडवणारे लोक आठ म्हणजे आठच्या ठोक्याला हजर होतील ही माझी खात्री असल्याने मी सहा वाजताच उठले होते. कारण उठून गॅलरीत उभं राहून अर्धा तास तरी गार वारा, ताजा वारा तोंडावर घ्यायचा मला नाद लागला होता. आमच्या कंपूपैकी झोपाळू पारेखबंधूंना मी सहा वाजता उठल्याबरोबरच फोन करून जागं केलं होतं. ज्या दिवशी सकाळी लौकर बाहेर जायचं असेल त्या दिवशी त्यांना लौकर उठवण्याची जबाबदारी या दोन पोरांनी माझ्यावर सोपवली होती.

पावणेआठ वाजता मी आंघोळ वगैरे आटोपून खाली येऊन तयार राहिले. हॉटेलमध्ये परवाच्या कटलेट्सपासून माझी बरीच प्रसिद्धी झाल्याने खाली आल्याबरोबर बऱ्याच जणांनी केलेलं ‘ बोना जिओर्नो ’ स्वीकारलं आणि बसची वाट पाहत थांबले. हळूहळू आमच्या बरोबरची मंडळी खाली आली आणि ठीक आठ वाजता दारात येऊन ठेपलेल्या आमच्या बसमधून एक सुहास्यवदना खाली उतरली. आम्हा सर्वांना तिने हसून सांगितलं— ‘ आज आपल्याला रोममधली देवळं आणि शिल्पकृती पाहायला जायचं आहे. ’

आमच्या कार्यक्रमात ‘ प्रेक्षणीय स्थळे पाहणे ’ असं लिहिलेलं असल्याने मी मोठ्या उत्साहाने तयार झाले होते. पण त्या मुलीच्या या घोषणेनंतर जावं की न जावं असा विचार आज प्रथमच माझ्या मनात आला. कारण एरव्ही केव्हाही काहीही बघायला जाताना मी सर्वांत पुढे असे. पण देवळात जाण्याबद्दल माझं मन नेहमीच साशंक असतं खरं. वास्तविक मी कधीच देवळात जात नाही. ‘ आपल्याकडच्या देवळातील घंटानादाने आणि टाळ-दिंड्यांच्या गजराने मन पिसासारखं हलकं होऊन नाचू लागतं आणि परदेशीयांच्या देवळांतील शांत गंभीरतेने मन अंतर्मुख बनतं ’ या दोन्ही गोष्टी मला पटतात, पण तरीदेखील देवळात जाण्यासाठी चटकन माझं पाऊल उचलत नाही खरं !

पण ‘ आपण देश पाहायला आलो आहो आणि कुठल्याहि देवळात भव्यतेचा आणि उदात्ततेचा साक्षात्कार घडतो एवढं सत्य मान्य आहे,

मग फक्त त्याचीच अनुभूती घ्यायला काय हरकत आहे ?' असा विचार करून मी बसमध्ये चढले.

आणि मग मात्र मी गेले नसते तर केवढ्या मोठ्या आनंदाला मुकले असते याची प्रचीती आली. इटलीतील देवळं ही निव्वळ देवस्थानं नसून आपल्याकडील काही मंदिरांप्रमाणेच शिल्पकृतीचे उत्कृष्ट नमुनेही आहेत. भव्यता आणि उदात्तता हे इटलीच्या देवळांचे वैशिष्ट्य. उंच उंच इमारती आणि त्यांत बसवलेल्या भव्य मूर्ती !

आम्हांला प्रथम जायचं होतं सेंट पीटर्स चर्चमध्ये. आमची बस रोमच्या मुख्य रस्त्यांवरून जात होती. रोम म्हणजे राजधानीचं शहर. एखाद्या चित्र-विचित्र गोष्टींच्या संग्रहालयासारखं वाटलं ते मला. 'कोअी भी चीज उठाओ !' म्हणून पुकारा करणाऱ्या फेरीवाल्याच्या गाडीवर 'आहे तरी काय काय ?' असे म्हणत आपण जशा असंख्य वस्तू पाहतो तसं आहे रोम शहराचं. सर्व गोष्टींचं मिश्रण. मधेच एखादी ऐतिहासिक इमारत दिसायची. डावी उजवीकडे भव्य देवळं दृष्टीस पडायची. चौकांतून, देवळांसमोर, पटांगणांतून उभारलेले भव्य सम्राटांचे पुतळे पाहताना मी जुन्या रोमन सम्राटांच्या काळात वावरत आहे असा मला भास झाला. बसमधून उतरून तिथल्या एका पुतळ्याकडे पाहू लागले, तर हा राजा तलवार उपसून पुढे सरसावणार आणि शिंगतुतारीचे आवाज कानावर पडणार अशी काहीशी भावना होऊन मी अगदी अभावितपणे कानांवर हात ठेवले. आणि त्यामुळे आमची मार्गदर्शिका काय म्हणते आहे ते मला ऐकूच आलं नाही. पण मग तिनं जरा मोठ्याने मला नावाने हाक मारली, तेव्हा मी तिच्या मागोमाग गेले. तिने मला दहा पावलां-वर असलेल्या कठड्याजवळ नेऊन खाली वाकून पाहायला सांगितलं आणि मी रोमन सम्राटांच्या काळच्या स्वप्नसृष्टीतून जागी होऊन एकदम विसाव्या शतकात येऊन ठेपले. खाली वाकून पाह्यलं तर अगदी अद्ययावत् इमारती आणि ताशी ५० मैल वेगाने धावणाऱ्या मोटारी दिसू लागल्या. या मोटारींनी रोमन सम्राटांच्या काळच्या स्वप्नसृष्टीतल्या तलवारींची धार बोथट केली आणि शिंग-तुताऱ्यांचे आवाज अस्पष्ट होत गेले.

रोममध्ये प्रेक्षणीय स्थळांची अगदी खेचाखेच आहे. तिथलं जीवन धावतं पण कलात्मक आहे. हे घडवलं तरी कसं ? असा प्रश्न मनाला विचारायला

लावणारं कलेचं दर्शन ठायी ठायी घडत होतं. आम्ही जरा पुढे गेलो तिथे बोर्गेझे गार्डन लागली. या बागेला आता ' जनता–उद्यान ' म्हणतात. १६०० कुटुंबं बसू शकतील एवढी ती विस्तीर्ण आहे. पिंचो गार्डन चौफेर पाईन वृक्षांनी वेढलेली आहे. नाव्होना स्क्वेअर म्हणजे चार देशांच्या चार नद्यांचा प्रतिनिधी. अशा तऱ्हेची ही स्थळं पाहत पाहत आम्ही रोममधल्या प्रख्यात सेंट पीटर्स चर्चच्या भव्य दरवाजाशी येऊन ठेपलो.

सेंट पीटर्स चर्च हे इटलीतील सर्वात मोठं देऊळ. हे चर्च आतून संगमरवरी आहे. मायकेल अँजेलो या शिल्पकाराने १५९० साली बांधलेलं हे चर्च जगातलं सर्वात मोठं चर्च समजलं जातं. याची उंची ४०० फूट आणि रुंदी १३८ फूट आहे. चर्चच्या मधोमध उभी राहून मी वर घुमटाच्या आतल्या बाजूला नजर टाकली तेव्हा मला क्षणभर त्याच्या उंचीमुळं चक्कर आल्यासारखं वाटलं. या चर्चला उजवी-डावीकडे चार चार कमानी आहेत. मी म्हटलं, ' छेः ! या चर्चच्या उंचीची काही कल्पनाच येत नाही. ' तेव्हा आमची मार्गदर्शिका म्हणाली, ' ती बघ, वरच्या घुमटाजवळ, खालून तिसऱ्या कमानीत एका साधूची मूर्ती आहे. दिसली ? '

' हं दिसली ! '

' त्याच्या हातात एक लेखणी आहे ! परमेश्वराने दिलेला शांती, दया, प्रेम यांचा संदेश तो साधू आपल्या लेखणीने लिहीत आहे. ही लेखणी किती लांब आहे–कल्पना कर ! '

' नाही बाई कल्पना येत ! '

' मी सांगते. ही लेखणी ५ फूट लांब आहे आणि त्या लेखणीने लिहिलेली ती अक्षरं बघ ! प्रत्येक उभं अक्षर ६ फूट उंच आहे. आता यावरून आली तुला देवळाच्या उंचीची कल्पना ? '

' हो ! '

मी ' हो ' म्हटलं खरं, पण ती कल्पना येऊच शकत नाही इतकं ते सर्व कल्पनातीत होतं.

उंचीची कल्पना करता करता थकल्यामुळे मी नजरेच्या पातळीवर असलेल्या भिंती पाहू लागले. भिंतीवर ख्रिस्तपुराणातले मोठमोठे प्रसंग चितारलेले होते. मी म्हटलं, ' काय सुरेख रंगवली आहेत ही चित्रं ! '

यावर आमची मार्गदर्शिका हसून म्हणाली, 'बाईसाहेब, जरा सूक्ष्म नजरेने पाहा. ही चित्रं नाहीत, मोझाईकने–रंगीत दगडांच्या बारीक बारीक तुकड्यांनी-बनवलेली चित्रं आहेत ही. ही शिल्पकलाकृती आहे.'

या शिल्पकलाकृतीने, रंगीत दगडांनी बनवलेल्या चित्रांनी आम्हाला चांगलंच बनवलं. हे रंगीत दगडांचे तुकडे परस्परांशी इतके एकजीव करून टाकलेले होते की अगदी जवळ जाऊन बारकाईने पाह्यलं तरच ते वेगवेगळे तुकडे आहेत असं समजत होतं. नाहीतर त्यातले रंग, चेहऱ्यावरचे भावनाविष्कार सर्व काही इतकं परिपूर्ण होतं की एखाद्या उत्कृष्ट चित्रकाराने रंगवलेली ही एकसंधी चित्रंच आहेत असा भास व्हावा.

मायकेलअँलोजेने या देवळाचा घुमट बांधला तेव्हा तो ७४ वर्षांचा होता. पण त्याच्या वयाचा या बांधकामावर काहीही परिणाम झालेला दिसत नव्हता. या शिल्पकाराच्या अशा विलक्षण कलाविष्काराने मी थक्क होऊन टक लावून पाहत होते. एवढ्यात माझ्या कानांवर गलका ऐकू आला म्हणून मी तिकडे धावले.

या चर्चच्या मूर्तीकडे जाताना वाटेत एका मूर्तीपुढे बरीच गर्दी जमली होती आणि प्रत्येकजण त्या मूर्तीच्या पायाकडे बोट दाखवीत होता. ती सेंट पीटरची, काळ्या दगडाची भव्य मूर्ती होती. मूर्तीचा उजवा पाय बोटं झिजून गुळगुळीत झाल्यासारखा दिसत होता. मी आश्चर्याने म्हटलं--

'अरे, हा दगड असा झिजला कसा ?'

तेव्हा आमची मार्गदर्शिका मला म्हणाली, 'प्रत्यक्षात सेंट पीटरच्या भक्तांनी त्याच्या पायाचे मुके घेऊन घेऊन त्याचा पाय झिजवून गुळगुळीत केला होता. म्हणून मूर्तीतही तो तसाच दाखवला आहे.' मला गंमत वाटली, मानवी मनाची आणि तें मन ओळखून त्या भक्तांच्या भावनांशी तादात्म्य पावून शिल्पकृती घडवणाऱ्या त्या शिल्पकाराची !

नंतर आम्ही हिंडून पाहिलेल्या देवळात आणि राजवाड्यात, छपरांवर पुराणातील मोठमोठ्या समर-प्रसंगांची आणि ख्रिस्ताच्या आयुष्यातील प्रसंगांची चित्रं रेखाटलेली होती. त्या चित्रकृतींपैकी काही कित्येक शतकांपूर्वीची असूनही अजून त्यांचे रंगही फिके झाले नव्हते. मला आश्चर्य वाटलं ते छपरांवर या चित्रकृती रंगवल्या कशा याचं ! आपल्याकडेही देवळात भिंतीवर

रंगवलेली चित्रं मी पाहिली आहेत. पण त्या चित्रांत गती आढळत नाही. सगळी स्थिरचित्रं दिसतात. दिल्लीच्या बिर्ला मंदिरांतही मी चित्राकृती पाहिल्या. पण छायाचित्रकाराने 'स्टेडी प्लीज' म्हणून काढलेल्या फोटोसारख्या त्या मला वाटल्या, तर या चित्रकृती धावती छायाचित्रं टिपून घेणाऱ्या मूव्ही कॅमेऱ्याने काढल्यासारख्या दिसत होत्या. जिवंत आणि गतिमान! इटालियन चित्रकलेचं हे वैशिष्ट्य अगदी डोळ्यांत भरण्यासारखं होतं आणि म्हणूनच ही चित्रं कशी काढली असावीत, ते मी विचारलं, तेव्हा समजलं, की कलावंत म्हणे स्वत:ला एका पाळण्यात टांगून उताणा निजत असे आणि ही छतावरील चित्रं रंगवीत असे आणि इतकं असूनही ही चित्रं इतकी कलापूर्ण आणि जिवंत दिसत होती की मला समजेना, कौतुक या चित्रांतल्या कलेचं करावं की चित्रकाराच्या कष्टांचं?

सेंट पीटर्स चर्च पाहून आम्ही म्यूझियममधले संगमरवरी पुतळे पाहायला गेलो. वास्तविक जिवंत माणसाची निर्जीव प्रतिकृती म्हणजे पुतळा नाही का? देवळांतील रामकृष्णादि संगमरवरी पुतळे हेच सांगतात. पण नैसर्गिकता आणि जिवंतपणा हे तर इटलीतल्या निर्जीव पुतळ्याचं वैशिष्ट्य!

पहिला पुतळा आम्ही पाहिला तो एका गलोल फेकणाऱ्या माणसाचा. त्याचा फाटका शर्ट, त्याच्या हातांतली खेचलेली गलोलची दोरी इतकी जिवंत वाटत होती की आता हा गलोलीचा दगड टणकन् आपल्या कपाळावर येऊन आदळणार असं वाटून मी नकळत एक पाऊल मागे सरले.

दुसरा पुतळा फ्लॉरिया बोनापार्टचा. नेपोलियनची ही बहीण एका कोचावर पहुडली होती. ती पहुडलेली फ्लॉरिया माझ्याकडे पाहून मंदस्मित करीत होती आणि नकळत प्रतिस्मितासाठी माझे ओठ विलग झाले. तिच्या कोचाच्या गादीला पडलेल्या सुरकुत्या साफ करण्यासाठी माझा हात सहजगत्या पुढे झाला. आणि त्या हाताला संगमरवराचा थंडगार स्पर्श झाल्याबरोबर ही खरीखुरी जिवंत फ्लॉरिया नाही, हा तिचा संगमरवरी पुतळा आहे हे समजून माझी फार निराशा झाली. आणि क्षणभर आपलं अस्तित्व जाणवू देणारी ही फ्लॉरिया खरी का नाही हा प्रश्न उगीचच मनात रेंगाळत राहिला.

असे खरेखुरे कितीतरी संगमरवरी पुतळे आम्ही त्या दिवशी पाहिले. कडेवर घेतलेल्या लहान मुलीच्या मांडीत बोटं रुपलेली दिसत होती,

कुऱ्हाडीचा घाव बसून लाकूडतोड्याचं लाकूड क्षणात फुटणार असा भास होत होता. निर्जीव पुतळ्यात जिवंतपणाचा साक्षात्कार घडवणाऱ्या या कलेच्या दर्शनाने मन बेभान झालं माझं! या सर्व कलाकृती पाहून थक्क आणि मुग्ध होऊन मी आमच्या मार्गदर्शिकेला विचारलं,

'ही चित्रं काढली कशी? हे पुतळे इतके जिवंत केले तरी कसे?'

ती म्हणाली, 'कसे? हा वेड्यासारखा प्रश्न विचारू नकोस. कला कशी निर्माण झाली हे का विचारायचं असतं? कलावंत हा जन्मावा लागतो आणि तो जन्मतः कलावंत असतो. पीटर बर्नीनी, मायकेल अँजेलो, बोर्गेन्झी लोरेन्झो हे सर्व जन्मतः कलावंत होते आणि म्हणूनच ते अशा कलाकृती निर्माण करू शकले.'

मी त्यावर फक्त एवढंच म्हटलं,

'खरंच, कलावंत जन्मावा लागतो, आणि जन्मतःच कलावंत असावा लागतो.'

* * *

...ाळा ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों वि ..................

# २.

रोमचा मुक्काम हालवून आता आम्ही फ्लॉरेन्सला जायला निघणार होतो. फ्लॉरेन्स हे रोमच्या मानाने अगदी लहान शहर आहे असं आम्ही ऐकलं होतं. त्यामुळं या शहरात बघायचं असं काय असणार अशी शंका मनात येत होती.

थोड्या दिवसांत बऱ्याच देशांत जायचं असल्यानं वेळ वाचविण्यासाठी मी विमानाचा प्रवास पत्करला होता. पण इटलीतला देशांतर्गत प्रवास मला आगगाडीनं करायला मिळणार होता आणि त्याचा मला फार आनंद वाटला. मी ऐकलं होतं की रोम ते फ्लॉरेन्स हा आगगाडीचा प्रवास फार चित्तवेधक असतो आणि म्हणूनच केव्हा एकदा आगगाडीत बसून फ्लॉरेन्सला जाते असं मला झालं होतं.

नेहमीप्रमाणे बस रेल्वेस्टेशनवर नेण्यासाठी वेळेवर आली. पण आमच्या-पैकी एका गृहस्थांचं काही केल्या आटपेना. आम्ही राहत होतो त्या हॉटेलच्या मॅनेजरशी त्यांचा कशाबद्दल आणि काय वादविवाद चालला होता

कोण जाणे ! पण त्यांनी निघायला उशीर केला खरा आणि आम्ही स्टेशनवर पोचलो तेव्हा गाडी सुटायला फक्त पाच मिनिटं होती. प्लॅटफॉर्मवरून भारतीय चित्रविचित्र पोशाखात धावणारी आमची प्रवाशांची गाडी हा आगगाडीत बसलेल्या लोकांच्या मनोरंजनाचा, घटकाभर करमणुकीचा विषय झाला होता.

आम्ही एकदा कसेबसे आमच्या रिझर्व्ह केलेल्या डब्यात घुसलो. फर्स्ट-क्लासची आमची तिकिटं रिझर्व्ह केलेली होती खरी, पण त्यांच्याकडच्या रेल्वेच्या नियमांनुसार आम्ही गाडी सुटण्यापूर्वी दहा मिनिटं जागेवर हजर नसल्यामुळे आमच्या राखीव जागांचा राखीवपणा संपला होता आणि आमच्या काही जागांवर दुसरेच प्रवासी बसले होते. अर्थात आमच्यापैकी काहीजणांना बसायला जागा मिळाली. आमच्यापैकी ज्यांचं सर्वांत आधी आटोपलं आणि ज्यांचं सामान विशेष नव्हतं त्यांना कंडक्टरने बसायला सांगितलं. विचारे ते चर्चेत रंगणारे गृहस्थ बरेच अस्वस्थ झाले. कारण एक तर त्यांचं सामानही जास्त होतं. हौसेहौसेने त्यांनी बऱ्याच वस्तू खरेदी केल्या होत्या. शिवाय त्यांच्यामुळे जी धावपळ सर्वांना करावी लागली त्यावरून इतर सगळे आणि आमचा वाटाड्यासुद्धा जरा त्यांच्यावर नाराजच होता. तेव्हा बसायला जागा मिळण्यावर आपला काही हक्क नाही हे कुणीही न सांगताच त्यांनी हेरले आणि ते मुकाट्याने उभे राहिले. बसायला जागा मिळण्याबाबत सर्वांत जास्त प्रमाणपत्रं माझ्या वाट्याला असल्याने मी एका जागेवर आरामात बसले.

आम्ही ज्या डब्यात होतो तिथं सुरुवातीला झालेला गोंधळ आणि गडबड ओसरून आता आम्ही सर्वजण कुठे ना कुठेतरी स्थानापन्न झालो होतो. फक्त एकच जागा रिकामी होती. अगदी गाडी सुटायला पाचच मिनिटं राहिली असतांना एक तरुणी जवळजवळ धावतच आमच्या डब्यात शिरली आणि दारातच उभी राहिली. रिकामी जागा तिला दिसत होती, पण विचारावं कसं असा प्रश्न पडला होता. शेवटी एकदा धीर करून तिनं विचारलं—ती जागा माझ्या शेजारीच होती म्हणून तिनं मला विचारलं. पण मला त्या शब्दांचा अर्थ काही समजला नाही. कारण तिनं इटालियन भाषेत विचारलं होतं. आणि माझं इटालियन भाषेचं ज्ञान 'या बसा, नमस्कार !' पुरतंच मर्यादित ! पण तिनं जागेबद्दल विचारलं हे अंदाजानं समजून मी तिथ ठेवलेला कोट उचलला

आणि तिला तिथं बसायला सांगितलं. आणि क्षणार्धातच बाहेरचं सौंदर्य न्याहाळताना मी तिला विसरून गेले.

'फ्लॉरेन्स' म्हणजे फुलांचा देश ! खरंच–फुलांचा देश ! जिकडंतिकडं रंगीबेरंगी फुलं फुललेली दिसत होती. सगळी कशी अगदी टवटवीत, हसरी, बोलकी. ती आपल्या रंगांमधून, ताजेपणामधून फ्लॉरेन्सचं वैभवगान गात होती. बघणाऱ्यांचं मन मोहून टाकीत होती. चित्त भारावून टाकीत होती.

मधूनच लहानलहान टेकड्या होत्या. त्यांवरची गवताची पाती वाऱ्याबरोबर डोलत होती. मधूनमधून रंगीत, लहानसहान फुलं डोकावत होती. क्षणभर मला खंडाळ्याच्या घाटातून जात असल्याचा भास झाला. कारण, ती फुलंसुद्धा कण्हेरीची, जास्वंदीची, सुपारीची, कर्दळीची होती. सगळा प्रदेश कसा पुष्पदलांप्रमाणं मृदु, मुलायम वाटत होता. मला झालेल्या आनंदांत कुणाला तरी सामील करून घेतल्याखेरीज राहवेना म्हणून मी डब्यात नजर टाकली. माझ्या शेजारी ती इटालियन मुलगीदेखील माझ्याचप्रमाणं एकटक खिडकीतून बाहेर पाहत होती–निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत होती. आमची नजरानजर झाली. भाषेचा बांध नकळत फुटला आणि अचानक मला नकळतच मी तिला म्हटलं, 'ए बेलो !'

'किती सुंदर !' तिनं पण त्याच शब्दांत प्रत्युत्तर दिलं.

त्या एका धुंद, समानुभावाच्या क्षणी जरी बंध तुटले तरी नंतर भाषेची पंचाईत आली. पण आमची दोघींची मनं रसिकतेच्या धाग्यांनी परस्पर गुंफली गेल्यानं आम्ही भाषेची अडचण नजरेआड केली, आम्ही दोघी माझ्या मोडक्यातोडक्या इटालियन भाषेत आणि तिच्या मोडक्यातोडक्या इंग्रजी भाषेत एकमेकींशी बोलू लागलो. मी तिला तिचं नांव विचारलं आणि माझं नांव तिला सांगितल्यावर 'लीला' आणि 'लिलिया' या नामसादृश्यामुळं आम्ही आणखीच जवळ आलो.

यानंतर रोम ते फ्लॉरेन्सपर्यंतचा तीन तासांचा प्रवास आम्ही एकमेकींशी बोलण्यात घालवला. मुख्य आधार नेत्रपल्लवी, करपल्लवीचाच होता. पण काहीच अडचण वाटली नाही दोघींना. लिलिया कधीही इटली सोडून बाहेर गेली नव्हती. ती जंतुशास्त्राची डॉक्टर होती. पण तिला आपला देश सोडून कुठंच जायची इच्छा नव्हती. फ्लॉरेन्ससारख्या सौंदर्यमय वातावरणातून तिचा

पायच निघत नसे. नाही म्हणायला सध्या ती कामासाठी कधीमधी थोडी बाहेर जात असे तेवढीच !

तिनं भारतीय स्त्री कधीच पाहिली नव्हती. त्यामुळं साडी, कुंकू, मंगळसूत्र, बांगड्या या सर्वांबद्दलच तिच्या मनांत फार कुतूहल होतं. मीं सांगितलं तरी सहावारी साडी रोज नेसता येते यावर तिचा विश्वास बसेना. ती चुण्या घालून शिवलेलीच असली पाहिजे हा तिचा आग्रह कायम होता. सहावारी एवढी लांब साडी सावरते कशी हा तिचा यक्षप्रश्न होता. कुंकू म्हणजे कायम गोंद-लेला ठिपका असं तिला वाटत होतं. साडीबद्दलचा तिचा गैरसमज दूर करणं शक्य नव्हतं, पण कुंकू मात्र पुसून पुन्हा लावून मी तिची खात्री करून दिली. काचेच्या बांगड्यांचा आवाज तिला फारच लोभस वाटला. मी लगेच माझ्या बांगड्यांच्या डब्यातून पाचसहा काचेच्या रंगीत बांगड्या काढल्या आणि तिचा हात धरून तिला म्हटलं, ' या बघ मी माझ्यासारख्या बांगड्या तुझ्या हातात भरून देते. '

तेवढ्या मुदतीत लिलियानं माझ्याकडून ' कंगन ' आणि ' नमस्ते ! ' हे दोन शब्द शिकून घेतले. दुसऱ्या दिवशी आम्ही फ्लॉरेन्समधलं एक गावा-बाहेरचं चर्च बघायला जाणार होतो. लिलियाचं घरही त्या चर्चच्या जवळच असल्यानं तिनं मला तिच्या घरचा पत्ता दिला आणि ' उद्या संध्याकाळी चार वाजता माझ्या घराच्या दारात मी तुझी वाट पाहीन ' एवढं सांगून आणि दुसऱ्या दिवशी येण्याबद्दल पुन्हा पुन्हा बजावून पुढच्याच स्टेशनवर लिलिया उतरून गेली. ती उतरून गेल्यानंतर मी थोडा वेळ माझ्या जागेवर स्वस्थ बसून राहिले. पण मग सहज काचेतून बाहेर पाहिलं आणि मला तिथं बसवेना. कारण बाहेर शेतं खुणा करून बोलावीत होती. डोंगर हिरव्या हिरव्या हिरवळीच्या रूपाने हसत होते. आकाशात तरंगणारे ढग साद घालीत होते.

या आगगाडीला डब्याच्या बाजूला खूप मोठी मोकळी ऐसपैस जागा होती. अगदी मुंबईच्या गिरगावातल्या चाळींच्या गॅलरीइतकी. आणि बाहेरच्या बाजूला चौकोनी काचेच्या खिडक्या होत्या. या खिडक्या मुंबईतल्या जुन्या पारशी घरांना असतात तशा मोठ्या चौकोनी होत्या. धरायला चांगल्या भक्कम पितळी कड्या होत्या. मी एका कडीला धरून उभी राहिले. आणि माझं मन आनंदानं नाचू लागलं. रोम ते फ्लॉरेन्स हा आगगाडीचा

प्रवास अगदी खंडाळयाच्या घाटासारखा वाटत होता. त्यामुळं की काय कोण जाणे, पण मला या शहराबद्दल एकदम आत्मीयता वाटू लागली.

फ्लॉरेन्स शहर जसजसं जवळ येऊ लागलं तसतसा एका सौंदर्याचा साक्षात्कार घडू लागला. जिकडे तिकडे रंगीवेरंगी फुलं फुललेली दिसू लागली. या लहानशा शांत, स्वच्छ खेडयाभोवती चौफेर कसलं तरी विरल, नाजुकपणाचं आवरण पसरलं आहे असा भास मला होऊ लागला.

आम्ही फ्लॉरेन्स शहरात गेलो. पण तिथल्या खोलीत मला क्षणभरही वसवेना. जणू उत्साहाचं वारं माझ्या मनात संचारलं होतं. मी एकदम बाहेर जाण्याच्या तयारीत दिसलेली पाहून आमच्याबरोबरच्या सरोजने मला विचारलं,

' हे काय ? आत्ता कुठे निघालीस ? '

' अशीच भटकायला. सबंध फ्लॉरेन्स शहरभर मी हिंडणार आहे. मी लौकर परत आले नाही तर काळजी करू नका. रात्रीच्या आत नक्की येते आणि फ्लॉरेन्स इतकं छोटं शहर--खेडंच आहे, की मी कुठे चुकेन ही धास्तीच नको. '

आज मी कुणालाच माझ्याबरोबर येण्याचा आग्रह केला नाही. मला कुणाचीच सोबत नकोशी झाली होती. मनमुराद, एकटं, फुलांच्या ताटव्यांतून हिंडावं अशी विचित्र लहर आली होती मला.

मी दिवसभर एकसारखी हिंडत होते. उत्फुल्ल फुलांचे रंग डोळ्यांत भरून घेत होते. तिथला वातावरणात भरून राहिलेला कोमलपणा माझ्या अंतरंगावर कसलं तरी एक विरल आच्छादन घालीत होता. फुललेली टवटवीत फुलं मनाला हसवीत होती. त्या फुलांना मुळींच सुवास नव्हता पण ही उणीव त्यांच्या रंगांनी आणि ताजेपणाने भरून निघत होती. पण रंगरूपानं ही फुलं संपूर्ण भारतीय होती. या फुलांच्या भारतीयत्वाने देखील मला भारून आपलंसं केलं असल्यास न कळे !

मी आजपर्यंत पाहत होते तशीच ही सगळी फुलं होती. ही सगळी फुलं मी लहानपणी आजोळीं अंगणात, रस्त्याच्या कडेला, घरांच्या बांधावर पाहिली होती. असेच वेल घरांच्या, भुवनेश्वराच्या देवळाच्या भिंतीवर लोंबताना मला जाता येता दिसले होते. क्षणभर मी रोह्याच्याच अगदी माझ्या आजोळच्या गावी तर नाही ना ! असा मला भास झाला. इतकी सगळीं भारतीय

फुलं होती फ्लॉरेन्समध्ये आणि या परदेशात अशी आणखी किती आणि कुठे कुठे फुलं आहेत ते बघितल्याशिवाय राहवेना. म्हणून मी पुढे पुढेच चालले होते.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना गुलाबी कण्हेर फुलली होती. शेंदरी आणि लाल कर्दळी घरांच्या अंगणात माना ताठ करून उभ्या होत्या. अगदी माझ्या आजोळच्या रोह्याच्या घरातल्याप्रमाणे. कात्री जास्वंद, फोडलेल्या अंजिरासारख्या आपल्या रंगाचा शिडकाव करीत, अंगणातून डोलत होती, तर दुहेरी जास्वंदीचा घेर दुप्पट आणि रंग आपल्या इकडल्यापेक्षा जास्त काळपट वाटत होता. घंटी जास्वंदीचे तुरे वाऱ्यावर लोंबकळत होते. कपास फुलली होती आणि पिवळ्या रंगाच्या साडीवर तपकिरी रंगाचा ब्लाऊझ किती सुंदर दिसेल ही रंगसंगती दर्शवीत होती. सुपारीची चिमुकली बोंडफुलं बैठ्या घरांच्या कठड्यांवरून लहान मुलांसारखी डोकावून बघत होती.

आत्तापर्यंत मी बरीच दूर भटकत आले होते. आता गांवचा विरळ वस्तीचा भाग सुरू झाला होता. तुरळक बैठी, विटांची घरं होती. मधूनच कुठेतरी रस्त्यात, अंगणात लहान मुलं खेळत होती, तेवढीच वस्तीची जाग यायची. बाकी शांत !

एका घराच्या भिंतीवर गारवेल लोंबत होती आणि तिच्याशी गप्पा-गोष्टी करीत होती कृष्णकमळीची वेल. मी त्यातलं एक कृष्णकमळीचं फूल तोडून जवळच खेळणाऱ्या एका छोट्या मुलीच्या केसांत पिनमध्ये खोवलं. आसपासच्या मुलांना काय वाटलं कुणास ठाऊक ! पण ती टाळ्या पिटू लागली. कुणाच्याच केसांत मी इथे फुलं पाहिली नाहीत. मला वाटलं फुलांसारखींच इथल्या माणसांचीं मनं कोमल असावीत. फुलं झाडावरून तोडण्याचा कठोरपणा त्यांना करवत नसेल ! फुलदाणीत देखील फुलं कातरून ठेवायला त्यांना आवडत नसतील कदाचित !

कदाचित का ? त्यांच्या मनाचा कोमलपणा मला विनोलिया भेटल्यावर लगेच पटला. मला इथेच ती भेटली. दिसायला नाजुक, विनोलियाच्या फुलासारखीच. मनानेही तशीच, गुलाबी. तिच्याशी बोलताना आणि जेवढं मोडकं तोडकं समजेल तेवढं समजावून देताना आणि इटालियन समजून घेताना मी बेभान होऊन गेले होते.

विनोलियाने मला सांगितलं, ' मी आजपर्यंत माझं हे गाव सोडून कुठेच गेले नाही. मला जावंसंच वाटत नाही. '

' का ग ? '

' अग, आमचं गाव आहेच तसं. इथल्यासारखी फुलं तुला कुठं दिसतील का ? '

' हो ! अग ही सगळी फुलं आमच्या भारतात आहेत. शिवाय यातल्या कितीतरी फुलांना वास आहे. तू चल एकदा म्हणजे दाखवीन तुला. '

' मी आणि तुझ्या देशात येणार ? नावच काढू नको. '

' का ग ? तुला आमच्या देशात यायची भीती वाटते ? का आमचा देश आवडत नाही ? '

' तसं नाही ग ! मी तुमच्या देशाबद्दल वाचलं आहे. तो मला आवडतो देखील. पण तरी देखील मी माझं गाव सोडून कुठेही जाणार नाही. आता मी माझ्या कामासाठी रोमला अगदी आमच्याच देशांतल्या दुसऱ्या शहरी जाते ना, तरी देखील माझ्या फुलांच्या गावी मी परत कधी येते अशी ओढ लागते बघ माझ्या मनाला. तू मलाच काय, आमच्यापैकी कोणालाही विचार. कोणतीच मुलगी–एवढंच काय मुलगे देखील आमचा देश सोडून बाहेर जायला तयार नाहीत असं आढळेल तुला. '

विनोलिया बोलत होती आणि मी तिच्याकडे बघत होते. विनोलिया अगदी पक्की इटालियन होती. नाजुक बांधा, रेखीव नाकडोळे, अरुंद जिवणी, गव्हाळी रंग, चेहऱ्यावर एक प्रकारचं मार्दव–मला भेटलेल्या फ्रेंच मुलींसारखी ती मादकही नव्हती किंवा इंग्लिश मुलींसारखी ताठही नव्हती. तिच्या चेहऱ्यावरचे भावच सांगत होते की हिला आपल्या घराबद्दल फार फार ओढ आहे. अगदी इतर साऱ्या इटालियन स्त्रियांप्रमाणेच ! घर सोडून फार वेळ बाहेर राहावं लागेल म्हणून त्या नोकरी करायलादेखील फारशा तयार नसतात. त्यापेक्षा गृहिणीधर्म स्वीकारून घराच्या छायेतच विसावणं त्यांना जास्त आवडतं. म्हणूनच मला माझ्या सबंध प्रवासात इतर किती तरी देशांतल्या मुली भेटल्या, पण इटालियन मुली बाहेर प्रवासाला निघालेल्या अशा भेटल्या नाहीत.

या त्यांच्या आवडीमुळेच त्यांची मनं फार हळवी आणि कोमल बनली

असावीत. चार ठिकाणी हिंडून, चार टक्केटोणपे खाऊन येणारा टणकपणा त्यांच्या मनाला अजून तरी आलेला नसावा असं मला दिसलं. या हळव्या मनाच्या इटालियन स्त्रिया झाडांची शोभा जाईल म्हणून फुलं काढून फुलदाणीत ठेवीत नाहीत. आम्ही भारतीय स्त्रिया फुलांचे गजरे करून रोज केसांत घालतो, हे समजल्यावर विनोलिया चुकचुकल्याशिवाय राहिली नाही. वासाची फुलं केसांत माळण्यासाठीच असतात हे या फुलवेड्या पोरीला मी कसं पटवून देणार? आणि कशाला पटवायचं? तिला दुखवायचं?

कारण तिचं मन मला कळत होतं. आपल्या गावाचा विरह सहन करावा लागू नये म्हणून परदेशी जाण्याची इच्छासुद्धा मनात न आणणाऱ्या आणि फुलांचा सहवास न सोडणाऱ्या विनोलियाच्या मनाची ठेवण मी समजू शकत होते. तिला त्या फुलांच्या सहवासात राहणं शक्य होतं. मी कशी राहणार?

मी विनोलियाचा निरोप घेतला. आता अंधार पडू लागला होता. मला हॉटेलमध्ये परतणं भाग होतं. मी परत आले खरी, पण जणू फुलांच्या ताटव्या-वरून आणि तरीदेखील एकही फूल कुस्करू न देता!

● ३

दुसऱ्या दिवशी सकाळी फ्लॉरेन्सचं रेडिओस्टेशन पाहण्यासाठी म्हणून मी ९ वाजताच बाहेर पडले. मी एकटीच शोधीत गेले होते. कोणालाच इंग्रजी येत नसल्याने गंमतच होत होती. शेवटी मोडकं तोडकं इंग्रजी बोलणारी एक मुलगी आली आणि तिने मला सांगितलं की रेडिओ–प्रमुख थोड्या वेळानं येतील, मग स्टेशन पाहायला मिळेल. मग मी तिथेच थांबायचं ठरवलं. थोडा वेळ त्या खोलीतली सजावट पाहिली तरी वेळ जाईना. मग सहज समोर नजर टाकली. एक साधारण प्रौढसे गृहस्थ समोरच्या कोचावर बसले होते. तेही माझ्याकडे टक लावून पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावरून आणि इतका वेळ न बोलता बसण्यावरून ते इटालियन नसावेत असे वाटून मी मोठ्या आशेनं त्यांना विचारलं, 'तुम्हाला इंग्रजी येते का?' माझं बोलणं त्यांना समजावं अशी मनात प्रार्थना करीत होते. एवढ्यात ते गृहस्थ म्हणाले, 'मला फक्त इंग्रजीच येतं, तुम्हांला इंग्रजी येतं हे पाहून फार आनंद वाटला. या इटालियन लोकांत मी अगदी चुकल्या मुशाफिरासारखा झालो आहे.'

अशा तऱ्हेने समदुःखी आणि त्या क्षणी समसुखी अशा आम्हां दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. ते गृहस्थ कॅनेडियन होते. त्यांचं नाव क्लॅऱ्हेल. मॉन्ट्रियलला राहणारे.

फ्लॉरेन्सला त्यांच्या कंपनीने काही कामासाठी त्यांना धाडलं होतं. रेडिओचे सुटे भाग तयार करणाऱ्या कंपनीतर्फे ते आले होते. मी रेडिओ-स्टेशनवर भारतात काम करते असं म्हटलं आणि ते मला रेडिओची तांत्रिक माहिती विचारू लागले. मग माझ्या लक्षात आलं की मी वापरलेल्या रेडिओ शब्दावरून मी एखादी रेडिओडीलर आहे असा त्यांचा समज झाला होता. कारण आपण सहजगत्या रेडिओस्टेशन म्हणत असलो तरी परदेशात नभोवाणी केंद्रासाठी 'ब्रॉडकास्टिंग हाऊस' हा शब्द प्रचारात आहे. मग मी त्यांना ते समजावून सांगितलं. त्यांची मुलगी मधून मधून टी. व्ही. वर काम करायला जाते, मुलांच्या विभागात. मी स्त्रियांचा कार्यक्रम सादर करते, असं म्हटल्यावर त्यांनी खूप माहिती विचारली. आणि नंतर तिथल्या नभोवाणी प्रमुखांची आणि माझी लगेच ओळख करून दिली ती मी कुणीतरी फार बडी आहे अशा तऱ्हेनं. मला फारच ओशाळल्यासारखं झालं. पण या वशिल्यावर मला संपूर्ण टी. व्ही. स्टेशन बघायला मिळालं. इतकंच नव्हे तर साडी, कुंकू म्हणजे काय यासंबंधी टी. व्ही. कार्यक्रमासाठी माझा एक ६ मिनिटांचा कार्यक्रमही – माहितीवजा-त्यांनी चित्रित करून घेतला. त्या थोड्याशा ओळखीने पण एक भाषेमुळे त्या कॅनेडियन गृहस्थांचा आणि माझा दृढ परिचय झाल्यासारखं मला वाटलं.



फ्लॉरेन्सच्या रेडिओस्टेशनवरून मी घरी आले तों जेवणाची वेळ झाली होती. जेवून मी थोडा वेळ विश्रांती घेतली आणि संध्याकाळचा कार्यक्रम

बघितला. तो बघताच इतका वेळ विस्मरणाच्या धुक्यात दडलेला लिलियाचा चेहरा स्पष्ट दिसू लागला आणि तिचे शब्द आठवू लागले, 'उद्या संध्याकाळी चार वाजता माझ्या घराच्या दारात मी तुझी वाट पाहीन.'

मी लिलियाचा पत्ता बरोबर घेऊन सर्वांबरोबर तीन वाजता बाहेर पडले. चर्च पाहून झालं आणि 'परत मी एकटी येईन, तुम्ही जा' असं सर्वांना सांगून लिलियाचं घर शोधू लागले. फार शोधावं न लागता घर मला लौकरच सापडलं. फारसं दूर नव्हतंच. बरोबर चार वाजले होते. मी तिच्या घराशी पोचले तेव्हा ती दारात पायऱ्यांवर उभी होती. ते सुंदर भावदर्शी बोलके डोळे, नाजुक चेहरा, हातांत घेतलेल्या फुलांच्या गुच्छासारखीच प्रफुल्ल मुद्रा! मला पाहताच ती पायऱ्यांवरून धावत, अवखळपणे माझ्याकडे आली आणि हातांतला फुलांचा गुच्छ माझ्या हातात देऊन म्हणाली, 'नमस्ते!'

मीदेखील उत्तरादाखल तिला म्हटलं, 'नमस्ते!' आणि नंतर निरोप घेताना म्हटलं,–'अरिविदेरची!' (बरंय येते–नमस्कार!)

आम्ही फार तर दोन तास एकमेकींशी बोललो असू. पण त्या दोन तासांनी दोन वर्षांचं काम केलं होतं. मी तिचा निरोप घेऊन परत फिरले; पण माझं स्वागत करण्यासाठी धावत आलेल्या लिलियाची मूर्ती माझ्या नजरेसमोरून हालेना. हातातल्या उत्फुल्ल फुलांप्रमाणे तिचा चेहरा हसत होता. गुच्छ माझ्या हातांत देताना तिच्या हातांत मी भरलेल्या काचेच्या बांगड्यांचा खळकन् आवाज झाला होता आणि 'नमस्ते!' म्हणून हात जोडल्यावर त्या निळ्या बांगड्या गोऱ्या हातांवर खुलत होत्या. दोन भिन्न संस्कृतींचा हा संगम आणि दोन परकीय मनांची ही मैत्री अक्षय्य टिकू न देण्याचं सामर्थ्य कुणाच्या तरी हातात असणं शक्य आहे का?



## २.

फ्लॉरेन्सच्या फुलांच्या ताटव्यांतून भटकताना आणि लिलिया आणि विनोलियासारख्या मानवी पुष्पांच्या सहवासात मी रंगून गेले होते. पण तरीही काल संध्याकाळपासून मी एक प्रकारच्या धुंदीतच वावरत होंते. ही धुंदी काही वेगळीच होती. कारण...कारण काल आम्हांला समजलं की, फ्लॉरेन्सनंतर आता आमचा मुक्काम व्हेनिसला होणार आहे आणि हे समजल्यापासून मनाला एक सुखाची बेहोशी आली होती.

कारण व्हेनिस हे माझं स्वप्नसृष्टीतलं शहर होतं. ते परीकथेतलं स्वप्न होतं. शाळेत असताना ज्या ज्या वेळीं व्हेनिस शहराचं वर्णन मी भूगोलाच्या तासाला वाचीत असे त्या त्या वेळीं माझ्या मनात विचार येई, खरंच अशा जलमय शहरात राहणारे लोक किती भाग्यवान् असतील! मधोमध तो पाण्याचा विस्तृत कालवा आणि त्याच्या चौफेर वसलेलं ते छोटंसं, सुबक शहर. कशी असतील बरं तिथली घरं? आणि माणसं कशी असतील? वाहनं

नाहीतच म्हणे ? मग व्यवहार कसे चालत असतील ?

या विचारात दंग असतानाच आम्ही फ्लॉरेन्सहून आगगाडीने निघून व्हेनिसला येऊन पोचलो. रेल्वेस्टेशनवर उतरलो आणि समोर नजर फेकल्याबरोबर आपण खरोखरच एखाद्या स्वप्नप्रदेशात आलो आहो असा मला आभास झाला. चित्रात पाहिलेला ‘ गोंडोला ’ समोर पाण्यात उभा राहून आम्हाला बोलावीत होता. आम्ही भराभर आपल्या बॅगा घेतल्या आणि गोंडोलात बसलो.

अगदी पहाटेची नाही तरी पण सूर्योदयाची वेळ होती. रिमझिम पाऊसही पडत होता आणि गार वाराही अंगाला झोंबत होता. पण सभोवार पसरलेल्या जगातल्या सर्व सौंदर्यदर्शनाला पारखं होऊन स्वतःला बुरख्यात कोंडून घेणाऱ्या स्त्रियांप्रमाणे पडदानशीन बनणं मला पसंत नव्हतं. म्हणून पडद्यांनी चौफेर वेढलेल्या गोंडोलाच्या आतल्या बाजूस बसण्याचं मी नाकारलं आणि बाहेरच्या बाजूला नौकानयन करणाऱ्या गुहकाच्या मागे ज्या तीन चार बैठका होत्या त्याच मी पसंत केल्या आणि त्यांतल्या एका सीटवर बसले. पावसापासून थोडंसं रक्षण व्हावं म्हणून डोक्याला रेशमी रुमाल बांधला आणि कांठावरून वाकून पाण्यात हात बुडवला.

पाण्याचा स्पर्श फारच आल्हाददायक वाटत होता. गोंडोला आपला मार्ग आक्रमू लागला. सभोवतालच्या घरांतली माणसं अधूनमधून डोकावून पाहत होती. कालव्याच्या दोन्ही बाजूंच्या घरांना जोडण्यासाठी अधूनमधून पुलासारख्या कमानी होत्या. त्या कमानींपाशी गोंडोला आल्याबरोबर थोडीशी खाली मान वाकवावी लागे. पण त्या कसरतीतही एक प्रकारची गंमत होती.

मधेच एक जरा मोठी पुलांची कमान दिसली. आमचा नावाडी म्हणाला, ‘ याला म्हणतात ‘ हुंदक्यांचा ’ किंवा ‘ अश्रूंचा पूल ’ ( The Bridge of Sighs ). या पुलावरून कैद्यांना पलीकडे नेत असत आणि एकदा हे कैदी पलीकडच्या तुरुंगात गेले की, पुन्हा या पुलावर पाऊल टाकण्याचं त्यांच्या नशिबात नसे. त्यांना शेवटचा निरोप द्यायला पुलाच्या मध्यापर्यंत येणाऱ्या त्यांच्या आप्तस्वकीयांच्या अश्रूंनी हा पूल सतत धुऊन निघत असे, म्हणून याला ‘ अश्रूंचा पूल ’ म्हणतात. अश्रू झिरपून झिरपून हा पूल सतत ओला राहत असलेला दिसेल तुम्हांला. ’

अश्रू झिरपून पूल सतत ओला राहतो ही कल्पनाच आहे वास्तविक ! पण नंतर मी ज्या वेळीं तो तुरुंग पाहिला त्या वेळीं अश्रूंचा पूल हे नाव किती सार्थ आहे ते मला पटलं. तो तुरुंग म्हणजे अगदी भयंकरच आहे. भर दुपारी बारा वाजता मध्यान्हीचा सूर्य तळपत असताना देखील या तुरुंगातल्या कोठड्या गुडुप अंधाराने भरलेल्या असतात. अगदी बोळकांडी-सारख्या जिन्यातून खाली तळघरात उतरताना मधूनच अगदी एकच डोळा लावून जेमतेम दिसेल एवढे लहान झरोके आहेत. माझ्या मनात आलं, या झरोक्यातून कैद्यांनी बाहेरच्या जगाकडे पाहिलं असेल आणि त्या एकटक लावलेल्या नेत्रातून अश्रू ठिबकले असतील. आप्तस्वकीयांच्या अश्रूंपेक्षा या कैद्यांच्या अश्रूंनीच कदाचित हा अश्रूंचा पूल सतत आर्द्र राहत नसेल कशावरून ?

आम्हाला ज्या ठिकाणी उतरवलं होतं ते 'हॉटेल स्प्लेंडिड' म्हणजे एखाद्या समुद्राच्या तळाशी असलेल्या सागरराज्यातल्या मोठ्या विस्तीर्ण पण सगळ्याभर रंगीत मऊ रुजामे पसरलेले होते. अत्यंत सुशोभित अशा गुहेसारखं होतं. पण तिथल्या खोल्यांची रचना अशी काही मजेशीर होती की मला दिल्लीच्या भूलभूलैयाची आठवण झाली. आपण एक जिना उतरलो की दोन ते लक्षात यायचं नाही. शिवाय चौफेर रचना आणि सजावट इतकी एकसारखी की डावीकडे वळायचं की उजवीकडे हेच समजायचं नाही. आणि माझी खोली तिसऱ्या मजल्यावर अगदी टोकाला होती. १२६ वी खोली. बाकी सर्वांच्या खोल्या खालच्या मजल्यावर होत्या. प्रत्येक वेळीं मला स्वतंत्र खोली देण्यात येत असे. आणि या ठिकाणी त्या वेळीं ही एकच स्वतंत्र खोली रिकामी असल्याने तिच्यात माझी प्रतिष्ठापना झाली होती. सगळ्यांना आपआपल्या खोल्यांशी सोडून मी एकटीच पुढे जायला लागले तेव्हा एकंदर वातावरणाने थोडीशी हबकलेली सरोज मला म्हणाली, 'काय ग, तुला भीती नाही वाटणार एकटीला त्या खोलीत राहायला ? '

'चल, वेडी कुठली, भीती वाटायला काय झालं ? ' असं तिला म्हणून मी माझ्या खोलीत गेले. नोकराने बंद खिडक्या उघडून टाकल्या आणि माझ्या मनावरचा ताण नाहीसा झाला. माझा सगळा शीण एकदम हरपला. माझी

खोली अगदी कडेला उंचावर होती. खिडकीतून व्हेनिसचा विस्तीर्ण कालवा दिसत होता. समोर दूरवर डुकल पॅलेस, नंतर मुरानो ग्लास फॅक्टरीच्या चिमण्या, सान मार्को चर्चवरचा क्रॉस. जवळ जवळ सबंध व्हेनिस शहराचा देखावा मला माझ्या खिडकीतून दिसत होता. मी खोलीवर एकदम खूष झाले.

दुपारी जेवून आम्ही व्हेनिस शहर पाहायला बाहेर पडलो. आणि आत्तापर्यंत न पाहिलेलं दृश्य दिसलं. व्हेनिसच्या रस्त्यांवर वाहनं नव्हती. व्हेनिसच्या रस्त्यांनी आणि इमारतींनी मोटारीचे पोंगे, सायकलच्या घंटा, किंवा चाकांचा खडखडाट कधीच ऐकलेला नसावा. तिथल्या रस्त्यांनी माणसांचा पायरव आणि त्यांचे बोलण्याचे आवाज ऐकले असतील तेवढेच.

सबंध शहर—शहर कसलं, कालव्याच्या काठीं वसलेलं गांवच ते!—पाहायला फक्त एक दिवस पुरला. दुपारी आम्ही आधी व्हेनिसचा प्रसिद्ध 'मुरानो' काच कारखाना पाहायला गेलो. इतक्या बहुरंगी, बहुढंगी काचेच्या वस्तू मी तरी अद्याप पाहिलेल्या नव्हत्या. या वस्तूंना यंत्राचा स्पर्शही होत नाही हे वैशिष्ट्य. कारागीर सर्व वस्तू हाती करतात. भट्ट्या, काचेचा रस, सळया आणि चिमटे एवढंच त्यांना लागणारं साहित्य. आणि सर्व गोष्टी इतक्या झटपट न बोलता ते करतात की क्षणभरात, आपल्यासमोर वितळत असलेला काचेचा रस फ्लॉवरपॉटच्या स्वरूपात आपल्या नजरेसमोर आला आहे यावर आपला विश्वास बसत नाही.

या काच कारखान्यातल्या वस्तू बाजारात मांडण्याची पद्धत मात्र अत्यंत आकर्षक आहे. मुख्य म्हणजे सगळ्या दुकानात आरसे लावलेले आहेत आणि त्यामुळे पुढे ठेवलेली वस्तू दुप्पट दिसते. पक्षी, झाडे, प्राणी यांची मांडणी विशिष्ट तऱ्हेने करून जंगलाचे, बागेचे, खुराड्यांचे देखावे मांडलेले आहेत. या कलापूर्ण मांडणीमुळे आधीच आकर्षक असलेल्या या वस्तू जास्तच आकर्षक दिसतात.

या दुकानातदेखील पुढच्या बाजूला शो-रूम आणि मागच्या बाजूला काचेच्या बारीक-सारीक वस्तू करण्याचे काम चालू असते. एका नळीतून रस-प्रवाह सतत चालू असतो आणि लहान लहान सळ्यांवर तो घेऊन बघता बघता जादू केल्याप्रमाणे कोंबडे, करकोचे वगैरे बारीक सारीक प्राणी इथले कारागीर बनवतात. पण त्यातही मुख्य काम चालतं ते काचेच्या मण्यांवर

वेगवेगळया नक्षीने सोन्याचं पाणी चढवण्याचं. हे काम फारच नाजुक कारागिरीचं असतं. आपण मण्यांची माळ दिली तर तिथल्या तिथे आपल्याला पाहिजे असेल तसलं सोन्याचं नक्षीकाम त्या मण्यावर करून मिळतं.

व्हेनिसचा बाजार छोटासाच आहे. डुकल पॅलेस मात्र इटलीतल्या इतर ऐतिहासिक भव्य इमारतींना शोभेसाच आहे, फक्त इथल्या चित्रकृतीत सोनेरी रंग जास्त प्रकर्षानं आढळतो. सान मार्को चौकातली कबुतरं यंत्रयुगाचं अस्तित्व विसरायला लावतात. आणि मोझाइकचं काम चालतं त्या ठिकाणी गेलं की मानवी हस्तकौशल्य यंत्रयुगाचा पराभवच करतं.

असंच एक मोझाइकचं काम चालतं ते ठिकाण आम्ही बघायला गेलो होतो. त्याचं आवार, विस्तार आणि पसारा एखाद्या कारखान्याएवढा, पण सर्व काम हाताने चालत असल्याने त्याला कारखाना कसं म्हणणार ? इथे या रंगीत दगडांच्या तुकड्यांनी बनवलेल्या इतक्या कलाकृती होत्या की नजर आश्चर्याने विस्फारल्याशिवाय राहिली नाही. रंगवलेल्या चित्रकृतींइतक्या रंगछाया आणि बारकावे या मोझाइकच्या चित्रांत दिसत होते. एक मेज जवळजवळ ६ फूट व्यासाचं लांबट गोल होतं. त्या मेजाचा पृष्ठभाग या रंगीत दगडांनी केलेला होता. हे मेज तयार करायला १४ वर्षे लागली होती. इतकी वर्षे मेहनत करून अशी कलाकृती तयार करणारे कलावंत इटलीत ठिकठिकाणच्या अशा कलावस्तूंतून आपलं अस्तित्व प्रगट करतात. इटालियन लोकांच्या कष्टाळूपणाचं, न थकता परिश्रम करण्याचं हे प्रत्यक्ष प्रतीकच म्हणायला हवं !

आम्ही सबंध दिवसभर व्हेनिस शहरात भटकत होतो. एका दिवसात शहराला दोन तरी चकरा मारल्या असतील. प्रत्येक ठिकाणाहून या शहराचं सौंदर्य वेगवेगळं भासतं.

पण एकंदरीत मला हे शहर भातुकलीतल्या, लहान मुलांनी बांधलेल्या टुटपुटीच्या घरासारखंच वाटलं. लहानसं पण टुमटुमीत, सुबक तळ्याच्या पाळीं उभं राहून सूर्यनारायणाकडून कहाणीतल्या राजपुत्रानं मागून घेतलेल्या गावासारखं. पायी चालावं लागत असूनही मी मुळीच दमत नव्हते. आणखी कितीतरी दिवस मी व्हेनिस शहरात राह्यले असते तरी मला कंटाळा आला नसता. मला हे टुमदार गाव आवडलं होतं, कालवा आवडला होता, माझी खोली आवडली होती; पण मी जास्त दिवस तिथे राहू शकले नाही.

इटालियन सरकारचे आम्ही पाहुणे होतो, ती पाहुणचाराची मुदत आता संपत आली होती. दोन दिवसांनी मी परत जायला निघाले तेव्हा पुन्हा माझ्या खोलीतून एकदा व्हेनिसचं सौंदर्य नजरेत टिपून घेतलं.

गोंडोलात बसून आम्ही पुन्हा रेल्वेस्टेशनवर निघालो. व्हेनिसचा सहवास संपला म्हणून मन आधीच विषण्ण झालं होतं. त्याच मनाच्या अवस्थेत गोंडोला 'अश्रूंच्या पुला' जवळ आल्याबरोबर व्हेनिसचा अखेरचा निरोप घेताना माझ्याही डोळ्यांतून त्या अश्रूंच्या पुलावर अश्रू ठिबकले.

● ●

व्हेनिसहून जरा उदास मनानेच मी मिलानमध्ये प्रवेश केला. व्हेनिस हे नैसर्गिक सौंदर्यानं परिपूर्ण तर मिलान म्हणजे अद्ययावत् यंत्रयुगाचा प्राति-निधिक नमुना.

अगदी कृत्रिम आहे मिलान, लहान मुलं मोॅक्कोची ठराविक साच्याची ठोकळ्यांची घरं बांधतात तसं. क्वचित ३०, ३२ मजली इमारती आहेत. बहुतेक सगळ्या इमारतींचे रंग अगदी फिके. रोम शहरात जितका भडकपणा तितकाच इथे अगदी फिकेपणा. तासन् तास जणू काही रंगसंगतीचा विचार करून अत्याधुनिक रंगांची घरांसाठी निवड केलेली! एखाद्या रस्त्याला असणारी दहा बारा घरं ओळींने एकाच आकाराची आणि एकाच रंगाची.

मिलान शहराची सर्वच रचना तिथल्या धंद्याच्या गर्दीला आणि कृत्रिम जीवनाला शोभेशी आहे. फक्त या सर्व रचनेत शोभत नाही किंवा 'फिट्ट' बसत नाही ते म्हणजे जुन्या राजवाड्याचं बनवलेलं, दोन्ही बाजूंना भव्य मूर्ती असलेलं दगडी रेल्वेस्टेशन.

मीं मिलानमध्ये हिंडायला बाहेर पडले आणि, 'मी आतापर्यंत हिंडत होते त्या इटलीतलंच हे शहर आहे ना! त्याच देशातली माणसं इथे राहत आहेत ना? आणि ही जिवंत माणसंच आहेत ना?' असा सुद्धा विचार क्षणभर माझ्या मनात आला. रोमच्या रस्त्यांवर मजेत हिंडत जाणारी माणसं मला दिसली होती, भेटली होती. थोड्या माणसांनीही ते रस्ते कसे गजबजलेले वाटत होते. पण मिलानच्या रस्त्यांवर वर्दळ असून देखील रस्ते अगदी शांत

भासत होते. प्रत्येकजण स्वतःच्या कामाच्या इतक्या घाईत की रस्त्यात थांबून एकमेकांशीं बोलायला त्यांना वेळच नसे. मोठा स्टोव्ह पेटवलेला असावा, ज्वाला नीट निळ्या झळझळीत असाव्यात पण सायलेन्सर बसवल्याने त्याचा आवाज मात्र मुळीच येऊ नये तसे हे मिलानचे गर्दीने थवथबलेले, पण निःशब्द असणारे रस्ते ! सगळं कसं साचेबंद, अत्याधुनिक, यांत्रिक !

मला मिलानमध्ये मुळीच चैन पडेना. आतापर्यंत इटलींत पाहिलेल्या भव्य उदात्ततेचा ठसा या मिलान शहराच्या दर्शनाने पुसून जाणार की काय अशी मला धास्ती वाटू लागली. पण सुदैवाने आम्ही तिथे एकच दिवस राहणार होतो. बरोबरची इतर सर्वच मंडळीं इथून वेगवेगळ्या वाटेला लागणार होती. मी लंडनला जाणार होते. म्हणूनच मिलानच्या कृत्रिमतेचं दर्शन घेण्यापेक्षा मी तिकिटाची व्यवस्था करण्यासाठी स्वतः जाण्याचं पसंत केलं. लंडनच्या विमानावर माझं तिकिट रिझर्व्ह करण्याच्या वगैरे खटपटीत सबंध दुपार गेली. तेवढंच बरं वाटलं. कारण संध्याकाळीं आम्हांला ‘ मार्जरी लेक’ आणि ‘कोमो लेक’ ही सरोवरं पाह्यला दूर जायचं होतं. त्यामुळे मिलानपासून, या कृत्रिम वातावरणापासून थोडी सुटका होणार होती.

आम्ही बसमधून ही सरोवरं पाह्यला निघालो. आसपास झाडी फार मनोरम दिसत होती. पण या झाडांचं वैशिष्ट्य म्हणजे काही झाडं अगदी पॅगोडासारखी दिसत होती. अगदी दुरून तर हिरव्या रंगाने रंगवलेल्या पॅगोडाचा निश्चित भास होई. तशाच पसरट फांद्या, वर निमुळता शेंडा. आणि काही झाडं म्हणजे खाली ओघळलेल्या फांद्यांची—कोकणात पाखी उतरलेली घरं असतात तशी. काही झाडं पांढऱ्या चंदेरी पानांची होती. ही गमतीदार झाडं पाहत पाहत आम्ही ‘ कोमो ’ सरोवराच्या काठावर उतरलो. दुसऱ्या काठावर राजवाडा आणि किल्ला बघण्यासाठी आणि तिथूनच ‘मार्जरी’ सरोवर पाहण्यासाठी आम्हाला बोटीतून जायचं होतं.

मी माझ्या सवयीप्रमाणे बोटीच्या उघड्या डेकवर चढून बसले. तलावाच्या सभोवार रेवदंड्याला जाताना दिसतात तशी नारळीची बनं असल्याचा भास होत होता. तशीच मोटमोठी उंच झाडं होती. माझ्या शेजारी दोन कॅनेडियन मुली आणि एक कॅनेडियन म्हातारी आजी बसली होती. मी सोनसळी रंगाचं बंगलोरी पातळ नेसले होते. डेकवर नुकताच पाऊस पडून गेल्याने

थोडं ओलं होतं. मी उभी होते, तिथेच त्या कॅनेडियन आजीबाई आल्या, आणि सारखं 'पातळ घर सावरून धर, पाण्यांत भिजतं आहे' असं म्हणून मला आग्रह करू लागल्या. मी म्हटलं, 'आजीबाई, आता पावसात ते भिजणारच; सारखं किती सावरून धरणार?' त्यावर आजीबाई अगदी टक लावून पाहत म्हणाल्या, 'अग, पण ते भिजलं तर फाटेल ना?' 'मी हे पातळ नेहमी धुते' असं सांगितलेलं आजीबाईंना पटेना, त्यांचं मन फारच बसलं त्या पातळावर. त्या शेवटी अगदी रागावून मला म्हणाल्या, 'एवढं सुंदर पातळ धुवायला तुला काहीच कसं वाटत नाही? मी आता सगळीकडे प्रवासाला निघाले आहे. भारतात आल्यावर असं एखादं पातळ घेईन, पण ते धुण्याचा वेडेपणा नाही करणार तुझ्यासारखा! ते मी जन्मभर न धुता तस्संच ठेवीन.'

मला आजीबाईंचं हसू येत होतं. पण आमची ही भारतीय पातळे धुतली म्हणजेच चांगली टिकतात हे त्यांना कसं समजावून सांगणार?

भारतीय वस्त्राबद्दलच्या त्यांच्या कल्पनेचं आश्चर्य करीत असतानाच त्या दुसऱ्या दोन मुलींनी तर मला फारच मोठा धक्का दिला. मी भारतीय आहे. मला दोन मुलं आहेत वगैरे सर्व बोलणं झालंच गप्पांच्या ओघात आणि त्यानंतर त्या दोघींनी दोन प्रश्नांचे बॉंब टाकले. एकीनं विचारलं—'का ग? तुझ्या घरी हत्तीचं पिल्लू असेल पाळलेलं?' या प्रश्नाबद्दलचं माझं आश्चर्य ओसरण्यापूर्वीच दुसरी म्हणाली, 'आणि काय ग, तुझी मुलं सापाशी खेळतात का?'

या प्रश्नांना काय उत्तर द्यायचं? भारतीय माणूस ओळखायचा म्हणजे हत्ती, साप आणि योग ही त्याची लेबलं. आपल्या देशाबद्दलच्या अशा कितीतरी विलक्षण समजुती आढळल्या त्या लोकांमध्ये मला.

पण या प्रश्नांमुळेच माझी आणि त्या मुलींची फार दोस्ती जमली. आम्ही फिरत असताना तिथल्या किल्ल्यातल्या माळ्याने आम्हांला काही फुलं दिली. या दोघींपैकी एकीने त्यातली घंटी जास्वंदीची फुलं आपल्या कानांवर अडकवली. मी तिला म्हटलं, 'आमच्या कोकणांत अष्टभुजा देवीचं एक देऊळ आहे. त्या देवीच्या कानांवर अशीच फुलं वाहतो आम्ही, तेव्हा या क्षणापुरती तू अष्टभुजा देवीच आहेस—फक्त आठ हात नाहीत....'

त्यावर लगेच त्या खट्याळ पोरीने तिच्या मैत्रिणीचे, माझे, त्या म्हाताऱ्या आजींचे आणि स्वतःचे हात एकत्र खांद्याखालून अडकवले आणि म्हणाली, ‘ बघ, आता झाले ना मी तुझी खरी आठ हातांची देवी ? ’

अशाच गंमती जमती करीत आम्ही रात्री परत आलो. थोडा वेळ हॉटेल-मध्ये टेलिव्हिजनचा कार्यक्रम पाहिला आणि आता उद्या लंडनला जायचं या विचारात झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी माझं लंडनचं विमान दुपारी २ वाजता मिलानहून सुटणार होतं. मिलान शहरापासून विमानतळ बराच दूर होता म्हणून मला १२ वाजताच रेल्वेस्टेशनवर बससाठी जावं लागलं. आमच्या सहकाऱ्यांपैकी कोणीच माझ्याबरोबर येणार नसल्याने मी जरा जड अंतःकरणाने सर्वांचा निरोप घेतला आणि स्टेशनवर येऊन विमान कंपनीच्या बसमध्ये बसले.

विमानतळावर पोचेपर्यंत आता दोन तास बसमध्ये आणि नंतरही पुढे दुसरी ओळख होईपर्यंत मी एकटी. आतापर्यंत ज्यांच्याबरोबर इतका प्रवास केला त्यांचा सहवास संपला, या विचाराने मन उदास झालं होतं.

विमानतळावर पोचेपर्यंत बसमध्ये इटलीच्या वास्तव्याचे विचार सारखे मनात येत होते. रोमची भव्य देवळं, फ्लॉरेन्सची फुलं, व्हेनिसचा तलाव आणि मिलानच्या इमारती यांच्या आठवणींनी मनात गर्दी केली होती. या प्रवासात भेटलेल्या माणसांच्या मूर्ती मनश्चक्षूंपुढे साकार होत होत्या. लिलिया गोड हसत होती, श्री. पावलोनी दिलखुलासपणे बोलत होते, म्हातारी कॅनेडियन आजी माझं पातळ सावरून भरीत होती. आतापर्यंत अनुभवलेल्या, पाहिलेल्या सर्व स्थळांच्या, प्रसंगांच्या, व्यक्तींच्या स्मृतिलहरी उसळत होत्या, फेसाळत होत्या. त्यांच्यात रंगून जाऊन, कधी न पुसल्या जाणाऱ्या अशा स्मृती मनावर कोरून घेत मी भव्य, उदात्त, विशालहृदयी व सौंदर्यपूर्ण इटलीचा निरोप घेतला आणि लंडनच्या विमानात चढले. विमान सुरू झाल्यावरदेखील लंडनचे विचार मनात येण्याऐवजी इटलीचेच विचार कितीतरी वेळ मनात तरळत होते. कारण या सर्व स्मृती कधीही न पुसल्या जाण्याइतक्या खोलवर आणि हळुवारपणे माझ्या मनावर कोरल्या गेल्या आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ... * * *



## ४.

लंडनच्या विमानतळावर मी पाऊल टाकलं ते काहीशा आत्मविश्वासानंच ! आत्मविश्वास होता भाषेबद्दलचा.भाषेच्या अडचणीची चुणूक मी माझ्या इटलीच्या वास्तव्यात थोडीशी अनुभवली होतीच. आणि पुढे इतर देशांच्या प्रवासात ती चांगलीच अनुभवाला येणार होती. पण निदान लंडनच्या वास्तव्यात तरी मनमोकळेपणे बोलायला मिळणार ही जाणीव काही कमी सुखद नव्हती.

यापुढे कोणत्याही देशात गेलं तरी हॉटेलात न राहता एखाद्या कुटुंबात राह्यचं असं मी मनाशी पक्कं ठरवून टाकलं होतं. कारण एक तर आता आमचा सबंध ग्रूप, ' कोई यहाँ गया कोई वहाँ गया ' असाच फुटणार होता. मी जे देश माझ्या पुढच्या प्रवासासाठी निवडले होते त्या देशांत आणि माझ्याच क्रमाने कोणीही येणार नव्हतं. त्यामुळे आता एकटंच पुढं जायचं ही एकलेपणाची भावना जरी मन अस्वस्थ करून सोडणारी होती तरी

देखील लंडन म्हणजे काही फारसं परकं नाही; तिथली भाषा आपलीच आहे, तिथले लोक वर्षानुवर्षे आपल्याला दुरून का होईना पण परिचित आहेत हा विचार थोडा दिलासा देणारा होता. तरीदेखील एकलेपणाची भावना सतावू नये, हिंडाफिरायला बरोबर कोणीतरी असावं आणि कुटुंब-जीवन थोडंसं बघता यावं या सर्वांचा विचार करून मी कुटुंबात राहणंच पसंत केलं.

पण सुरुवातीला विमानतळावरून उतरून एखादं घर गाठीपर्यंत कुठेतरी मुक्काम करणं भाग होतं. माझ्याजवळ भाई नेरूरकरांचा पत्ता होता. फक्त पोस्टाचा पत्ता. पण मी काही जास्त विचार न करता माझं सामान टॅक्सीत घातलं आणि टॅक्सीवाल्याला पत्ता सांगितला; पण सांगताना जसं काही लंडन आपल्याला पूर्ण माहीत आहे असा उसना झोक मी आणला होता. कारण, ' प्रवासात एकटं अनोळखी ठिकाणी जायचं असेल तर टांगेवाल्याला आपल्याला सगळी माहिती आहे असं भासवावं म्हणजे तो फसवीत नाही ' हा माझ्या मामांनी १९३५ साली मला शिकवलेला नियम मी पूर्णपणे लक्षात ठेवला होता. माझा उसनेपणा टॅक्सीवाल्याला जाणवला नाही. आणि त्याने मला चार पाच वेळा रस्ते मागंपुढं होऊन, वळणं घेऊन भाईंच्या घरी आणून सोडलं. सुखरूप माझं सामान उतरून घेतलं, टॅक्सीवाल्याचं भाडं चुकतं केलं आणि मी ज्या वेळी पमा–निमाशी गप्पा मारायला सुरुवात केली तेव्हा सुटकेचा दीर्घ निःश्वास सोडला; कारण बाहेरून उसनं अवसान आणलं होतं खरं पण आत छातीत सारखं धडधडत होतं. शेवटी मला अभिनयकला शिकवणाऱ्या आमच्या नाट्यशिक्षक वीरकरांना मी मनोमन नमस्कार केला. भाईंना जेव्हा मी एकटी घर शोधीत आल्याचं कळलं, तेव्हा ते म्हणाले ' तू एकटीने अगदी प्रथमच लंडनला येऊनही हे उपनगरातलं घर शोधलंस कसं हे कोडं काही मला उलगडत नाही. ' आणि भाईंना पडलेलं कोडं मला तरी कुठे अजून उलगडलं आहे ?

दुसऱ्या दिवशी मी रसेल स्क्वेअर विभागात मिसेस कॉलकोन नावाच्या बाईंच्या घरी मुक्काम ठोकला. रसेल स्क्वेअरमध्ये शिरल्याबरोबर मला मी दादरच्या हिंदु कॉलनीत तर नाही, असा भास झाला. हिंदु कॉलनीतले मोठ-मोठे वृक्षच काय ते फक्त इथे नव्हते. पण तिथल्यासारखाच, त्या वाता-

वरणातला घरगुतीपणा, आत्मीयता, तीच शांतता मला इथे या भागात प्रत्ययाला येत होती. आपल्या घराच्या पलीकडे ते अहोबाई काळयांचं तर घर नाही ? आणि कोपऱ्यावरचं घर तर अंबूचं असावं ! आत्ता ती बहुतेक तिच्या पद्धतीने डावा हात कडीला धरून दाराच्या चौकटीत उभी राहील. अर्थात् या सगळ्या कल्पनाच असल्या तरी त्यांनी माझा उरलासुरला परकेपणाही घालवला आणि मी माझ्या खोलीत प्रवेश केला.

खोली सुरेख होती. बस्स ! एवढंच तिचं वर्णन. जास्त वर्णनाची गरजच नाही. माझं लंडनचं वास्तव्य फार मजेत जाणार असल्याचे एकेक साक्षात्कार प्रथमपासूनच घडत होते. मी या घरी माझी बॅग घेऊन मुक्काम ठोकण्यासाठी गेले तेव्हा रात्र झाली होती. त्या घरी आणखीही एक दोन विद्यार्थी आणि एक विद्यार्थिनी राहते असं मला समजलं होतं. पण त्यांची ओळख करून घेण्याची उत्सुकता मला दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत थांबवून धरणं भाग होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्या कल्पनेप्रमाणं मी अगदी लौकर उठून चहापानाच्या खोलीत गेले. तिथं एका टेबलाजवळ एक बाहुली बसली होती. पण अगदी खरीखुरी हं ! गोरीपान-ठेंगणी, नाजुकशी. ती बाहुली मला एकदम आवडली. मिकॅडो सिनेमातल्या ' यमयम 'प्रमाणं वाटली ती मला. पण मला ती आवडली असली तरी मी तिला आवडेन की नाही हा प्रश्नच होता. अर्थातच मी भीतभीत, जरा संकोचानं तिला 'तुमच्यासमोर मी बसू का ?' म्हणून विचारण्याच्या बेतात होते. एवढ्यात तिनं एकदम उठून मला, ' गुडमॉर्निंग ' म्हटलं. तिचे चंबूसारखे लहानसे ओठ अगदी किंचितच विलग झाले, हसरे डोळे चकाकले आणि स्नेहाची भाषा बोलू लागले. माझा संकोच पार कुठल्याकुठं पळाला आणि मी तिच्यासमोरच्या खुर्चीवर जाऊन बसले.

त्यानंतर ती माझ्याशी थोडा वेळ काहीतरी बोलत होती. ते मला समजत होतं पण काहीच उमजत नव्हतं. इतकी मी तिच्याकडे बघण्यात गुंग होऊन गेले होते. ती फिलिपाईन असल्यानं तिच्या चेहऱ्याची ठेवण गमतीदार होती. पण फारच आकर्षक. त्यामुळं त्या दिवशी मी आपली 'हां, हूं' एवढंच उत्तर देत होते तिच्या प्रश्नांना. दुसऱ्या दिवसापासून मात्र माझी आणि तिची खूप गट्टी जमली. दुसऱ्या दिवशी तिनं माझ्यासाठी तिच्यासमोरची खुर्ची राखूनच ठेवली होती. आज मी तिला तिचं नांव विचारलं. ती

म्हणाली, " फिलोमिना आंबस." फिलोमिना हे नाव तिला अगदी सार्थ होतं. कारण फिलोमिना म्हणजे तिच्या भाषेत 'बिल्व्हेड–'

पण यानंतर मात्र मी तिला म्हटलं, " हे बघ फिलोमिना, तुझं नाव तुला अगदी हुबेहूब शोभतं. कारण माझ्यासारख्या एका स्त्रीलासुद्धा तू कालपासून अगदी मोहून टाकलं आहेस. पण तुझं आडनाव मात्र तुला मुळींच शोभत नाही—आमच्या भाषेप्रमाणं."

" का ग ? काय त्याचा अर्थ तुमच्या भाषेत ? " तिनं विचारलं.

मग मला जरा तिची, तिच्या कॉफी पिण्याची चेष्टा करण्याची लहर आली आणि मी तिला म्हटलं, " हे बघ, तू एक कप कॉफीत पाच चमचे साखर घालतेस, तेव्हा तूं ' आंबस '– म्हणजे आमच्या भाषेतल्या अर्थानं ' आंबट ' कशी असशील ? "

यावर ती जरा विचार करीत होती. तिच्या हातातली साखरेची बरणी–पुन्हा दुसऱ्या कॉफीच्या कपात साखर घालताना आखडल्यासारखी झाली. तेव्हा मात्र मला राहवेना आणि ही चेष्टा बाजूला ठेवून मी तिच्या आवडी-प्रमाणं बरणी वाकडी करून पाच चमचे साखर तिच्या कपात पाडून म्हटलं– " फिलोमिना, अग मी तुझी चेष्टा केली. मला म्हणायचं होतं ते या अर्थानं नव्हे. पण खरोखरच तुझं हसणं आणि वागणं इतकं गोड आहे की त्या अर्थानं तुला हे तुझं आडनाव शोभत नाही."

यानंतर मात्र आमच्यातला परकेपणा फार कुठच्या कुठं पळाला. आम्ही जणू खूप जुन्या, कित्येक वर्षांच्या मैत्रिणी असल्याप्रमाणं आम्हांला वाटायला लागलं. नंतर मी तिथं वीस दिवस होते. या दिवसांत एकमेकींबरोबर चहा घेतल्याशिवाय, जातायेता एकमेकींच्या खोलीत डोकावल्याखेरीज आम्हांला चैनच पडेना. ' पुनर्वसाहत ' या विषयाची शिष्यवृत्ती घेऊन ती तिथं अभ्यासासाठी आली होती. तिच्या सहवासात माझा वेळ कसा गेला समजलंही नाही.

या मैत्रीच्या भावनेमुळं नंतर आम्ही लंडनमध्ये एकमेकींबरोबर खूप हिंडलो; कितीतरी गोष्टी पाहिल्या. लंडनचा प्लॅनिटोरियम् पाहताना आकाशातील असंख्य तारकापुंजांच्या तेजानं मुग्ध झालो, मादाम तुसाचा मेणाचा चित्र-संग्रह–छे ! मूर्तिसंग्रह पाहताना आश्चर्यानं भारावून गेलो. टेम्सच्या किनाऱ्या-

किनाऱ्यानं एकमेकींच्या गळ्यात हात घालून हिंडलो. नदीच्या लहरींबरोबर आमची मनंही उचंबळून येत होती.

घरांत गप्पा मारायला सुरुवात केली की 'रात्रिरेवव्यरंसीत्!' या उक्ती-प्रमाणं आमचे तासचे तास निघून जात पण गप्पा संपत नसत. तिनं मला तिच्या घरच्या सर्व माणसांची माहिती सांगितली. कितीतरी अगदी घरगुती गोष्टी सांगितल्या आणि मीही तिला सांगितलं, "माझ्या मुलांना तू फार आवडशील."

आम्ही आता फक्त दोघीच एकमेकींना ओळखत नाही तर आमच्या दोन्ही घरांचाही एकमेकींना परिचय झाला आहे. जणू काही आम्ही एक-मेकींच्या घरात गेलो आहो, बसलो आहो, हिंडलो फिरलो, राहिलो आहोत इतकी जवळीक, इतका आपलेपणा आता आम्हा दोघींच्या मनांत निर्माण झाला होता. आम्ही दोघी आता जिवलग मैत्रिणी झालो आहोत. तिच्या माझ्या घराचा आणि व्यक्तिमत्त्वाचा कानाकोपरा आता एकजीव झाला आहे. परस्परात मिसळला गेला आहे.

लंडनमध्ये हिंडायला सुरुवात केल्यावर एवढ्या मोठ्या शहरात कोणताही पत्ता अगदी नवख्या माणसाला सुद्धा किती सहजपणं सापडणे शक्य होतं ते पाहून मला फार आश्चर्य वाटलं. ठिकठिकाणी नकाशे, रस्त्यांच्या व्यवस्थित पाट्या आणि कोपऱ्याकोपऱ्यांवर उभे असलेले बॉबीज् म्हणजे चौकशी पोलीस!

यांना 'बॉबीज्' का म्हणतात असं विचारल्यावरून मला समजलं होतं की इंग्लंडचे एक पंतप्रधान रॉबर्ट पील यांनी या पोलीस संस्थेची मजबूत पायावर उभारणी केली. रॉबर्ट म्हणजे बॉबी-यावरून या पोलिसांना 'बॉबी' हे नाव पडलं.

या बॉबी पोलिसांची एक गंमत सांगते. जरा कुणी नवखं माणूस एखादा पत्ता शोधताना दिसलं तर हे लगेच येऊन विचारतील, "कोणता पत्ता आपल्याला हवा आहे?" आपण सांगितल्यावर लगेच कोटाच्या खिशातून डायरी काढतील, नकाशा बघतील आणि आपल्याबरोबर येऊन तो पत्ता शोधून देतील. एक दिवस मला श्री हर्बर्टसन नावाच्या माहितीपट तयार करणाऱ्या गृहस्थांना भेटायला जायचं होतं. "रीजंट स्ट्रीटवरून सरळ दोन चौक पुढे या आणि उजव्या हाताच्या बोळात तुम्हाला आमचं ऑफिस सापडेल" असं हर्बर्ट-

सन यांनी मला टेलिफोनवर सांगितलं होतं. मी उजव्या, डाव्या हाताचे सगळे बोळ पालथे घातले पण मला ते ऑफिस सापडेना. शेवटी मी बॉबीजची मदत घ्यायचं ठरवलं. त्यांनी नेहमीच्या सवयीने खिशातली डायरी काढली आणि 'चला' म्हणून मला बरोबर यायला सांगितलं. पण त्यांचीही स्थिती माझ्याचसारखी झाली. खूप हिंडूनही ती इमारत सापडेना. इतक्यात हर्बर्टसन स्वतःच एका बोळातून बाहेर येत होते ते त्यांना दिसले. मी त्यांना प्रत्यक्ष ओळखतच नव्हते. पण त्याच भागातले हे पोलीस त्यांना ओळखत होते. त्यांना मी मला हर्बर्टसनना भेटायचं असल्याबद्दल सांगितलं होतं. त्यामुळे त्यांनी लगेच त्यांना पाहून थांबवलं आणि म्हटलं, "बाईसाहेब, ऑफिस नाही, पण आम्ही आपल्याला ऑफिसर गाठून देत आहोत हे." असं म्हणून त्यांनी माझी श्री. हर्बर्टसन यांच्याशी गाठ घालून दिली. शिवाय त्यांच्यापैकी एकजण—प्रत्येक ठिकाणी या बॉबीजची जोडगोळी उभी असते—आमच्याबरोबर आला. अगदी समोरच्या बोळातच असलेल्या ऑफिसच्या इमारतीचं नाव त्याने छोट्या डायरीत टिपून घेतलं, नकाशा काढला आणि पुढे 'इंडियन लेडी' असे लिहून मला दाखवले. मी 'हे काय?' म्हणून विचारल्यावर तो म्हणाला, "आज जर तुम्ही विचारलेला पत्ता आम्ही शोधून, तुमची हर्बर्टसनशी गाठ घालून देऊ शकलो नसतो तर ती मोठ्या नामुष्कीची गोष्ट होती. आणि तसंच होणार होतं, पण ते टळलं. तेव्हा याची आठवण म्हणून हे लिहिलं आहे. आणि पुढच्या एका आठवड्यात मी आसपासच्या सर्व इमारतींची नांवे तोंडपाठ करणार आहे. आम्ही बॉबीज असूनही आमच्या कामात कमी पडलो याची ही आठवण म्हणून आपला 'इंडियन लेडी' असा संकेत लिहिला आहे." हे सगळं बघितल्यावर मला वाटलं की एखाद्या नवख्या माणसाने चुकायचं म्हटलं तरी त्याला चुकू द्यायचं नाही असा लंडन शहराचा निर्धार असावा.

पण हा निर्धार एका बाबतीत मी मात्र खोटा पाडला हं! एक दिवस मी चुकले आणि तीदेखील वेड्यासारखी. त्या वेळी मात्र मला वाटलं की, अशी आधुनिक एका आकाराचीं बांधकामं असण्यापेक्षा प्रत्येकाचे आकार आणि स्वरूप वेगळे असणारे आमच्या पुण्याचे बोळच चांगले. पुण्याला जरी विचारलेला पत्ता आणि रस्ता बरोबर न सांगता डाव्याऐवजी उजव्या हाताला

जा म्हणून सांगणारे लोक रस्त्यात भेटत असले तरी प्रत्येक बोळ इतक्या वेगळ्या स्वरूपाचा आहे की त्यामुळे तरी नवखा माणूस चुकत नाही. पण त्या दिवशी मी भुयारी आगगाडीच्या बोळात ( Subway ) चुकले; अगदी वेड्यासारखी चुकले.

पिकॅडिली सर्कसमध्ये काही खरेदी करून झाल्यावर मी आणि फिलोमिना घरी जायला निघालो होतो. तितक्यात मला रेल्वेगाईड घ्यायची आठवण झाली. मी फिलोमिनाला एका बोळाच्या तोंडाशी उभं राहायला सांगून आत्ता येते गाईड घेऊन म्हणून सांगितलं आणि रेल्वेच्या स्टेशनात उतरले. गाईड घेऊन बोळातून बाहेर पडले. पण बोळाच्या तोंडाशी फिलोमिना नव्हती. मी क्षणभर तिच्यावर रागावलेसुद्धा आणि पाच मिनिटं तिथे थांबले. पण तरीही तिचा पत्ता नाही. शेवटी मी दुसऱ्याच तर बोळानं बाहेर पडले नाही ना अशी शंका येऊन पुन्हा स्टेशनात उतरले आणि दुसऱ्या बोळातून बाहेर आले. तिथेही फिलोमिना दिसेना. यानंतर मात्र जवळजवळ १५ मिनिटं वेगवेगळ्या बोळातून आतबाहेर करीत होते; पण मला फिलोमिना एकाही बोळाच्या तोंडाशी दिसेना. शेवटी मी अगदी थकून तिथेच उभी राहिले तर आमच्या मैत्रीणबाई समोरून रस्ता ओलांडून येत होत्या. म्हणजे जवळजवळ १५ मिनिटं सगळ्या बोळकंड्यांचा मी प्रवास केला, पण प्रथमच एक बोळ चुकल्यामुळे चक्क दुसऱ्या दिशेला बाहेर पडले होते. आता हेच जर बोळ वेगवेगळ्या खुणांचे असते तर !

लंडनला माझे दिवस फार मजेत जात होते. दिवसा म्हणजे सकाळी B.B.C. वर काम बघायला जायचं. तिथलं रेकॉर्डिंग, T. V. सर्व गोष्टींची माहिती करून घ्यायची आणि दुपारी १॥ वाजता जेवून भटकायला सुरुवात करायची. लंडनला कुठेही बसण्याची परवानगीच नाही. कारण बसायला जागाच नाही. रेल्वे स्टेशनात प्लॅटफॉर्मवर देखील बाकं नाहीत. सतत चालत–किंवा तिथल्या लोकांच्या वेगवान जीवनाकडे पाहिलं तर सतत पळत राहायचं, दिवसभर. ऑफिसमध्ये किंवा परवडत असेल तर एखाद्या हॉटेलात बसून चहा घेण्यासाठी बसाल तर तेवढीच पायांना विश्रांती. एरवी अखंड पायपीट.

पिकॅडिली सर्कस म्हणजे लंडनचा सर्वांत मोठा गजबजलेला चौक. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी फिरते जिने असलेली सेल्फ्रिजिस सारखी भव्य दुकानं

आहेत लंडनमध्ये. पण मला मोह पडला तो तिथल्या दुकानातल्या मॉडेल्सचा. कपड्यांच्या दुकानातली मॉडेल्स हा प्रकार मी प्रथम पाहिला तो १९३५ साली. पुण्याच्या बुधवार चौकातले कापडवाले गीते यांच्या दुकानात त्या वेळी एक वटवटीत डोळ्यांची बाई उंच मान करून काचेच्या कपाटात ताठ उभी असायची, अंधारांत पाह्यलं तर भीतीच वाटेल अशी. तिच्या अंगावर रोज वेगवेगळ्या साड्या नेसवलेल्या असत आणि दुसरं मॉडेल म्हणजे अनंत शिवाजी देसाई यांच्या टोप्यांच्या दुकानातली जांभळी जरीची टोपी डोक्यावर घातलेला एक हातमोडका बेढब आकाराचा मुलगा. 'कपड्यांच्या दुकानातली मॉडेल्स म्हणजे अशी असतात' हे त्या काळीं मनावर उमटलेलं चित्र. आणि त्यानंतरही इतक्या वर्षांत कधी फारशी उत्तम मॉडेल्स पाहिलेली मला आठवत नाहीत. पण मी पिकॅडिली सर्कसमधली मॉडेल्स पाहिली आणि यांना मॉडेल्स का म्हणायचं ते समजेना. इतकी ती खरी दिसतात. हातावर झोकात ओढणी-सारखं उपवस्त्र टाकलेली हसतमुख मुलगी, आपल्या झग्याचा घोळ पसरून बुटाचे बंद बांधणारी सुंदर युवती, एकमेकींच्या कपड्यांची चर्चा करीत जणू काही एकमेकींशी बोलत असलेल्या दोघी मुली—ही सर्व भावाविष्कार करणारी मॉडेल्स पाहिली आणि 'आकर्षकपणा हेच आमचं वैशिष्ट्य' अशी नुसती पाटी लावणाऱ्या आमच्याइकडच्या काही दुकानांची मला कीव आली. त्याचबरोबर आपले गुण बोलून दाखवायचे नसतात, प्रकट करायचे असतात हे कुठेतरी वाचलेलं सुभाषित पुन्हा एकदा पटलं.

मात्र ही सर्व शोभा सकाळीं ९ नंतर रात्रीपर्यंतच हं! अगदी सकाळी दुकान उघडण्यापूर्वी मात्र ही मॉडेल्स बघवत नाहीत. एखादं नुसतंच धड, तर एखादं काठीवर नुसतंच डोकं, किंवा एखाद्या मॉडेलचे हातपाय काढून ठेवलेले. एकदोनदा अगदी सकाळीं हे दृश्य पाहिल्यावर मला वाटलं की, या दुकानदारांना सांगावं या मॉडेल्सचा साजशृंगार होईपर्यंत दुकानांच्या काचांना पडदे लावीत जा.

लंडनच्या माझ्या भटकंतीमधला मादाम तूसाच्या मेणाच्या चित्रसंग्रहालयांतला प्रसंग माझ्या मनावर कायमचा कोरला गेला आहे. मी मादाम तूसाचं चरित्र वाचलं होतं. या बाईबद्दल एक प्रकारचं कौतुक, तिच्या कलेबद्दल आदर आणि मारी आंत्वोइनेचं प्रत्यक्ष धडावेगळं मस्तक समोर ठेवून, अंतःकरण

दगडाचं करून मऊ मेणाचा तिचा पुतळा घडवताना तूसाला किती वेदना झाल्या असतील, या कल्पनेने तिच्याबद्दल वाटणारी अनुकंपा—या भावना जवळ बाळगूनच मी तिथं प्रवेश केला. मानवी मनाच्या कल्पनेपलीकडच्या आहेत या कलाकृती. ब्लडी मेरी, क्वीन ऑफ स्कॉट्सचा शिरच्छेद घडवून आणीत असतानाचं दृश्य टचकन डोळ्यांत पाणी आणणारं आहे. मेरीच्या डोळ्यांतली आर्तता पाहून वाटतं—आत्ता असंच पुढे जावं आणि तिला त्या लाकडी ठोकळ्यावरून बाजूला करावी.

या ऐतिहासिक प्रसंगापासून तर अगदी मॅरलिन मन्रोपर्यंत सर्व तऱ्हेचे पुतळे हे लंडनचं फार मोठं वैभव आहे असं वाटतं. आता मादाम तूसाचा नातू तिचं काम पुढं चालवीत आहे.

हे पुतळे किती हुबेहूब आहेत याचं प्रत्यंतर हवं असेल तर मी अनुभवलेला प्रसंगच सांगायला हवा.

मी आणि फिलोमिना हा चित्रसंग्रह पाहायला गेलो. वरच्या मजल्यावर चढताना जिन्याच्या कोपऱ्यावर एक शिपाई इतिहासकालीन पोशाखात उभा होता. मला वाटलं, तो माझ्याकडे पाहून हसला आणि मी एकदम हसून त्याला ' गुडमॉर्निंग ' म्हटलं. काय झालं ते काही मला समजलं नाही पण माझ्या मागची पुढची दहा बारा माणसं एकदम हसली तेव्हा माझ्या लक्षात आलं की मी त्या जिन्यावरच्या मेणाच्या पुतळ्यालाच गुडमॉर्निंग म्हटलं होतं.

संपूर्ण चित्रसंग्रह पाहून परत येताना उतरण्याच्या जिन्यावर पुन्हा दुसरा मेणाचा शिपाई उभा होता. मला काही वेळापूर्वीची फजिती आठवली आणि उतरताना तो शिपाई माझ्याकडे बघून हसतो आहे असं वाटूनही पुन्हा फजिती नको म्हणून मी तशीच पुढे जायला लागले—मोठ्या अभिमानाने—आणि पुन्हा बरीच माणसं हसली. मला समजेना, आता काय चुकलं—पण खरंच, आता चुकलं होतं. कारण आता तो शिपाई मला हसून ' गुडमॉर्निंग मॅडम ' म्हणत होता. मी ज्याला खरा शिपाई समजले तो पुतळा होता आणि पुतळ्यासारखा दिसणारा शिपाई खरा होता. या प्रसंगाचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की नंतर कुठेही तिकिट ऑफिसमध्ये, एखाद्या हॉटेलात, एखाद्या दुकानात कोणीही जरा स्तब्ध व्यक्ती दिसली की माझ्या मनात विचार यायचा, खरा ? की पुतळा ?—नंतर अशी तुलना करण्याचा

चालाच जवळजवळ आठवडाभर मला लागला म्हणा ना !

अशाच तऱ्हेचे पुतळ्यासारखे स्तब्ध उभे राहणारे शिपाई मला बकिंगहॅम पॅलेसच्या प्रवेशद्वाराशी दिसले. या शिपायांचा जवळजवळ सबंध चेहरा त्यांच्या डोक्यावरच्या काळ्या केसाळ टोपीने झाकलेलाच असतो. त्यामुळे क्वचित पापण्यांची हालचाल होऊन जिवंतपणाची काही निशाणी दिसली असती तीही नाही. फक्त पहारा बदलताना ते ताठ चालत दुसऱ्या ठिकाणी जातील तेवढीच हालचाल.

हा राजवाडा बघायला गेले असताना लंडनच्या हवेनं मला आपला पराक्रम दाखवला. मी घरून निघाले तेव्हा लख्ख ऊन्ह पडलं होतं. पण छत्री आणि ओव्हरकोट सतत जवळ बाळगायचा, कारण लंडनची हवा फसवी असते हे मी ठरवूनच टाकलेलं होतं. या राजवाड्याच्या समोरचा बराचसा रस्ता सरळ, मोकळा आहे. दोन्ही बाजूंना उंच झाडं आणि मधून जाणारा मोकळा रस्ता. मी या रस्त्यावरून अगदी सकाळी निघाले होते. अंगावर कोवळं ऊन्ह येत होतं. वारा गार होता पण झोंबत नव्हता. मी अगदी मजेत चालत होते. समोर एका फर्लांगावर राजवाडा दिसत होता. आत्ता पटकन् तिथे पोचायचं आणि सैनिकांची रोज सकाळी तिथे होणारी कवायत बघायची असा माझा बेत होता. पण मी अर्ध्या रस्त्यावर आले आणि एकदम जोराचा वारा सुटला. चौफेर पानं उडायला लागली. धुकं भरून आल्यासारखं वाटलं आणि टप्टप् मोठाले पावसाचे थेंब पडायला सुरुवात झाली. वरं, वाटेत कुठे थांबायलाही जागा नाही. मघाशी मजेत चालताना चांगला वाटलेला मोकळा रस्ताच आता एकदम फार गैरसोयीचा वाटू लागला. पण तसेच चालत राहिल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. मी लगेच अंगावर कोट चढवला, छत्री उघडली आणि पुढे चालू लागले. आता कवायत बघण्याची चांगली संधी या पावसाने हुकणार असं मला वाटायला लागलं होतं. एका दृष्टीने माझी फार निराशा झाली होती. पण मी आणखी अर्धा फर्लांग अंतर चालून राजवाड्यासमोर पोचले आणि हवेने आपला लहरीपणा पुन्हा दाखवला. समोर पाहिलं तर बकिंगहॅम पॅलेस उन्हात चमकत होता. रस्त्यावर काही क्षणांपूर्वी पाऊस पडल्याचा मागमूसही नव्हता आणि बॅंडचे स्वर कानांवर येत होते. पाठोपाठ सैनिकांची फेरी आली आणि मी ते संचलन


अगदी मनसोक्त पाह्यलं. छत्री आणि कोट यांचं ओझं वाटावं इतकी हवा स्वच्छ होती. इतक्या व्यवस्थित, साचेबंद आणि तोलून मापून वागणाऱ्या इंग्रज लोकांच्या देशातली हवा तेवढी इतकी लहरी कशी ? हा प्रश्न माझ्या मनात आल्याशिवाय राह्यला नाही. या हवेचं बघून तरी इंग्रज माणसांनी थोडं वेड्रूट वागायचं होतं ! पण इंग्रज म्हणजे अगदी मोजकं बोलणारा. ते देखील ओळख झाल्यावरच. आपणहून कुणाशी ही माणसं मोकळ्या मनाने बोलणार नाहीत पण एकदा ओळख झाल्यावर मात्र मनमोकळेपणाने बोलतील, हसतील, तुमची चौकशी करतील, तुम्हाला वाटेल ती मदत करतील. फक्त त्यांच्या संकोची स्वभावाची भिंत एकदा फुटायला हवी.

याचा एक मजेशीर अनुभव मला लंडनच्या एका उपाहारगृहात आला. मी एका कोपऱ्यात एक टेबल रिकामं होतं तिथे जाऊन बसले. इतक्यात एक तरुण इंग्रज जोडपं त्या उपाहारगृहात शिरलं. भारतीय पदार्थांची चव घेण्याच्या इराद्याने आज ती दोघं प्रथमच या उपाहारगृहात आली होती. फक्त माझ्या टेबलावरच्याच इतर तीन जागा रिकाम्या होत्या. त्या दोघांपैकी सौ. ने मला खुणेनेच तुमच्याजवळ बसू का असं विचारलं. एखाद्या टेबला-जवळ जागा रिकामी असली तरी "आपली हरकत नसेल तर !" असं आधी बसलेल्या व्यक्तीला परवानगीदाखल विचारून मगच बसण्याचा शिरस्ता आहे. मी परवानगी दिल्यावर ती दोघं स्थानापन्न झाली. मेन्यूकार्ड वेटरनं त्यांच्या-जवळ आणून दिले. पण तिकडच्या विदेशी पदार्थांच्या नुसत्या नावावरून मला जसा काहीच बोध होत नसे तसंच त्यांचेही या भारतीय पदार्थांच्या नावाबाबत झालं होतं—पुलाव, चनाभटूरा किंवा परोठा 'म्हणजे काय ?' हे प्रश्नचिन्ह त्यांच्यापुढे होतं. मी अशाच अडीअडचणीतून गेलेली असल्याने त्यांच्या मदतीला आपणहून धावले आणि "वाटल्यास या बाबतीत मी तुम्हाला मदत करू शकेन" असं त्याना म्हटलं. त्यांना फारच आनंद झाला आणि त्यांच्यासाठी मागवण्याच्या पदार्थांची निवड करण्याची जबाबदारी त्यांनी माझ्यावरच सोपवली. त्या दोघांकडे बघून साधारण त्यांना काय आवडेल याचा मी अंदाजपंचेच निर्णय घेतला आणि दोनतीन पदार्थ मागवले. माझ्या सुदैवाने ते त्यांना आवडले आणि नंतर त्या दिवशी जेवण आणि गप्पा यांमध्ये आम्ही तिघं जवळजवळ दोन तास रंगून गेलो. एकदा

परकेपणाचा बांध मी फोडल्यावर त्या दोघांचाही संकोच कुठल्या कुठे पळाला. त्या पतिराजांना माझ्या ब्लाऊजचं कापड फार आवडलं आणि "तुला हा ब्लाऊझ फार छान दिसतो आहे" असं म्हणून त्यांनी सगळ्या वातावरणांत आणखीनच मोकळेपणा आणला. अशा तऱ्हेने स्त्रियांच्या कपड्यांबद्दल स्तुती करणं हे तिकडे सुसंस्कृतपणाचं लक्षण मानतात. मग ते कापड कसलं आहे याची चौकशी सुरू झाली. वास्तविक मी काही खादी वापरणारी नव्हे. पण रंग फार सुंदर, पक्के आणि उबदारपणा यासाठी मी खादीचे काही ब्लाऊझ शिवून घेतले होते. 'तो ब्लाऊझ खादीचा आहे' असं म्हटल्यावर आमची संभाषणाची गाडी महात्मा गांधी, पंडित नेहरू यांच्याकडे वळली आणि त्या दिवशीच्या संपूर्ण गप्पांमध्ये या दोन व्यक्तींनी खऱ्या इंग्रज माणसांच्या स्वभावाच्या विविध छटा माझ्या अनुभवास आणून दिल्या. आणि इंग्रज माणसं 'प्रारंभ-संकोची' असली तरी ओळख झाल्यावर दिलखुलास, हसरी, बोलकी आणि उदार मनाची असल्याचा एक नवाच साक्षात्कार मला घडला. आणि या त्यांच्या स्वभाववैचित्र्याचा मी नंतर पुष्कळच फायदा करून घेऊ शकले. माझं लंडनचं वास्तव्य यामुळे जास्त सुखकारक झालं.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................



५.

लंडनमध्ये मला गंमत वाटायची आणि त्याचबरोबर कौतुक वाटायचं ते संकेत-भेटीसाठी भुयारी रेल्वेच्या स्टेशनवर थांबणाऱ्या मुलींचं. या स्टेशनमध्ये संध्याकाळी ५ ते ७ या वेळात गाड्या भरपूर. मी एकदा मोजलं होतं तर अर्ध्या तासात ३७ गाड्या गेल्या. म्हणजे मिनिटाला एकपेक्षा जास्त. अशा या वेळेला स्टेशनमध्ये चौफेर गोलाकार असलेल्या दुकानांपुढे दुसरा एक फेर दिसायचा तरुण मुलांमुलींचा. गाडीतून उतरून येणाऱ्या मित्र किंवा मैत्रिणीला भेटायला उत्सुक झालेल्या, गर्दीत हव्या त्या व्यक्तीला अधीरपणे शोधणाऱ्या, भिरभिरत्या डोळ्यांनी चहूकडे न्याहाळणाऱ्या, शेजारच्या मुलीचा मित्र आला आणि आपला आला नाही की लगेच तिच्याकडे मत्सराने आणि निराशेने क्षणभर बघणाऱ्या आणि क्षणात स्वतःच्या मित्राने येऊन मिठी मारल्याबरोबर आनंदाने मोहरणाऱ्या या मुलांमुलींना बघून मला फार कौतुक वाटायचं. हा अगदी निरोगी प्रेमाचा आविष्कार बघून मन क्षणभर प्रसन्न

व्हायचं. कुठे चोरटेपणा नाही, दडपण नाही, काही नाही. आणि १०, १५ मिनिटांत या जोड्या स्टेशनबाहेर पडल्या की कसं लगेच उदास वाटायचं. आणि मनात यायचं हा निकोप मोकळेपणा आमच्या भारतीय तरुण पिढीत आला तर कितीतरी भेडसावणारे प्रश्न समाजातून नाहीसे होतील.

या मोकळेपणाला जीवनाचा स्वतंत्रपणाही कारणीभूत होत असेल काही अंशीं. कारण बऱ्याच लहान वयात ही मुलंमुली नोकऱ्या करून अर्थार्जन करू लागतात. विशेषतः स्त्री-जातीबद्दल बोलायचं झालं तर इटलीमध्ये बहुतेक मुली आणि स्त्रिया स्वतःच्या घराच्या कोषांत स्वतःला गुरफटून घेणाऱ्या आढळल्या तर इंग्लंडमध्ये विशेषतः लंडनमध्ये घराच्या चार भिंतींत स्वतःला चोवीस तास कोंडून घेणारी स्त्री आढळणे कठीणच. बहुतेक १६ ते ६० वर्षांपर्यंत सगळ्या स्त्रिया नोकरी करणाऱ्या. औषधांच्या, कपड्यांच्या, पुस्तकांच्या कोणत्याही दुकानात जा, विक्रेत्या मुली आढळतील. रेल्वेची तिकिटं विकणाऱ्या स्त्रिया, उपाहारगृहात विशेषतः सेल्फ सर्व्हिस हॉटेलात विक्रेत्या मुली, रेल्वेचं लिफ्ट चालवायलाही स्त्रिया असलेल्या मला आढळल्या. या गणवेषांतल्या स्त्रिया लंडनच्या कोणत्याही ठिकाणी नजर टाकली तरी दृष्टीस पडतील. वय कांहीही असो, कामात तीच तडफ, तोच उत्साह. मला वाटायचं इथल्या स्त्रियांजवळ अखंड उत्साहाची एखादी जादूची कांडी कुणी दिली आहे का ? सकाळी उठल्याबरोबर आपली ती कांडी अंगावरून फिरवावी आणि दिवसभर विजेच्या चपळाईने अखंड काम करीत राहावं. वयाच्या, श्रमाच्या कसल्याच मर्यादा नाहीत तिथे.

आणि मग या स्त्रियांबद्दलच्या कौतुकानं माझं मन भरून गेलं. इथं स्त्रियांनीं व्यापलेलं नाही असं क्षेत्रच नाही. स्त्रियांना अबला हे कायमचं विशेषण लागलेलं आहे. पण कमीतकमी शंभर माणसं असलेल्या लिफ्टचा दरवाजा तिथे काम करणारी स्त्री एका खटक्याने सहजगत्या उघडते आणि लावते तेव्हा त्या विशेषणाचं कवच आपोआपच फुटतं.

हा सहजपणा आणि उत्साह त्या जिथे काम करीत होत्या तिथे प्रत्येक ठिकाणी मला आढळला.

मला मोजे विकत घ्यायचे असल्याने मी एक दिवस एका दुकानात गेले. तिथल्या मुलीनं प्रथम हसून माझं स्वागत केलं. मी मागितलेले सर्व प्रकारचे

मोजे तिने माझ्यापुढे आणून ठेवले. आणि कदाचित मला इतरही काही तऱ्हा हव्या असतील म्हणून माझ्या पुढे आणून मांडल्या. प्रत्येक मोज्याच्या जोडीची किंमत आणि उपयुक्तता तिने समजावून सांगितली. पण मला एकही जोड विशेष पसंत पडला नाही. तरीही तिने जितक्या हसतमुखानं माझं स्वागत केलं तितकाच हसून मला निरोप दिला.

मी एखाद्या हॉटेलमध्ये गेले म्हणजे तर मला वाटायचं की गणवेष घातलेल्या जणू पाकोळ्याच सगळ्याभर भिरभिरताहेत. पण निरुद्देश नाही हं हे भिरभिरणं. कुणाला चहा, कुणाला कॉफी, कुणाला खाणं सगळं कसं चपळाईने, कुठेही गोंधळ, गडबड न होता मिळत असतं या पाकोळ्यांकडून! जरा एखाद्याला चहाचा कप द्यायला उशीर झाला तर तक्रार करण्याच्या उद्देशाने त्याच्या कपाळावर आठी पडण्यापूर्वीच त्या प्रथम त्याची क्षमा मागतील उशीर झाल्याबद्दल आणि त्यामुळे साहजिकच आठ्यांची जागा स्मिताने घेतली जाते.

हॉटेलमध्ये चहा देताना, दुकानात वस्तू विकताना, बसमध्ये तिकीट देताना, स्टेशनवर तिकिटं गोळा करताना, लिफ्ट चालवताना किंवा प्लॅटफॉर्मवर एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला ऐकू जाईल इतक्या चढ्या आणि खणखणीत आवाजात आगगाडीच्या ड्रायव्हरला सूचना देताना त्यांच्यांत अगदी एकप्रकारचा विशेष सहजपणा दिसतो. अतिश्रमानं त्यांचा उत्साह मावळत नाही, कामाच्या त्रासाने त्यांच्या चेहऱ्यावरची स्मिताची रेषा पुसली जात नाही. अगदी सतरा वर्षांच्या तरुण मुलीपासून ते सत्तर वर्षांच्या वृद्ध स्त्रीपर्यंत सगळ्याजणी जणू एखाद्या मंत्राने भारल्यासारख्या काम करीत असतात.

पण तो मंत्र त्यांना गुंगी आणणारा नसून त्यांना एक प्रकारची स्वत:च्या कर्तव्याची जाणीव करून देणारा आहे. त्या मंत्राचं संगीत त्यांच्या जीवनात खेळकरपणा, उत्साह, आनंदी वृत्ती भरून टाकीत असतं. तो मंत्र म्हणजे 'आपण हसुनी जगा हसविणे!'

या त्यांच्या मंत्रमुग्ध कार्यक्षमतेचा मला भास होत नसून ते किती सत्य आहे याचा प्रत्यय मला एकदा बसमध्ये आला. मी लंडनच्या एका उपनगरातून पिकॅडिली सर्कसला यायला निघाले होते. रात्रीचे आठ वाजले होते. स्टॉपवर जाऊन मी एका दुमजली बसमध्ये बसले. मी बसले तिथूनच बस सुटत होती.

बहुतेक सर्व बस भरली होती. मी जाऊन बसले आणि वेळ झाल्यामुळे कंडक्टरने घंटा वाजवली आणि बस सुटली. तिकिटासाठी पंचचा आवाज झाल्यावर मी पैसे काढले आणि कंडक्टरकडे दिले–खरं म्हणजे अगदी यंत्रा-प्रमाणे–पण एकदम माझ्या डोळ्यांसमोर चकाकले कुरळे पांढरे केस–रंगवून केलेले नव्हेत तर वयामुळे झालेले. एक जवळजवळ पन्नाशीची स्त्री कंडक्टर होती. दोन मजली बसमधल्या दोन्ही मजल्यांवरच्या उतारूंना तिकिटं देणं, बस थांबवणं–चालू करणं याचा इशारा देणारी घंटा वाजवणं, स्टॉप आला की त्याचं नाव सांगणं–सगळीं कामं ती इतक्या तरतरीतपणाने करीत होती की त्या पांढऱ्या केसातली ती तडफ पाहून मी थक्कच झाले. पुन्हा चेहऱ्यावर कंटाळल्याची दमल्याची जरासुद्धा निशाणी नाही. इतकंच काय, जो थोडा वेळ मध्ये सापडे तेवढ्या वेळात बसमध्ये आईच्या अगर बाबांच्या मांडीवर बसलेल्या लहान पोरांचं कौतुक करायचं काम एकीकडे चालू होतं तिचं. असा इतका उत्साह, तरतरी आणि कष्ट करण्याची शक्ती या वयातही या स्त्रियांमध्ये कशी असं मला नेहमी वाटत आलं आहे. जीवनाकडे बघण्याचा हा उत्साही आणि निरोगी दृष्टिकोनच एकंदर आयुष्याला सुखाची झालर लावायला उपयोगी पडत असला पाहिजे.

काय वाटेल ते झालं तरी आपला शब्द पाळण्याचा या लोकांचा आणखी एक गुण असल्याचं माझ्या अनुभवाला आलं. मी एकदा ट्रॅफलगार स्क्वेअर-मध्ये फिरायला गेले होते. तिथल्या कबुतरांची गंमत बघत मी हिंडत असताना एक म्हातारे आजोबा माझ्याजवळ आले आणि म्हणाले, ‘ हे बघ, ही कबुतरं तुझ्या हातावर बसली आहेत ना ती तशीच राहू देत. मात्र अंगावरचा कोट काढ आणि तुझा साडी नेसलेला फोटो मला काढू दे. माझ्या सुनेला साडी म्हणजे काय ते दाखवायचं आहे. आज अनायासे संधी मिळाली. ’ मला गंमत वाटली. मी कोट काढून हातावर घेतला आणि उभी राहिले. आजोबांनी फोटो काढून घेतला. माझे आभार मानले आणि म्हणाले, ‘ मी पूर्वी भारतात आलो होतो तेव्हा साडी म्हणजे काय ते पाहिलं होतं. पण माझ्या सुनेला मला नुसतं वर्णन करून सांगता येत नव्हतं. आता या फोटोचा मला उपयोग होईल. आणि तुझा इथला पत्ता दे, म्हणजे त्या पत्त्यावर मी फोटोच्या प्रती पाठवून देईन. ’ मी पत्ता दिला आणि घरी आल्यावर

विसरूनही गेले. अगदी अनोळखी माणसाने घेतलेला फोटो. तो सुद्धा त्याच्या कामासाठी. त्या फोटोच्या प्रती म्हटलं म्हणून तो थोडयाच पाठवणार आहे ? शिवाय तो काही पैसे भरून काढलेला फोटो नव्हे, तेव्हा मागणी करायचाही मला काही अधिकार नाही. पण त्याने आपला शब्द पाळला आणि तीन दिवसांनी आमच्या घरमालकिणीनं मला आलेलं एक पार्सल दिलं. त्या पार्सलात हातावर कबुतरं घेतलेला, ट्रफलगार स्क्वेअरमध्ये काढलेला आणि ज्याच्या प्रती येतील ही गोष्टही मी विसरून गेले होते अशा त्या फोटोच्या दोन प्रती त्या आजोबांनी आठवणीने पाठवल्या होत्या. त्या प्रती पाहून मला जितका आनंद झाला त्याहीपेक्षा सहजगत्यादेखील दिलेला शब्द पाळणारा इंग्रजी स्वभावाचा, व्यक्तित्वाचा नमुना पाहून जास्त आनंद झाला.

लंडनमध्ये इतर गोष्टींबरोबरच मी उत्तमोत्तम नाटकं बघितली. नाटकाचं अगदी शेवटच्या दराचं तिकिट पाच शिलिंगांच्या खाली नसे. शिवाय नाटकाची वेळ संध्याकाळी सात वाजता. म्हणजे आधी किंवा नंतर हॉटेलात जेवण मिळायचं नाही. आधी जेवण तयार नसे, नंतर रात्री हॉटेलं बंद होत. या दोन्ही कारणांमुळे ज्या दिवशी नाटक बघायचं मी ठरवीत असे त्या दिवशी संध्याकाळी फक्त कॉफी आणि सँडविचवर पोट भरायचं आणि रात्री मात्र नाटक पाहून तृप्त व्हायचं असा माझा नेहमीचा बेत असे. मी पाहिलेल्या बर्नार्ड शॉ यांच्या ' कँडिडा ' नाटकाचं अगदी वास्तव सेटिंग अजून माझ्या डोळ्यांसमोर उभं आहे. ' लॉरेन्स ऑफ अरेबिया ' या नाटकाच्या नायकाची भूमिका करणारा सुप्रसिद्ध नट ॲलेक गिनी याच्या अभिनयकौशल्याने मी अगदी थक्क होऊन गेले. ॲगाथा ख्रिस्ती यांच्या ' माऊस ट्रॅप ' या नाटकातला बर्फ पडण्याचा प्रसंग अगदी अंगावर रोमांच उभे करणारा होता. यापैकी ' कँडिडा ' नाटक नवव्या वर्षात आणि ' माऊस ट्रॅप ' नाटक सातव्या वर्षात चालू होतं–त्याचा ३२००वा प्रयोग मी बघितला–रोज एक प्रयोग आणि शनिवार-रविवारी दोन दोन प्रयोग या गतीने. आणि तरीही प्रत्येक खेळ ' हाऊस फुल ' जात होता.

ही सर्व नाटकं मला आवडली खरी पण सर्वांत खोल ठसा उमटवला तो ' दि वर्ल्ड ऑफ सूझी वॉंग ' या नाटकाने. हे नाटक फारसं डामडौलाचं नाही. अगदी साधंसुधं. पण अगदी प्रत्येक बारकावा टिपून घ्यावं इतकं जिवंत

आणि रेखीव. पावसाच्या दृश्यात मृच्छकटिकातल्या ‘ अंगे भिजली जलधारांनी ’ या प्रवेशात वरून फक्त चारुदत्त—वसंतसेनेच्या अंगावर झारीने पाणी ओतून, मैत्रेयाला कोरडं ठेवण्याचा चमत्कार इथे नव्हता. तर खरोखरीच घरावरून पडणाऱ्या पावसाच्या पागोळ्या स्टेजवरच्या घरासमोरच्या रस्त्यावर पडत होत्या. प्रत्येक दृश्य असंच जिवंत होतं.

वास्तविक नाटक अगर सिनेमा पाहताना मला रडू येत नाही असं मी नेहमी सर्वांना मोठ्या अभिमानाने सांगते. पण माझा हा अभिमान या नाटकाने ओसरला. शेवटचं दृश्यच इतकं परिणामकारक होतं की नकळत, माझा रुमाल डोळ्यांजवळ गेला. साधंसुधं दृश्य, आपल्या मेलेल्या मुलाची खेळणी सूझीने खोलीत एकावर एक रचलेली आहेत, तिच्यामागे तिचा प्रियकर चित्रकार उभा आहे. ती डोळे मिटून काहीतरी प्रार्थना करते आहे. हात जोडले आहेत. चित्रकाराने तिच्या खांद्यावर हात ठेवले आहेत. त्याची प्रेयसी मागे दारात येऊन उभी राहते आणि हे दृश्य पाहून हळूच त्या दोघांची तंद्री भंग न करता निघून जाते. केवळ स्टेजवरूनच नव्हे तर दोघांच्या जीवनातून ती जाते आणि दृश्य संपते. सगळ्या नाटकाचा उच्चांक इथे गाठला आहे. थिएटर आणि स्टेजवर नटनटीही स्तब्ध असतात. पण हालचाल असते ती फक्त डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंची. ह्या भूमिका करणारी दोघं—नायक-नायिका यांना मी त्या क्षणी तरी दैवी देणगीने संपन्न मानलं.

एक दिवस मी अशीच संध्याकाळी हिंडायला म्हणून बाहेर पडले होते. संध्याकाळचे ५ वाजले होते. पण हळूहळू अंधाराचं साम्राज्य पसरू लागलं होतं. मला काही अगदी आवश्यक वस्तू खरेदी करायच्या होत्या. बाजार जरा दूर. तेव्हा चालत जाण्यापेक्षा बसने जावं हे बरं म्हणून मी बसमध्ये बसले. बाजारातून हव्या होत्या त्या वस्तू खरेदी करून मी परत यायला निघाले. पण जरा चालायची लहर आली म्हणून समोरच दिसणाऱ्या रस्त्याने सरळ बराच वेळ चालले. अवतीभोवती नजर टाकली तर वस्ती, माणसं जरा वेगळीच वाटली. म्हटलं, ‘ बरं झालं, आज लंडनचा एक नवा भाग अनायासे बघायला मिळणार. ’

या समाधानात थोडा वेळ चालले. पण पोटात भूक लागल्याचं पाय सांगू लागले म्हणून समोरच दिसणाऱ्या एका हॉटेलात शिरले. आणि कॉफी, त्याबरोबर सँडविच अशी मागणी केली. हॉटेलचा व्यवस्थापक माझ्याकडे विचित्र नजरेनं पाहू लागला. माझ्या पोशाखामुळे अशा तऱ्हेने लोकांनी बघणं याचा मला आता सराव झाला होता. पण लौकरच मला समजलं की ही अपरिचितपणाची उत्सुकता त्या नजरेत नव्हती. माझं खाणं होईपर्यंत तो गप्प बसला. मग म्हणाला, 'पोरी, तू परकीय आणि नवीन दिसतेस. या भागात तुझ्यासारखीने हिंडणं बरं नाही. तू चांगल्या घरातली दिसतेस. जा, शक्य तो लौकर इथून परत जा.' मी म्हटलं, 'हा भाग कोणता?' तो म्हणाला—'सोहो.' ते नाव ऐकलं आणि मला सगळा उलगडा झाला. वेश्या आणि जुगारासाठी कुप्रसिद्ध असलेल्या त्या भागातून त्याच भागात वावरणाऱ्या एका माणसाच्या सज्जनपणाने मी सुरक्षित परत आले.

अशाच तऱ्हेचे अनुभव घेत मी लंडनमध्ये अखंड भ्रमंती करीत होते. मी आणि फिलोमिना. कधी कधी मी एकटीच. ती बरोबर असली की, भटकण्याला एक वेगळीच गंमत येत असे. टेम्स नदीचं वर्णन शाळेत इंग्रजी कवितेत मी वाचलं होतं. आता प्रत्यक्ष त्या नदीच्या किनाऱ्यावर मी हिंडत होते. क्लिओपात्राच्या सुईच्या जवळून पायऱ्या उतरून जावं आणि नदीच्या पाण्यात पाय सोडून बसावं असा मोह कितीदा तरी झाला. पण त्या सुईच्या आडोशाला उभ्या असलेल्या प्रेमी युगुलांना अडचण कशाला म्हणून तो मोह टाळला. ट्रॅफलगार स्क्वेअरमधल्या कबुतरांची फडफड अंगाखांद्यावर झेलली. नेल्सनच्या पुतळ्यावर बसून कारंजाच्या तुषारात न्हाऊन निघाले. हाईडपार्कमधली तावातावाने चालणारी अनिर्बंध व्याख्यानं ऐकली. बकिंगहॅम पॅलेससमोर सैनिकांच्या फेऱ्या पहात कोवळ्या उन्हाची मजा चाखली. लंडनच्या प्लॅनिटोरियममध्ये बसून अंतराळाची सफर केली. मादाम तूसाच्या मेणाच्या चित्रसंग्रहाशेजारच्या वैचित्र्य नगरीत जाऊन तिथल्या आरशात स्वतःची वेडीवाकडी प्रतिबिंबे पाहून मनसोक्त हसले. टॉवर ब्रिज सबंधच्या सबंध उचललेला पाहून मन आश्चर्यानं थक्क झालं. भटकताना पाय दमत होते. मन उत्साहाने फुलत होतं. लंडनचं वास्तव्य संपणार म्हणून अंतःकरण जड झालं होतं.

अशाच अवस्थेत एकदा मी आणि फिलोमिना भटकत भटकत संध्याकाळी टेम्स नदीच्या किनाऱ्यावर आलो. संध्याकाळचा थोडासा धूसर असा प्रकाश सगळ्याभर पसरला होता. पलीकडच्या किनाऱ्यासमोर पार्लमेंट हाऊसवरचे दिवे चमचम करीत होते. नदीच्या पाण्यावर गहिरी रंगछटा पसरली होती. सर्व वातावरणात एक प्रकारची गोड धुंदी भरून राहिली होती. ती मन भारून टाकीत होती.

मी आणि फिलोमिना हातात हात अडकवून किनाऱ्यावर बसलो होतो.नदीच्या शांत प्रवाहाकडे, गहिऱ्या रंगाकडे, अनिमिष नेत्रांनी बघत होतो. समोर बिगबेन आणि भोवतालच्या सर्व गोष्टी अगदी चित्रात चितारल्यासारख्या दिसत होत्या. माझी नजर त्यावरून ढळत नव्हती आणि अचानक त्या धुंद अवस्थेत माझ्या मनात विचार आला की हे बिगबेन, हा समोरचा देखावा, ही नदी, फिलोमिना, मी या सर्वांचे मादाम तूसाच्या चित्रसंग्रहातल्या सारखे मेणाचे पुतळे व्हावे, काळ पुढे जाऊच नये, सगळं अस्संच, जस्संच्या तस्सं धुंद होऊन थांबावं आणि मला अखंड याच अवस्थेत राहायला मिळावं.

मनाच्या अशा अवस्थेत मी कितीतरी वेळ स्तब्ध निश्चल बसून होते; या जाणीवेचा काही वेगळाच आनंद लुटीत होते.

माझ्या कल्पनेप्रमाणे खरंच का काही तसं घडत होतं ? घडणार होतं ?

अशा धुंद अवस्थेत माझ्या डोळ्यांसमोर काही शब्द तरळू लागले. मी माझ्या नकळत अनंत काणेकरांची कविता गुणगुणू लागले —

चांदणे असेच्या असे फुलुन राहील
वक्षावर माझ्या मान तिची निश्चल
भावि युगे विस्मये पाहतिल
कोरिव लेणे असे
म्हणतिल, झाले तरि हे कसे ?

गुणगुणताना माझा आवाज केव्हा मोठा झाला ते मला कळलंच नाही. मी या भावविश्वात दंग होते. फिलोमिना त्या कोरीव लेण्यातील एखाद्या मूर्ती-प्रमाणे माझ्याकडे स्तब्ध, टक लावून बघत होती.

इतक्यात एकदम ठणकन् बिगबेनचा ठोका पडला आणि माझी स्वप्न-समाधी भंगली. हा सारा माझ्या मनाचा भास होता; कल्पनाविलास होता.


उत्यसृष्टीत हे खरंच कुठलं घडायला ? बिगवेन थांबलं नव्हतं. काळ थांबणार नव्हता आणि माझं लंडनचं वास्तव्य लौकरच संपणार होतं.

पण म्हणूनच लंडन सोडताना मला फार वाईट वाटलं.

मी लंडन सोडण्याच्या आदल्या दिवशी भारावलेल्या अंतःकरणानं फिलोमिनाला सांगायला तिच्या खोलीत गेले तेव्हा माझ्या गळ्यात हात टाकून ती म्हणाली, 'लीला, मला विसरायचं नाही हं कधी ! मी पुढच्या वर्षी हिंदुस्थानात येणार आहे तेव्हा मुंबईला तुला भेटणं, तुझ्या मुलांना बघणं हे माझं मुख्य काम राहील. अगदी थोड्या दिवसांत तू मला अगदी जवळची मैत्रीण वाटायला लागली आहेस. मला गेल्याबरोबर न विसरता पत्र पाठवायचं हं !'

आणि मी 'हो' म्हणत होते. दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजताच मला विमानतळावर जायला निघायचं होतं. त्या वेळी फिलोमिनाचा निरोप घेणं शक्य नव्हतं आणि आत्ता तिच्या खोलीतून पाय निघत नव्हता. पण आता जास्त वेळ तिथे थांबले तर डोळे फितूर होतील आणि अंतःकरणात दडवून ठेवलेलं भावनांचं सारं रहस्य आपल्या अश्रुदूतांकडून उलगडून दाखवतील या भीतीने मी एकदाच तिचा हात आवेगाने दाबला आणि खोलीत परत आले.





संग्रहालय,
दि:
नोंद दि:

# ६.

आणि मला लंडन सोडावं लागलं. पहाटे ५ वाजता मी घरून निघाले, ८ वाजता विमानात बसले आणि पॅरिसच्या मार्गाला लागले.

दुपारी १२ वाजता मी पॅरिसला उतरले. पॅरिस म्हणजे जादूनगरी. या जादूनगरीत आपल्यासारख्या सामान्य व्यक्तीचं काय होणार असं सारखं वाटत होतं. पॅरिसबद्दल मी काहीतरी विलक्षण कल्पना केल्या होत्या. अर्थात् त्या ऐकून, वाचून. पण प्रत्यक्ष पॅरिसला गेल्यावर मात्र त्या फारच अतिरंजित होत्या असं मला वाटलं. माझ्या लहानपणी मी कथा-कादंबऱ्यांतून दिल्लीच्या चांदणीचौकाचं वर्णन वाचलं होतं. या चांदणीचौकात सौंदर्याची बरसात होत असेल, चांदणं फुललेलं असेल, अशी काहीशी मृदु मुलायम कल्पना होती माझी. पण प्रत्यक्षात दिल्लीला राहायला गेल्यावर जेव्हा या चांदणी-चौकाच्या गजबजलेल्या बाजारातून रोज हिंडू लागले आणि उघड्या गटारांवर ठेवलेल्या तळणीच्या कढया पाहिल्या तेव्हा जसा माझा मनोभंग झाला तसाच

अनुभव मला पॅरिसमध्येही आला.

मी ' रू द रिशेल्यू ' वरच्या ( रिशेल्यू रस्त्यावरच्या ) एका घरात राहायचं ठरवलं होतं. विमानतळावरून त्या घरी जातानाच पॅरिसने माझा अपेक्षाभंग केला. रस्त्यावर वाळलेल्या पानांचा कचरा पडलेला होता. फूटपाथवर खुर्च्याटेबलं मांडून लोक उघड्यावर खातपीत बसले होते. सगळीकडे नुसता गजबजाट दिसत होता. माझ्या कल्पनेतलं पॅरिस असं नव्हतं.

दुपारी मी जेवणासाठी बाहेर पडले. ' इंग्रजी जाणणारा वेटर ' अशी पाटी असलेल्या हॉटेलमध्ये शिरले. आधी ब्रेड-बटर मागितले. पण ब्रेड म्हणजे लाकडाचा ओंडकाच होता जसा काही. तसाच कडक आणि लांबलचक. नंतर मी पाह्यलं तर आम्ही उसाच्या कांड्या पुण्याला मंडईतून घरी नेत असू तशाच या पावाच्या कांड्या हातांत घेऊन हे फ्रेंच लोक जातात बाजारातून.

हा कडक पाव खायचा म्हणजे हिरड्या सोलून निघणार. तेव्हा काहीतरी दुसरं मागवावं म्हणून मी सँडविच मागवले. सँडविच कसलं आहे म्हणून विचारल्यावर त्याने, टोमॅटो, सलामी वगैरे नावं बोलून दाखवली. सलामी म्हणजे काय हे मला जाणून घ्यायचं होतं. मी तसं विचारल्यावरून त्या वेटरने मला एक पदार्थ दाखवला. मला तो लाल भोपळा किंवा सुरण असा काहीतरी वाटला म्हणून मी त्याला ते सँडविच तयार करून आणायला सांगितलं आणि प्रत्यक्ष सँडविच आल्यावर मात्र मला समजलं की तो लाल भोपळा ओळखण्यात मी अगदी भोपळ्याएवढी चूक केली होती. ते मांसाचे तुकडे होते, सलामी म्हणजे—

ही मला पॅरिसच्या हॉटेलमध्ये मिळालेली पहिली सलामी. पुन्हा काही मी कोणत्याही हॉटेलात गेले नाही. सेल्फ सर्व्हिस हॉटेलमध्ये जायचं, प्रत्यक्ष पदार्थ पाहून वशी उचलायची आणि जेवण उरकायचं हा नंतर माझा शिरस्ता ठरून गेला.

पॅरिसला सारखा पाऊस पडत होता. त्यामुळे माझ्या हिंडण्याफिरण्याला थोडा खंड पडत असे. पण, पॅरिसला जाऊन ' अमूक ' पाह्यलंत का ? असं कुणी विचारलं तर ' नाही ' म्हणायला लागू नये इतकं पॅरिस मात्र मी त्या तशाही हवेत हिंडून पाहिलं. सकाळपासून सारखा रिपरिप पाऊस पडत होता. रस्ते ओले झाले होते. चिखल नसला तरी पाण्याचा चिकचिकाट होता. हवेतली ऊब जाऊन अंगावर शिरशिरी आणणारा गारठा सगळ्याभर भरून

राहिला होता. वारा पडला होता. सगळं वातावरण कुंद झालं होतं. अशा वेळी वास्तविक आरामखुर्चीत बसून, अंगाभोवती शाल लपेटून एखादी सुंदर कादंबरी वाचीत पडणं मला फार आवडतं. पण मी इथे नवे देश पाहायला आले होते त्यामुळे असं घरात बसून राहणं शक्य नव्हतं. हवा घरात राहायचा आग्रह करीत होती तर नवे देश पाहण्याची उत्सुकता बाहेर पडण्याचा संदेश देत होती.

मी नोत्रदामच्या चर्चबद्दल पुष्कळ वाचलेलं असल्याने मला ते पाहायला जायचं होतं. नोत्रदाम म्हटलं की मला हंचबॅकची, कुब्ड्याची आठवण होते. आजही ती झाली. ' हंचबॅक ऑफ नोत्रदाम ' या एके काळी बघितलेल्या चित्रपटांतील प्रसंग डोळ्यांपुढे दिसत होते. अंगावर शहारे येत होते. हवेचा कुंदपणा मनावर कसलंतरी दडपण आणीत होता आणि अशाच बधिर मनः-स्थितीत मी ते चर्च पहायला गेले. आधीच मनावर असा सर्व प्रकारचा झालेला परिणाम ! त्यातून पायऱ्या अगदी अरुंद, कोंदट. मधूनमधून कबुतरांची घाण येत असलेली. काही ठिकाणी तर इतका अंधार होता की एखाद्या आंधळ्याप्रमाणे फक्त पायरी चाचपडतच चढावं लागत होतं.

अशा या पायऱ्या चढून मी वर गच्चीवर गेले आणि तिथूनही पॅरिस शहर पाहिलं. वरून शहर फारच सुंदर दिसत होते. पण लगेच मी चर्चच्या गच्चीच्या कठड्याकडे नजर टाकली. आणि पुन्हा हंचबॅकचा वाकडा तिकडा कुरूप चेहरा डोळ्यांसमोर तरळू लागला. कठड्याच्या चौफेर कोपऱ्यावर पक्ष्यांच्या आणि प्राण्यांच्या मूर्ती बसवलेल्या आहेत. पण त्या इतक्या हिडीस आहेत की खरोखरीच त्या पाहताना मनावर काही विचित्र परिणाम होतो. फार वेळ तिथे थांबावंसंच वाटत नाही लांब लाल जीभ काढून चेटकिणी वेडावीत आहेत, लांब सुळे दाखवीत एखादा दुष्ट राक्षस आपल्याकडे पाहून खदखदा क्रूर हसत आहे असं काहीतरी मला वाटायला लागलं आणि मी अंधारात चाचपडत धडपडत, धडाधड त्या पायऱ्या उतरून बाहेर आले. त्या कोंदट भयंकर वातावरणातून बाहेर पडले आणि खालच्या मोकळ्या मैदानात हिरवळीवर येऊन बसले. मन गुदमरल्यासारखं झालं होतं, जणू मीं पिशाच्च-नगरीतच जाऊन आले होते. हिरवळीवर बसून मी एक मोकळा श्वास घेतला आणि मग मला जरा बरं वाटलं. पॅरिससारख्या शहरात इतक्या सुंदर चर्चची

गच्ची इतकी हिडिस स्वरूपाची कशासाठी ठेवली आहे ? सुंदर बाळाला दृष्ट लागू नये म्हणून त्याच्या गोऱ्या गालावर आई काळ्या काजळाचा अगदी वाकडातिकडा फराटा मारते तसं तर नाही हे ? या सौंदर्यनगरीला दृष्ट लागेल अशी तर कुणाला भीती वाटत नाही ?

पण ही सौंदर्यनगरी आहे, जादूनगरी आहे हे दिवस मावळल्यावरच फक्त पटतं. त्या शहराचं दिवसाचं सर्वच रूप रात्री पालटतं—अगदी काया-पालट केल्यासारखं ! शहरात दिवसा दिसणारा गलिच्छपणा रात्री दृष्टिआड होतो. दुकानांचं, हॉटेलांचं स्वरूप जादूची कांडी फिरल्याप्रमाणे बदलतं आणि पॅरिसचं विलासनगरी नाव सार्थ वाटू लागतं. पॅरिस रात्रीच जगतं; दिवसा नाही. रात्री जणू सर्व शहरात चैतन्य ओसंडू लागतं. आनंदाची, उत्साहाची पखरण होते. दिवसभर झोपून, विश्रांती घेऊन जणू काही रात्री हे शहर ताजंतवानं होतं. दिवसा पॅरिसच्या रूपाबद्दल कल्पना करण्यात मी चूक केली असं मला वाटलं. रात्री ती सौंदर्यनगरी होती. पॅरिसचं सौंदर्य पाह्यचं तर ते रात्री पाहावं हे ऐकलेलं विधान मला त्या वेळी पटलं.

दुसऱ्या दिवशी पाऊस अचानक थांबला. स्वच्छ कोवळं उन्ह पडलं. रस्ते पुन्हा अगदी स्वच्छ दिसू लागले. वातावरणातला कोंदटपणा आणि हवेतला दमटपणा आता ओसरू लागला. कोवळ्या उन्हात बगीचे, मैदानां-वरची हिरवळ सुंदर दिसू लागली. पावसाने धुऊन निघाल्याने झाडं, पानं जास्तच टवटवीत झाली होती. सगळीकडे प्रसन्नता अगदी हलकी फुंकर मारून आनंद पसरवीत आहे असं मला वाटत होतं. अशाच प्रसन्न वातावरणात प्रसन्न मनाने मी ऐफेल टॉवर पाहायला गेले. हवा प्रसन्न होती. मनही प्रसन्न होतं. शिवाय जगातलं एक आश्चर्य पाहण्याच्या उत्सुकतेने तें हरखून गेलं होतं. इतका उत्तुंग मनोरा केवळ प्रदर्शनासाठी बांधलेला. पण त्याच्या असामान्यत्वामुळे आज तो कायम राहिला आहे आणि बघणारांना चकित करीत आहे. मी वर जाताना लिफ्टमधून गेले. लिफ्ट दोनदा बदलावी लागते. वजन झेपण्यासाठी प्रत्येक मजल्यावर ठराविकच माणसं लिफ्टमध्ये घेतात. अगदी वरच्या मजल्याची लिफ्ट मनोऱ्याच्या आकाराप्रमाणेच निमुळती, चिंचोळी आहे. मनोऱ्यावरून सर्व पॅरिस शहर फारच सुंदर दिसतं. ढग मनोऱ्याला स्पर्श करून जातात. आपण अगदी वरती उभं असताना एखादा ढग सरकला तर

आपणही त्याच्याबरोबर सरकत आहो, मनोराही कलंडत आहे असा भास होतो. मनोऱ्याची खरी उंची अजमावण्यासाठी परत उतरताना मी लिफ्ट-मधून न उतरता पायऱ्यांवरून उतरले आणि दोनदा कुतुबमिनार चढल्या-सारखं वाटलं.

एकदा मी फॉलीबर्जरमध्ये विविध कार्यक्रम बघायला गेले होते. इतर सर्व ४ तास चालणाऱ्या या कार्यक्रमांत मला विशेष आकर्षण होतं 'हंचबॅक ऑफ नोत्रदाम' या नाटकाचं. हे नाटक दोन तासांचं होणार होतं. नुकतंच मी 'नोत्रदाम चर्च' बघितलं होतं आणि नाटकाचा पडदा उघडला तेव्हा मी पुन्हा ते चर्च बघते आहे की काय असा भास होऊ लागला. पहिल्या अंकातल्या दृश्यात मी अगदी तल्लीन होऊन गेले होते. कुबडा सुंदरीच्या मागे लागला होता. गोष्ट माहीत असूनही आता काय होणार अशी उत्सुकता लागली होती, इतक्यात त्या धांवणाऱ्या सुंदरीच्या आणि तिचा पाठलाग करणाऱ्या कुबड्याबरोबर, पाठोपाठ नजर वळवीत आम्ही एकदम चर्चच्या मनोऱ्यावर मोठ्या घंटेजवळ येऊन पोचलो आणि काहीतरी विशेष घडलं असं वाटलं. क्षणभर आकलन होईना. मग मात्र लक्षात आले की, नाटक सुरू झालं त्या वेळीं हा वरचा मजला आणि हा मनोरा, घुमट, घंटा काहीच नव्हतं. आम्ही पहिल्या अंकातली दृश्यं बघण्यात दंग असताना आमच्या नकळत आकाशातून अलगद उतरविल्याप्रमाणे तो वरचा मजला केव्हा आमच्या डोळ्यांदेखत पण न देखता उभारला गेला ते समजलंच नाही.

पॅरिसमध्ये माझी खरी अडचण झाली ती दुपारच्या चहाबाबत. माझ्या पॅरिसच्या मुक्कामात बहुतेक सर्व दिवस रिमझिम का होईना पण पाऊस पडतच होता. हवा सर्द होती. सकाळी खूप हिंडावं, दुपारी जेवून थोडी झोप काढावी अगर काहीतरी वाचावं आणि पुन्हा ३, ३॥ वाजता हिंडायला बाहेर पडावं असा माझा नित्यक्रम होता. पण दुपारची विश्रांती आणि नंतरचं बाहेर जाणं या मध्यंतराच्या काळात चहा 'मारायची' मला फार तल्लफ येत असे. दुपारी असा चहा पिण्याची पद्धतच नाहीं तिथे. पहिले दोन तीन दिवस मी कसेबसे घालवले. पण एक दिवस हवा फारच सर्द होती. आणि चहा घेतल्याशिवाय बाहेर पडणं शक्यच नाही अशी माझी

अवस्था झाली होती. शेवटी मी ज्या घरी उतरले होते त्या बाईंना मी चहा देण्याची विनंती केली. प्रथम तिने फारच आश्चर्य वाटल्याचं दाखवलं या मागणीबद्दल आणि मग म्हणाली, ‘ हे बघ, माझं घर असं तसं नाही. फार फार मोठमोठी माणसं माझ्या या घराला आणि मी चालवीत असलेल्या उपाहारगृहाला भेट देऊन गेली आहेत. तुला माहीत आहे, एकदा मादाम पांपादू–चौदाव्या लुईच्या–माझ्याकडे आल्या होत्या—’

मादाम पांपादूच्या येण्याचा आणि माझ्या चहाच्या मागणीचा संबंध काही माझ्या लक्षात येईना. पण तेवढ्यात चहाचा ट्रे आला आणि बाई म्हणाल्या, ‘ मादामना इथे असाच दुपारचा चहा दिला होता आम्ही ! ’

आता मादाम पांपादूची बरोबरी मला तरी कुठल्याच अर्थाने करायची नव्हती. पण मादामची आपल्या घराला आणि उपाहारगृहाला भेट हा या बाईंच्या घराण्याचा एक फार आवडता अभिमानाचा विषय होता. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाला त्या भेटीचं तपशीलवार वर्णन ऐकवल्याशिवाय बाईंना चैनच पडत नसे. मला अर्थातच हूं–हूं–म्हणून सर्व ऐकून घेणं भाग होतं, निदान किटलीतला चहा पिऊन संपेपर्यंत तरी. पण तेवढ्याने माझी सुटका झाली नाही. माझा चहा पिऊन झाल्यावर बाईंनी मला दुसऱ्या कोपऱ्यातल्या एका खुर्चीवर बसवलं आणि म्हणाल्या, ‘ आता बघ.’

मग त्या वरच्या कट्ट्यावर गेल्या. तिथून हसत हसत मोठ्या अदबीने एका खुर्चीजवळ येऊन उभ्या राहिल्या. खुर्ची रिकामीच होती. मग काहीतरी बोलल्यासारखं करून लगबगीने आत गेल्या. परत तशाच हसतमुखाने हातात एक ट्रे घेऊन आल्या–आता वास्तविक हातात ट्रे नव्हता. फक्त हालचाली तशा होत्या. ट्रे त्या रिकाम्या खुर्चीसमोर टेबलावर ठेवून उभ्या राहिल्या. थोडा वेळ स्मितवदनाने तशाच उभ्या होत्या. मग उपाहारगृहाच्या दरवाजा-पर्यंत जाऊन दरवाजात लवून कुणाला तरी नमस्कार करून परत आल्या. हा मूकाभिनय काय असावा असा विचार मी करीत असतानाच त्या माझ्या-जवळ येऊन म्हणाल्या, ‘ हे अस्सं घडलं, ग्रॅनीच्या वेळी मादाम इथे आल्या होत्या तेव्हा ! ’

म्हणजे हे मादाम पांपादूच्या, कित्येक पिढ्यांपूर्वीच्या भेटीचं प्रात्यक्षिक होतं. या बाई होत्या साठी उलटलेल्या. पण प्रत्येक नव्या व्यक्तीला या

भेटीचं प्रात्यक्षिक करून दाखवणं हा कार्यक्रम मला वाटतं या घरात आणि घराण्यांत परंपरागत चालत आलेला वारसा होता.

मला त्या सर्व कृतींचं वाह्यत: हसू येत असलं तरी या घराण्याच्या अभिमानाची मात्र एक वेगळीच जाणीव मनाला स्पर्श करीत होती.

चहा पिऊन मी बाहेर पडले ती आर्च ऑफ् ट्रायम्फ पाहायला गेले. जाता जाता वाटेत लागणाऱ्या कित्येक रस्त्यांच्या नावात मला आपल्यापेक्षा वेगळेपण आढळलं ते म्हणजे या रस्त्यांना लेखक, कलावंत, संगीतकार, मूर्तिकार वगैरे व्यक्तींची—राजकीय पुढारी सोडून इतर क्षेत्रात श्रेष्ठ ठरलेल्या व्यक्तींची नावं दिलेली होती.

' विजयाच्या कमानी 'त सतत तेवणारी ज्योत मी बघत होते. आणि त्या ज्योतीच्या प्रकाशातून मला देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या कित्येक देशभक्तांचं अगदी जिवंत दर्शन घडत आहे असा भास होत होता.

यानंतर मी पॅरिसचा प्रसिद्ध व्हर्साय राजवाडा पाहायला गेले होते. प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणाऱ्या लोकांसाठी नियोजित केलेल्या एका बसमधून मी तिथे गेले. राजवाड्याचं वर्णन ऐकलं होतं त्यापेक्षा विशेष मनात भरण्या-सारखं प्रत्यक्षात काही दिसलं नाही. नेपोलियनचा मुकुट, रत्नं बघण्यातही मला विशेष आकर्षण वाटलं नाही. पण यानंतर आमच्या वाटाड्याने एक भली मोठी, दर्शनी भागाला संपूर्ण गज लावलेली खोली दाखवली आणि म्हणाला ' या खोलीत फक्त वर्षातून एकदा चौदावा लुई जेवायला बसत असे आणि ते दृश्य या गजांमधून लोक बघत असत. '

हे ऐकल्यावर मला वाटलं, की चौदावा लुई काय उलटा घास घेत असे, की बकासुरासारखा जेवीत असे की आणखी काही कारण होतं याचं ? मी त्या वाटाड्याला म्हटलं, ' अहो त्यात एवढं, बघण्यासारखं काय होतं ? त्याला मेजवानी वगैरे प्रसंगी काय जेवताना लोकांनी पाहिलं नव्हतं ? '

तेव्हा वाटाड्या म्हणाला, ' खरंच, त्याला एरव्ही जेवताना कुणीच पाहू शकत नसे. कारण तो एका बंद खोलीत एकटा बसून नेहमी जेवी. आलेल्या जेवणातल्या प्रत्येक पदार्थाचा घास कुत्र्याला प्रथम खायला घाली. तो खाल्ल्या-नंतर थोडा वेळ थांबून कुत्र्यावर त्या अन्नाचा काही विपरीत परिणाम होतो का ते बघे आणि सर्व काही ठीक आहे असं समजल्यावरच ते अन्न खात

असे. फक्त वर्षातून एकदा राणी त्याला जेवायला बोलवून स्वतः त्याच्याबरोबर जेवीत असे आणि तें मात्र उघडपणें या गर्जांच्या खोलीत बसून. म्हणूनच राजाला असं चारचौघांसारखं जेवताना बघणं ही लोकांना पर्वणी वाटे. हे सर्व कशासाठी तर कुणीतरी आपल्याला विषबाधा करील ही धास्ती सतत त्याला वाटत असे म्हणून !'

पॅरिसमध्ये हिंडताना एक गोष्ट फार सोयीची होती ती म्हणजे बसच्या क्यूमध्ये उभं राहावं लागायचं नाही. बसचं तिकीट स्टॉपवरच्या कंडक्टरकडून घ्यावं आणि कुठेही आसपास जाऊन चहाकॉफी घ्यावी. आपल्या तिकिटावर जो नंबर असेल त्या नंबराची बस किती वाजता येईल ते स्टॉपजवळच्या बोर्डवर लागलेलं असे. त्या सुमाराला स्टॉपवर येऊन बस पकडली की झालं. म्हणूनच मी पॅरिसमध्ये बसमधून खूप हिंडले आणि जमेल तेवढं या सौंदर्य-नगरीचं दर्शन घेऊन एक दिवस तिचा निरोप घेतला.

★ ★ ★

## ७.

सौंदर्यनगरी पॅरिसचा निरोप घेऊन मी जर्मनीला जाण्यासाठी निघाले. सारा एक तासाचा हा विमानप्रवास पण का कोण जाणे हा प्रवास खूप वेळ चालला आहे असं मला वाटत होतं. एक प्रकारचं खिन्नतेचं सावट आलं होतं मनावर. केव्हाही विचार केला तरी जर्मनी या राष्ट्राभोवती युद्धाच्या सावल्या नाचतात असंच मला वाटायचं. या कल्पनेचीही छाया माझ्या मनावर असावी. पण या अशा मनःस्थितीत मी म्यूनिचच्या विमानतळावर उतरले.

आणि विमानतळ दृष्टीस पडल्याबरोबर उदासीनतेची छाया जरा विरळ झाली. विमानतळ खूप प्रशस्त, अगदी आधुनिक पद्धतीने केलेलं बांधकाम आणि अतिशय स्वच्छ !

म्यूनिचला कोणत्याही कुटुंबात उतरण्याची माझी सोय झालेली नव्हती आणि फार दिवस मुक्कामही करायचा नसल्याने एखाद्या हॉटेलातच उतरायचं मी ठरवलं होतं. पण विमानतळावर उतरले आणि विलक्षण भूक लागली

होती तरी गावात विमानकंपनीच्या बसने प्रथम जाणं भाग होतं. म्हणून त्या बसमधून रेल्वेस्टेशनपर्यंत आले. यानंतर प्रत्येकाने आपापला मार्ग शोधायचा होता. बाकी सर्व विमानातले सहप्रवासी म्यूनिचची पुरती माहिती असणारे. अनोळखी आणि अनभिज्ञ अशी मी एकटीच काय ती. तेव्हा मी एका प्रवाशालाच 'म्यूनिचला' एखादं चांगलं हॉटेल आहे का? म्हणून विचारलं, त्यानं रेल्वे स्टेशनसमोरच हॉटेल असल्याचं सांगितलं त्यामुळे बरं वाटलं. आता स्टेशनवरच काहीतरी खावं–प्यावं असं ठरवलं आणि एक दुधाचा स्टॉल दिसला तिथे जाऊन उभी राहिले. सगळीजणं पैसे देऊन दुधाचे ग्लास घेत होती. आणि सरळ कुठेही जाऊन दूध पीत होती. यात आश्चर्य वाटण्यासारखं फारसं नसलं तरी दूध प्याल्यानंतर पुन्हा कौंटरवर ग्लास न ठेवता स्टेशनवरच एखाद्या बाकावर, एखाद्या सामानाच्या कट्ट्यावर कुठेही ग्लास ठेवून ती परत जात आणि केव्हातरी हॉटेलचा नोकर ग्लास परत नेत असे. सबंध स्टेशनभर कुठेही हे ग्लास विखुरलेले दिसत. स्वतःच्या हॉटेलमधल्या ग्लासांबद्दल हे लोक इतके निष्काळजी कसे असा मला प्रश्न पडला आणि एका गृहस्थांना इंग्रजी येत होतं—कारण त्यांची विमानात ओळख झाली होती.—त्यांना मी म्हटलं, 'हे ग्लास असे वाटेल तिकडे टाकून चोरीला नाही का जाणार?' ते गृहस्थ दोन सेकंद माझ्याकडे बघून म्हणाले, 'आमच्या जर्मनीत स्वतःची नसलेल्या वस्तूला कुणीच हात लावणार नाही.' हे जर्मनीच्या शिस्तीचं मला घडलेलं पहिलं दर्शन!

नंतर रस्त्यावर पाऊल टाकल्यावर त्या आरशासारख्या स्वच्छ रस्त्यावरून चालताना मोठं प्रसन्न वाटत होतं. मोठमोठ्या उंच इमारती अगदी नवीनच बांधल्यासारख्या दिसायच्या तर जरा पुढच्या चौकात गेल्यावर एखादी पडकी जळकी इमारत दिसायची. एके काळीं सर्व जर्मनी, हे संपूर्ण म्यूनिच शहर दुसऱ्या महायुद्धाच्या आगीत भस्मसात झाले होते. त्याची चिन्हं ही अशी मधून मधून दिसत होती. या इमारती काही ठिकाणी पाडून मोटमोठे चौक मोटारी उभ्या करण्यासाठी तयार केलेले होते. मधूनच सुंदर बागा दिसत होत्या. उद्ध्वस्त झालेल्या शहराबद्दल सारखी खंत करीत न बसता, खचून न जाता परत उत्साहाने, ईर्षेने आणि जिद्दीने नव्या शहराची उभारणी जर्मनांनी केली आहे. जुन्या जळक्या इमारती आणि नव्या, उंच, डौलाने माना वर करून

वढणाऱ्या इमारती या दोन्हींकडे नजर फेकली की, राखेतून पुन्हा जन्म घेणाऱ्या फीनिक्स पक्ष्याप्रमाणे या म्यूनिच शहराने पुन्हा नवा जन्म घेतल्याचा भास होत होता.

मी हॉटेलमध्ये जाऊन जरा जुनी झाले आणि हिंडायला बाहेर पडले. हॉटेल रेल्वेस्टेशनला अगदी लागूनच होते. रस्त्यावर आले तर समोरच एक बस दिसली. त्या बसमध्ये चढले. तिकीट कुठचं आणि कसं मागावं हा प्रश्न पडला होता, तेवढ्यात कंडक्टरने एक तिकीट माझ्या हातात ठेवलं. मी एक जर्मन मार्क त्याच्या हातात ठेवला आणि त्याने दिलेला खुर्दा मुकाट्याने पर्समध्ये ठेवून दिला मला त्याने कोणतं तिकीट दिलं आणि मी कुठे उतरायचं ते समजेना. म्हटलं, वघावं झालं आणि कंडक्टरने ' उतरा ' म्हटलं की उतरावं आणि उलट दिशेने जाणाऱ्या बसमधून परत फिरावं.

दोन तीन स्टॉप गेले आणि तिकिटाचं रहस्य उलगडलं. कारण त्या ठिकाणी बस थांबली, तोच तिचा शेवटचा स्टॉप होता. अर्थातच मला कंडक्टरने शेवटच्या स्टॉपचं तिकीट दिलं होतं.

बस रिकामी झाली. मीही खाली उतरले आणि फिरायला निघाले. म्यूनिचला दोन चार रस्ते मिळून एखादा मोठा चौक असला की छोटीशी का होईना, पण लगेच तिथे बाग केलेली असते. त्या बागेत म्हातारे पेन्शनर ऊन्ह खात वर्तमानपत्र वाचीत बसलेले आढळतात. तसंच शाळा कॉलेज-मधली मुलं अभ्यास करतानाही दिसतात. पण सगळं शांत. गडबड, आवाज फारसा कुठे नाहीच.

मी चारदोन वेगवेगळ्या रस्त्यांवरून चकरा मारल्या आणि परत फिरले. बसच्या जंक्शनवरच मी उतरले असल्याने ते सापडणं कठीण गेलं नाही. परत दिशेने जाणाऱ्या बसमध्ये बसले आणि कंडक्टर आल्याबरोबर ' रेल्वे-स्टेशन ' म्हणून ऐटीत तिकीट मागितलं आणि इथपासून आमच्या फक्त इंग्रजीच्या ज्ञानाने आपटी खायला सुरुवात केली ' जर्मनीत यायचं तर जर्मन शिकून या ' ह्या जर्मनांच्या आग्रहाचा प्रत्यय आला. त्या कंडक्टरला काही कळेना मला काय म्हणायचं आहे ते ! त्यानंतर सर्व पॅसेंजरांचं कुतूहल, माझ्या शब्दांचा अर्थ शोधून काढण्याची अहमहमिका आणि त्यांना सर्व प्रकारे समजावण्याचा माझा आटोकाट प्रयत्न याचं फळ म्हणून रेल्वेस्टेशनचं

तिकीट माझ्या हातात पडलं आणि ते कोणत्या स्टॉपचं म्हणून विचारलं तर— ‘ वॉनहॉफ ’चं. हे विचित्र नाव रेल्वेस्टेशन याअर्थी. रेल्वेस्टेशनला ‘ वॉनहॉफ ’ म्हणून संबोधणाऱ्या या देशात आपला कसा निभाव लागणार या धास्तीने प्रथमच माझं अवसान गळालं. कारण इटलीत जरी मला भाषा येत नसली तरी ते शब्द इंग्रजीशी बरेच मिळते जुळते होते. अक्षरंही सरळ, सुलटी, इंग्रजी लिपीतलीच असत. पण जर्मनीत काही अक्षरंही उलटी सुलटी आणि शब्द विचित्र. इटलीत ‘ बँका नॅशनिओझेल ’ म्हणजे ‘ नॅशनल बँक ’—‘तबाची ’- म्हणजे तंबाखूचं दुकान, ‘ देन्तिस्ता ’ म्हणजे डेंडिस्ट हा अंदाज बांधणं कठीण नव्हतं. पण ‘ वॉनहॉफ ’ म्हणजे रेल्वेस्टेशन हे कसं समजायचं आणि इथे हिंडायचं तरी कसं हा फार मोठा प्रश्न माझ्यापुढे होता.

पण पोटाचा प्रश्न त्याहीपेक्षा मोठा होता. कावळे कोकलताना घसा खरडून ओरडत होते. तेव्हा मी तशीच थोडी घाबरतच पण होईल ते होवो अशा निर्धाराने बाहेर पडले. जवळपासचेच एखादं हॉटेल बघावं असा विचार केला आणि सरळ रस्त्याने थोडंसं चालत जाऊन, एक बेताचं हॉटेल दिसलं तिथे गेले. ते एक सेल्फसर्व्हिस रेस्टॉरंट होतं. पण त्या ठिकाणी माझ्या सारखीला खाण्यासारखं किंवा पिण्यासारखं म्हणाल तर फक्त चहा, कॉफी वगैरे सर्व भावंडंच होती. थोडा वेळ मी काऊंटरपाशी उभी राहिले; पण तिथे फक्त खिडकी होती. खिडकीत कुणीच नव्हतं. मी नुसती का उभी राहिले आहे हे मला कळत होतं. कारण त्या खिडकीत कुणीतरी येईल म्हणून मी वाट पाहात होते. पण त्या खिडकीत कुणीच येणार नाही हे माहीत असणारी माणसं माझ्या मागे उभी होती. त्यांच्यात माझ्या या नुसत्या उभं राहण्याच्या कृतीचं कुतूहल निर्माण झाल्याचं त्यांच्या कुजबुजीवरून मला समजलं आणि मी त्या रांगेतून बाजूला झाले. नंतर लगेच पाठीमागून आलेल्या एका गृहस्थाच्या कृतीवरून, या हॉटेलमध्ये सर्वच गोष्टी अगदी संपूर्ण यंत्राने होतात हे समजलं. त्या खिडकीच्या दोन्ही बाजूंना दोन मोठमोठे बंब असल्यासारखे होते. त्या बंबावर बरीचशी बटणं होती. त्या गृहस्थाने एक बटन दाबलं आणि सर्रकन् एक ग्लास त्या रिकाम्या खिडकीत आला. मग त्याने दुसरी दोनतीन बटनं भराभर दाबली आणि त्याच्या ग्लासात कॉफी, दूध आणि साखर पडलेली मी बघितली. मग हे सर्व लक्षात ठेवून त्या रांगेतली माणसं निघून

गेल्यावर मी ऐटीत त्या खिडकीसमोर उभी राहिले आणि ती सर्कस सुरू केली. अगदी वरचं बटन दाबलं आणि सर्रकन् ग्लास मिळालं. या आनंदात मी अगदी मघाशी लक्षात ठेवल्याप्रमाणे पाठोपाठ तीन बटनं दाबली. पण या सर्कशीत काय घोटाळा झाला कळलं नाही. तरी मला वाटतं, माझ्या ग्लासात कॉफी, कोको आणि पाणी यांचंच मिश्रण झालं आणि मला मुकाट्याने ग्लास उचलून बाजूला व्हावं लागलं. कारण रांगेत आता आणखी लोक होते. नाणं टाकल्या-खेरीज यंत्र चालतच नसल्याने पैसे आधीच टाकले होते अर्थात् ग्लासात पडलेला पदार्थ—चवीचा विचार न करता पोटात ढकलला आणि तो संपल्यावर खाऊसाठी हात पुढे केलेल्या मुलीच्या गालावर चपराक बसावी तशी माझी अवस्था झाली.

तिथून आता वेटर असलेल्या हॉटेलात जायचं आणि या यंत्रांच्या भानगडीत पडायचं नाही असं मी ठरवलं.

थोडं दूर गेल्यावर मला एक हॉटेल दिसलं. बाहेरच काचेच्या कपाटात कांही वस्तू मांडून ठेवल्या होत्या. हेच हॉटेल आपल्या दृष्टीने योग्य आहे असं ठरवून मी तिथे गेले. आता बरीच संध्याकाळ झाली होती. हॉटेलमध्ये आवराआवरी चाललेली दिसली. आणि हे हॉटेल आता बंद झालं तर रात्रभर उपाशी राहावं लागणार ही कल्पना मला असह्य झाली. म्हणून खात्री करून घेण्यासाठी मी पुढे आलेल्या वेटरला इंग्रजीत 'हॉटेल किती वाजता बंद होतं' असं विचारलं, काहीतरी प्राण्यांची भाषा ऐकल्यासारखा चेहरा त्याने केला आणि मी समजले—इंग्रजी बाद! मग हातवारे करून विचारलं आणि त्याला वाटलं मला राहायला जागा हवी आहे. हे त्याच्या हावभावावरून मला समजलं. काय करावं ते मला कळेना. मघाच्याच बॉन-हॉफची आणि कॉफी-कोकोच्या मिश्रणाची आठवण होऊन अंगावर भीतीने सर्रकन काटा उभा राहिला. मला या देशात उपाशीच राहावं लागणार का?

पण इतक्यात त्या वेटरच्या डोक्यात काहीतरी चमकलं असावं, कारण त्याने विचारलं 'ऑंग्ले?' 'फ्रॉन्से?' प्रश्नाचा अर्थ मला कळून मी लगेच 'ऑंग्ले' म्हणून उत्तर दिलं. मग तो धावत आत गेला, एका मुलीला घेऊन आला आणि तिच्याकडे बोट दाखवून म्हणाला, 'ऑंग्ले!'

माझ्यावर ओढवलेला अनवस्था प्रसंग त्या मुलीनं ओळखला असावा.

कारण लगेच तिनं मला शुद्ध इंग्रजीत विचारलं, ' बाईसाहेब, तुम्हाला काय हवं आहे ? '



तिचा तो प्रश्न ऐकल्याबरोबर मला अगदी ब्रह्म गवसल्याचा आनंद झाला. मी आधी तिच्याबरोबर जाऊन हॉटेलात एका खुर्चीवर बसले. फारशी भूक नव्हती तरी आता इथंच खपेल ते जेवण जेवायचं ठरवलं आणि मला काय काय हवं हे तिला सांगितलं. तिनं टॉमेटो, उकडलेली कोबी, तळलेले बटाटे वगैरे पदार्थ माझ्यापुढं आणून ठेवले. दोन कडक पावही आणले. मला तर ते पावाचे तुकडे खायचे कसे कळेना. त्याला लावायला लोणीही नव्हतं. मी तिच्याजवळ लोणी मागितलं, ती हसून म्हणाली, ' आम्ही आमच्या इथल्या या हॉटेलात लोणी देत नाही. पण पदार्थांत घालण्यासाठी म्हणून ठेवलं आहे त्यातलं तुझ्यासाठी, फक्त तुझ्यासाठी म्हणून देते. कारण तू मला फार

आवडली आहेस. शिवाय तू परदेशीय आहेस. तुला लोण्याशिवाय ब्रेड खायची कदाचित सवय नसेल.'

माझं खाणं होईपर्यंत ती माझ्याशी कितीतरी गप्पा मारीत होती. पुष्कळ माहिती तिनं मला विचारली. मीही खूप मनमोकळेपणानं बोलत होते. मलाही ती फार आवडली होती. तिचं नांव हेल्गा असल्याचं मला समजलं. मी त्या दिवशी अगदी पोटभर जेवून झोपले.

हेल्गाची ओळख झाल्याने माझा रात्रीच्या जेवणाचा प्रश्न सुटला होता. आता यांत्रिक पद्धतीने मिळणाऱ्या पदार्थांचीही सवय झाली होती. त्यामुळे मी सकाळी त्या खाण्यावर भागवीत असे. पण रात्री मात्र काही झालं तरी हेल्गाच्याच हॉटेलमध्ये जायचं असं मी ठरवून टाकलं होतं. रोज ती मला पाव–मऊ पाव–देत होती आणि पदार्थांत घालण्यासाठी ठेवलेलं लोणी त्याला चोपडत होती. दोघींची ओळख अकृत्रिमपणे वाढत होती.

मी आठ दहा दिवस म्युनिचमध्ये होते. तिथली पाहण्यासारखी सर्व ठिकाणं मी पाहिली. भव्य इमारती बघितल्या. ग्रामोफोन रेकॉर्ड तयार करणारा अवाढव्य कारखाना बघून फारच समाधान वाटलं. त्याचबरोबर भारतीय जीवनाची ओळख जर्मन लोकांना करून देण्यासाठी काढलेल्या माहितीपटांच्या फिल्मसही मला एका लायब्ररीमध्ये दाखवल्या गेल्या. पण त्यात भारतीय जीवनाचं–सर्वसामान्य जीवनाचं दर्शन मात्र फारच थोड्या प्रमाणात होतं. पण हा दोष भारतातून पाठवल्या जाणाऱ्या या चित्रपटांचा होता.

म्यूनिचला मी इतर बऱ्याच गोष्टी पाहिल्या तरी तिथला बाजार बघितला नव्हता म्हणून तो बघायचं ठरवलं. जर्मनी सोडण्याच्या दिवशी सकाळी म्यूनिचचा बाजार पाहावा म्हणून बाहेर पडले. एका कॅमेऱ्याच्या दुकानात काही कॅमेरे स्वस्त किंमती लावून ठेवलेले दिसले. म्हटलं, बघावा एखादा! खूपच स्वस्त मिळाला तर घेता येईल.

मी दुकानात शिरले तर हेल्गा कुणाला तरी एका कॅमेऱ्याची माहिती समजावून सांगत होती. तिथं तिला पाहून मी इतकी आश्चर्यचकित झाले की, एकदम माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले, 'अग, तूं इथं कशी?'

पण माझं वाक्य पूर्ण होण्याआधीच तिनं मला तोंडावर बोट ठेवून चूप बसायची खूण केली. मला साधारण अंदाज आलाच की, हेल्गा सकाळी एका

आणि दुपारी एक अशा दोन नोकऱ्या करीत असावी. मी अगदी गप्प बसले तिच्या इशाऱ्याप्रमाणं. पण ‘ चिडीचूप ’ ही गप्प बसण्याची खूण वय, देश, भाषा यांच्या मर्यादा जाणीत नाही हे पाहून मला फार गंमत वाटली.

तिचं ते गिऱ्हाईक कॅमेरा विकत घेऊन गेल्यानंतर, मालक बसला होता तिथून दूरच्या कोपऱ्यात कॅमेरा दाखवण्याच्या मिषानं ती मला घेऊन गेली आणि म्हणाली, ‘ अग माझं कुटुंब फार मोठं आहे. घरी माझी म्हातारी आई आणि आत्या आहे. काकू आहे. लहान दोन बहिणी आहेत आणि सगळ्यात लहान भाऊ दहा वर्षांचा आहे. त्याचं शिक्षण व्हायचं आहे. गेल्या युद्धात माझे वडील, काका, मोठा भाऊ-सगळीच आम्हांला अंतरली. आता जवळजवळ सगळा बायकांचाच कारभार आहे पुष्कळशा कुटुंबांत. असं असताना मला फक्त एकाच वेळची नोकरी करून कसं भागेल ? पैसे तर मिळवायलाच हवेत पुरेसे. म्हणून मी सकाळी नऊ ते दोनपर्यंत इथं काम करते आणि संध्याकाळी चार ते बारा हॉटेलात काम करते. पण माझ्या या मालकाला ते कळू नये म्हणून मी तुला गप्प राहण्याची खूण केली. ’

आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्यासाठी इतके अविश्रांत श्रम करणाऱ्या या जर्मन मुलीचं—हेल्गाचं मला मोठं कौतुक वाटलं ! कॅमेऱ्याची सर्व माहिती करून घेऊन, शिकून तिनं या दुकानात नोकरी धरली होती. आणि ही बुद्धिप्रधान नोकरी करीत असताना हॉटेलच्या परिचारिकेचं काम कसं करू हा प्रश्नही तिच्या मनात कधी आला नाही. दोन्ही कामं ती सारख्याच हौसेनं आणि तत्परतेनं करीत होती. माझ्यासारख्या परदेशीय व्यक्तीला आपलंसं करून घेत होती.

मला बारा वाजता म्यूनिचहून जिनीव्हाला जायला निघायचं होतं. अजून हेल्गाशी थोड्या तरी गप्पा माराव्या असा मोह होत होता; पण परत जायची वेळ होत आल्यानं मी तिचा निरोप घ्यायला लागले. ती म्हणाली, ‘ आणखी किती दिवस राहणार आहेस ? ’

मी म्हटलं, ‘ किती दिवस कुठली ? आत्ता दुपारी जाणार. ’ मीं एवढं म्हटल्याबरोबर तिच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं आणि ती आर्जवून म्हणाली, ‘ असं काय ग ? राहा ना आणखी एक दोन दिवस. आज मी इथून लौकर सुटणार होते. आणि म्हणून आज मी तुला काहीतरी छानछान शाकाहारी

खायला करून घालायचं ठरवलं होतं. तुला आमच्या पद्धतीचे पदार्थ फारसे आवडलेले दिसले नाहीत. फारच कमी जेवलीस तू इतके दिवस.'

मला काय बोलावं तेच समजेना. आठदहा दिवसापूर्वीपर्यंत हेल्गा आणि मी, आम्हांला दोघींना एकमेकींच्या अस्तित्वाचीही जाणीव नव्हती. आणि आज तीच हेल्गा मी कमी जेवले म्हणून मला आवडतील असे पदार्थ करून घालण्याचं ठरवीत होती. मला आग्रह करीत होती. मी जाणार म्हणून तिला वाईट वाटत होतं.

पण मला राहणंही शक्य नव्हतं. त्यामुळं तिला डोळे भरून पाहात, पाणावलेल्या डोळ्यांसमोर अस्पष्ट दिसणारी तिची मूर्ती ठसवून घेत, भाराव-लेल्या अंतःकरणानं मी हेल्गाचा निरोप घेतला. त्यानंतर जिनीव्हाला जाण्यासाठी विमानात बसल्यावर मला काही सुचेना. विमान जसजसं दूर जायला लागलं तसतसं काहीतरी हरवल्यासारखं वाटत होतं. हेल्गाचा सहवास मिळाला नाही. मी तिला दुरावले ही भावना बेचैन करीत होती. तोंडावर बोट ठेवून मला गप्प करणारी तिची मूर्ती डोळ्यांसमोरून हालत नव्हती.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८७० दि: २.५.९१२१
क्रमांक ३५९ नों० दि: ९५/२/८९



# ८.

स्वित्झर्लंडला जायला मी फारच उत्सुक होते. अजून काही मी काश्मीर पाहिलेलं नाही. पण काश्मीर म्हणजे काय ते त्याच्या वर्णनावरून मी डोळ्यांसमोर आणलं आहे. त्याचा आनंद कल्पनेत का होईना, पण घेतला आहे.

काश्मीर हे भारताचं नंदनवन, तर स्विझर्लंड हे जगाचं नंदनवन. दिल्लीच्या लाल किल्ल्यांतल्या दिवाण-ई-खास मध्ये शिरलं की 'पृथ्वीवर स्वर्ग जर कुठे असेल तर तो इथेच' या घोषणेचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. स्वित्झर्लंडमध्ये गेल्यावर पृथ्वीवरचं नंदनवन ते हेच, हेच, हेच! अशी अनुभूती येणार ही कल्पना मी मनाशी बाळगली होती. आणि स्वित्झर्लंडने माझी निराशा केली नाही.

मी जिनीव्हाच्या विमानतळावर उतरताच हवेत चांगलाच गारठा जाणवू लागला. जिनीव्हा म्हणजे तळं आणि डोंगर यांच्यामध्ये वसलेलं गाव. थंडगार वारा अंगाला झोंबत होता. आणि मी विचार करीत होते की कोणत्या घरी

माझा मुक्काम पडणार आहे ? कारण स्वित्झर्लंडमध्ये बहुतेक सर्वजण फ्रेंच-शिवाय दुसरी कुठलीच भाषा बोलत नाहीत; इंग्लिश बोलणारे क्वचितच, असं मी ऐकलं होतं. तेव्हा अशा थोड्याशा काळजीतच मी माझ्यासाठी योजलेल्या घराचा पत्ता टूरिस्ट एजंटकडून घेतला आणि टॅक्सीमध्ये सामान घातलं. टॅक्सीड्रायव्हरने मला नेमकं त्या घरासमोर आणून थांबवलं.

घर होतं लहानसं दोनमजली. पण चहूकडे सुंदर बाग फुलली होती. सकाळची वेळ असल्याने कोवळं ऊन्ह पडलं होतं. घरावरचं उतरतं 'मंगलोरी' कौलांचं खापं चमकत होतं. सगळं कसं प्रसन्न होतं. मी टॅक्सीतून उतरले आणि माझं स्वागत करायला घरमालक पुढे आले. साधारणपणे पन्नाशीच्या पुढचा असेल हा गृहस्थ. अंगाने स्थूल पण चटपटीत. त्याने 'वेलकम्' म्हणून माझं स्वागत केलं आणि 'वेटी' म्हणून हाक मारली. मला क्षणभर खुळ्यासारखं वाटलं, की मी एखाद्या हिंदी बोलणाऱ्या गृहस्थाच्या घरात आले की काय ? आणि 'वेटी' म्हणून त्याने मलाच म्हटलं की काय ? पण त्याच्या हाकेसरशी एक १७, १८ वर्षांची मुलगी धावत आली, सरळ तिने माझ्या हातातली माझी बॅग काढून घेतली, आणि म्हणाली, 'पपा, मी यांना माझ्या शेजारच्या खोलीत घेऊन जाते हं !'

आणि पपांच्या वेटीबरोबर मी त्या घरातल्या दुसऱ्या मजल्यावरच्या एका खोलीत गेले. वेटी सारखी काहीतरी बोलत होती. मधूनच तुटपुंजं मोडकं तोडकं इंग्रजी आणि बाकी बहुतेक फ्रेंच. ती आपल्या घराचं, पपांचं, एक भारतीय आपल्या घरी येणार असल्याबद्दल तिला वाटलेल्या उत्सुकतेचं वर्णन करीत होती. मला सगळं समजत नव्हतं. कारण तिचे विचित्र फ्रेंच उच्चार आणि विलक्षण भरभर बोलणं. पण फ्रेंच लोकांच्या सवयीप्रमाणे शक्य तितके हावभाव आणि हातवारे ती करीत असल्यामुळे तिच्या म्हणण्याचा भावार्थ मला उमगत होता.

मी तिचं बोलणं ऐकत होतेही आणि नव्हतेही. खोलीत माझे कान जरी ते शब्द ऐकत होते तरी जाणिवेने टिपले जात नव्हते. कारण खोलीत गेल्या-बरोबर मी घराच्या मागच्या बाजूची खिडकी उघडून टाकली होती आणि माझी नजर समोर दिसणाऱ्या लख्ख व निळ्या आकाशाकडे, त्या पार्श्वभूमी-वर चितारलेल्या पर्वताकडे आणि वृक्षराजीकडे लागली होती. तो देखावा

पाहून माझं भान हरपलं होतं. खिडकीतून नजर फिरवावी असंच वाटेना. शेवटी वेटीलाही ते जाणवलं आणि ती माझ्याजवळ येऊन उभी राहिली. ती उभी राहिली हे मला समजलं पण ती हळूच मला त्या समाधीत तशीच रंगलेली सोडून केव्हा निघून गेली ते मात्र समजलं नाही.

आतापर्यंत मी प्रत्येक देशात जरी कुटुंबात राहिले, तरी जेवायला बाहेर जात असे. पण इथे मात्र जेवणासकट माझी सोय झाली होती. त्यामुळे तो प्रश्न मिटला होता. मी दुपारी जेवले आणि लगेच भटकायला बाहेर पडले.

जिनीव्हाला पाऊस मुळीच नव्हता. ऊन्ह पडलं होतं. सगळीकडे धुकंही पसरलं होतं. या दोन्हींचं मिश्रण मोठं गमतीदार वाटत होतं. अंगावर ओव्हरकोट घालून मी बाहेर पडले. फारतर दहा बारा पावलं गेले असेन आणि पायांत असे काही गोळे आले की पुढे चालता येईना. मी मटकन् खाली बसले. मला वाटलं माझे पाय शरीरापासून गळून पडत आहेत. तितक्यात बेटी धावत आली आणि तिने मला धरून घरात नेले. मला अचानक काय झालं तेच कळेना. पण वेटी म्हणाली, ‘ वाः ’ फार शहाणी आहेस. असे साधे मोजेबूट घालून जायचं होय बाहेर? अशा कोवळ्या उन्हात बर्फ वितळायला लागलं की, माणसांच्या अंगातली ऊब नाहीशी होते, माहीत आहे? नशीब की तुझे नाक गळून नाही पडले!’

मला ती काय म्हणते आहे, ते समजेना. हा स्विझर्लंडमधला थट्टेचा प्रकार असावा असं मी समजत होते आणि म्हणूनच मी म्हटलं, ‘ काय वेटी, अग थट्टासुद्धा निदान थोडीतरी खरी वाटण्यासारखी करावी!’

तेव्हा वेटी म्हणाली, ‘ छान, म्हणजे ही तू थट्टा का समजलीस? अग, खरंच अशी उदाहरणं घडली आहेत. आता जर तुला कधी असं सकाळच्या वेळीं बाहेर जायचं असेल तर कान झाकून आणि रुमाल बांधून जा. नाहीतर नाक कान गळून पडले की, मागून पश्चात्ताप करावा लागेल. ’

तिची ही थट्टा की खरं याबद्दल मनात शंका असूनही मी ते खरं धरून चालले. कारण ही भलत्याच बाबतीत विषाची परीक्षा कोण पाहणार!

जिनीव्हा म्हणजे लहान लहान सुट्या टेकड्या आणि त्यांवर बांधलेली घरं. गावात सगळ्याभर हिंडण्यासाठी बस गाड्या होत्या. पण मी मात्र पायीच हिंडणं पसंत केलं. कारण या निसर्गसुंदर शहरात, वृक्षराजी न्याहाळीत, डोंगर

चढण्याच्या आनंदाचा मला आस्वाद घ्यायचा होता. शिवाय वेटीने आधीच सावध केल्यामुळे माझे हातपाय शाबूत राहिले होते. म्हणून मी पायीच हिंडायला बाहेर पडले.

प्रथम जिनीव्हा लेक पाहायला गेले. सरोवराच्या काठी कितीतरी माणसं कोवळ्या उन्हाची मजा अनुभवीत होती. कुणी बसली होती, कुणी हिंडत होती. पुष्कळसे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आपापली पुस्तके घेऊन सरोवराच्या काठी अभ्यास करीत होत्या. विद्यार्थ्यांचा मला हेवा वाटला. कारण अशा तऱ्हेने अभ्यास करण्यांचं भाग्य मला कधीच मिळालं नव्हतं. पण त्याचबरोबर अशीही शंका आली की समोर सरोवराच्या शुभ्र जलाशयावरून नजर काढून ती पुस्तकातल्या अक्षरांवर स्थिरावणं यांना जमत असेल का ?

मी सरोवराच्या काठी हिंडत हिंडत अगदी एका पलीकडच्या एकाकी टोकापर्यंत गेले. तिथून दोन तीन पायऱ्या खाली उतरण्यासाठी केल्या होत्या. त्या पायऱ्या उतरून अगदी खालच्या पायरीवर मी जाऊन बसले. समोर स्वच्छ, शुभ्र जलाशय पसरला होता. पाणी केवळ कविकल्पनेतच नव्हे तर खरोखरीच अगदी स्फटिकाप्रमाणे शुभ्र दिसत होते. सरोवराच्या तळाशी असलेली बारीक, चकचकीत वाळू, दगडांच्या कपारी दिसत होत्या. बघता बघता मला एकदम डोळ्यांसमोर काहीतरी चमकल्याचा भास झाला. आणि मी एखाद्या शीशमहालाच्या उंबरठ्यावर तर बसले नाही अशी शंका आली. सरोवराच्या तळाशी पांढरे, काळे कितीतरी कातळ पसरले होते. त्या कातळांच्या कडांवर, कपारींवर सूर्याचं ऊन पडलं होतं आणि जवळ जवळ प्रत्येक कातळाभोवती इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांचा वेढा पडला होता. ऊन–पाऊस एकत्र झाल्यावर आकाशात क्वचित आणि क्षणभर दिसणारं इंद्रधनुष्य मी पाहिलं आहे. पण इथे असंख्य इंद्रधनुष्यं चमकत होती, आणि तीही सतत, नजर खेचून घेणारी. मध्येच क्वचित वाऱ्याची झुळूक आली की तेवढ्यापुरते ते रंग पाण्यावर सगळीकडे पसरत. पुन्हा त्यांचा कातळांभोवती वेढा पडे.

मी त्या अलौकिक दृश्याकडे पाहात शुद्धबुद्ध विसरून किती वेळ बसले असते कोण जाणे, पण तेवढ्यात सरोवराच्या दुसऱ्या टोकाला बरेचसे काळे पांढरे पक्षी उडताना दिसले आणि लहान लहान मुलांचा ओरडा ऐकू आला. म्हणून मी उत्सुकतेने तिकडे जायला निघाले. जवळ जाऊन पाहिलं, तर

सरोवराच्या एका कोपऱ्यात बरेच काळे पांढरे पक्षी पाण्यात पोहत होते. पाण्यात असताना त्यांचा बाकी आकार अगदी काळ्या पांढऱ्या हंसांसारखा दिसत होता. पण त्यांच्या चोची मात्र कबुतरांसारख्या होत्या. काही पक्ष्यांचा आकार कबुतरांसारखा आणि पाय मात्र बदकासारखे होते. विचित्रच होते हे पक्षी. पण त्यांचा आणखी एक फारच विचित्रपणा माझ्या नंतर नजरेस पडला.

नातू–आजोबांची एक जोडी या पक्ष्यांना पावाचे तुकडे टाकीत होती. तुकडा फेकलेला दिसला की हे पक्षी पाण्यातून वर येऊन तुकडा चोचीत घेऊन जात, पण त्यांना सरळ रेषेत उडता येत नसे. सगळे पक्षी एकदम पाण्यातून वर येत आणि एका वर्तुळाकार रेषेत उडत, ग्रहगोल ज्याप्रमाणे एखाद्या वर्तुळाकार कक्षेत फिरतात त्याप्रमाणे. त्यावेळीं त्यांच्या गतीच्या कक्षेत पावाचा तुकडा आला तर तो चोचीत त्यांना पकडता येत असे. नाहीतर पुन्हा सबंध वर्तुळ पुरं करून यावं लागे. तो छोटा मुलगा एकसारखे न थांबता तुकडे फेकीत होता आणि ते पक्षी वर्तुळाकार फिरत होते. आजपर्यंत मी कितीतरी पक्षी पाहिले आहेत; पण फारच विचित्र आकाराचे होते हे पक्षी आणि सरळ रेषेत उडता न आल्यामुळे वर्तुळाकार उडण्याची त्यांची ही पद्धतही मोठी विचित्र होती.

आता मी सरोवराच्या गावाकडच्या किनाऱ्यावर होते. तेव्हा परत पाण्याकडे न जाता मी गाव बघायचं ठरवलं. गावात कुठेही जायचं की, टेकडी चढूनच जायचं. तेव्हा मी समोर दिसली ती टेकडी चढायला सुरुवात केली. रस्ते फार छान होते. गर्दी मुळींच नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झाडं होती. सगळीकडे कसं शांत होतं. पण तरीही उदास नव्हतं. प्रसन्न होतं. उत्साहदायी होतं. त्यामुळे चढताना मुळींच थकल्यासारखं वाटलं नाही.

मी ज्या टेकडीच्या टोकाला चढून गेले तिथे एक चर्च होतं. ते चर्च आहे हे फक्त कळसावर लावलेल्या क्रॉसवरूनच ओळखता येत होतं. कारण त्याची इतर बांधणी अर्धी मशिदीसारखी तर अर्धी हिंदूंच्या देवळासारखी होती. खालच्या बाजूला मशिदीसारखे घुमट होते आणि वरती मंदिरासारखे कळस होते. लोखंडी गजांच्या फाटकावर मधोमध चकचकीत पितळीं सूर्यचंद्र बसवलेले होते. हे चर्च असं का बांधलं असावं याबद्दल मात्र मला कुणीच

काही सांगू शकलं नाही. त्यामुळेच ते पाहून या तीन संस्कृतींचं मिश्रण करण्याची बुद्धी कुणाला झाली असेल याबद्दल कुतूहल मात्र एकसारखं वाटत राहिलं.

जिनीव्हात बहुतेक सर्व लोक वाहनात बसून जाण्यापेक्षा पायीच जाणं जास्त पसंत करतात, त्यामुळे ठिकठिकाणी विश्रांती घेण्यासाठी बागा केल्या आहेत. हिंडता हिंडता दमलं तर एखाद्या बागेत हिरवळीवर थोडी विश्रांती घ्यावी की पुन्हा चालायला लागावं. मध्येच एखाद्या कॉफीच्या दुकानात जाऊन कॉफी घ्यावी, थोडी ऊन्न आणावी आणि पुन्हा डावा उजवा करीत पुढे जावं. जवळ जवळ दिवसभर मी अशी हिंडत होते; एका डोंगरावरून उतरून दुसऱ्या टेकडीवर चढत होते; पण दमत नव्हते. आणि या निसर्गाच्या सान्निध्यात, अगदी त्याच्या अंतरंगात शिरून हिंडताना मन प्रफुल्लित होत होतं.

मी दिवसभर भटकत होते. जिनीव्हाच्या दुकानांची एक वेगळीच तऱ्हा. दुकाने अगदी छोटी छोटी. कुठचंही दुकान फार भव्य नाही. पण त्याचं वैशिष्ट्य म्हणजे दुकान स्टेशनरीचं असो, छत्र्यांचं असो नाहीतर खाद्य-पदार्थांचं असो, प्रत्येक दुकानात दर्शनी दहापंधरा तरी घड्याळं ठेवलेली असत. अगदी मनगटावरच्या बारीक नाजुक घड्याळापासून ते प्रत्येक अर्ध्या तासाच्या ठोक्याला बाहेर तोंड काढून चोचीने ठोक्याचा आवाज काढणारी कोकिळा बसवलेल्या घड्याळापर्यंत सर्व तऱ्हेची घड्याळं बनवणं हाच त्यांचा मुख्य धंदा. बायका पुरुष सगळींजणं हे काम करतात. या घड्याळांसारखंच या लोकांचं वागणं ! कधी चाकोरीबाहेर नाही. अगदी शांत, सुरळीत, ठराविक टिक् टिक् शिवाय कसली गडबड नाही. गोंगाट नाही. घड्याळातली नाजुक यंत्रं बनवणाऱ्या या देशातल्या लोकांची मनं आणि वातावरण ही पण नाजुक आहेत. या मनाच्या नाजुकपणाचा मला त्या दिवशी संध्याकाळी प्रत्यय आला.

संध्याकाळी म्हणजे जरा उशीराच मी घरी आले. आल्याबरोबर कपडे वगैरे बदलून जेवणाच्या बोलावण्याची वाट पाहात खोलीत बसून राहिले. कारण या घरी जेवण तयार झालं की देवळातल्यासारखी एक मोठी घंटा वाजवण्याची पद्धत होती. वास्तविक घरात माणसं सारी पाचसहा. पण तोंडाने हाका मारून ओरडाआरडा करणं त्यांना पसंत नसे.

अगदी अरुंद होता. रुंद रस्ता करून निसर्गसौंदर्य नष्ट न करण्याची या बाबतींत खबरदारी घेतली होती.

गाडीने जिनीव्हाची लोकवस्ती सोडली आणि ती डोंगरांच्या कुशीत शिरली. मी खिडकीबाहेर पाहिलं. आता मी अगदी एका वेगळ्या जगात आले होते. एका अरुंद रस्त्यावरून झुक झुक करीत गाडी जात होती. एका बाजूने लहानमोठ्या टेकड्यांची रांग लागली होती. मध्येच या टेकड्यांमध्ये फट पडली की त्या फटीतून टेकड्यांच्या मागे उंच डोंगरांची रांग दिसत होती आणि त्या डोंगरावर आकाशाचं छत पसरलं होतं. टेकड्या लहान-मोठ्या होत्या. मधूनच एखाद्या ठिकाणी जरा सपाट टेकडी असे. तिच्या पायथ्याशी एखादं लहानसं घर, मध्येच एखादं देऊळ दृष्टीस पडे. एका बाजूला ही डोंगरांटेकड्यांची उंचसखल भिंत, तर दुसऱ्या बाजूला अथांग सरोवर पसरलेलं. डाव्या हाताला टेकड्यांवरची हिरवी झाडी आणि उजव्या हाताला सरोवराचं शुभ्र निळं पाणी. मधूनच अगदी सापसुरळीसारखी हलकेच पण संथपणे चालणारी गाडी. गाडीत हिसके बसत नव्हते. माणसांची दाटी नव्हती. कुठे गडबड, आवाज काहीच नव्हतं. मधूनच टेकडीवरच्या झाडांमधून एखादा पक्षी फडफड करीत उडे. त्याच्या पंखांचा आवाज येई तेवढीच हालचाल.

टेकड्यांना आणि सरोवराच्या काठाला गाडी इतकी लगटून चालली होती की मध्येच एक हात झाडाच्या फांद्यांवरून सरकत ठेवावा असं वाटे आणि कधी दुसरा हात सरोवराच्या पाण्यात बुडवून धरावा असं वाटे. निसर्ग-सौंदर्याच्या या दोन प्रतिकृतींपैकी कोणती बघावी आणि कोणतीवरून नजर बाजूला काढावी ते समजत नव्हतं.

मला वाटलं, माणसाला दोन डोळ्यांनी एकाच वेळी दोन परस्परविरोधी दिशांना पाहतां आलं असतं तर? एकीकडून दुसरीकडे असं सारखं आलटून पालटून पाहताना मध्यंतरी जे क्षण सुखाला आचवतात ते तरी तसे फुकट गेले नसते.

कारण फुकट घालवायला तिथे क्षण नव्हतेच हाती. किती पाहू, कसं पाहू, किती अनुभवू असं मला त्या वेळी झालं होतं. जे बघत होते ते

सौंदर्य कल्पनेपलीकडचं, जाणिवेपलीकडचं होतं. गाडी आपला मार्ग आक्रमीत होती आणि मी मात्र निश्चल बसून होते. दिसेल ते डोळ्यांत साठवून घेत होते.

गाडी लॉसान स्टेशनात शिरली. भराभर सगळे लोक खाली उतरले. मी मात्र आता उतरायलाच पाहिजे म्हणून नाइलाजाने खाली उतरले. स्टेशनच्या आसपास थोडी भटकले. तिथेच जेवले. मला गावात काहीच काम नव्हतं. पुन्हा त्याच मार्गाने तेच सुख अनुभवायचं होतं. म्हणून तासाभराने पुन्हा परतीच्या प्रवासाला निघाले.

मला वाटतं, कल्पांतापर्यंत मी अशा फेऱ्या मारीत राहिले असते तरी मला कंटाळा आला नसता. जे सौंदर्यपान मी करीत होते त्याने माझी तृष्णा भागली नसती.

पण निसर्गाच्या या सान्निध्याचा लाभ मला सतत मिळण्याचं भाग्य कुठलं ! दुसऱ्या दिवशी भारतात परत येण्यासाठी मला रोमला जायचं होतं आणि तिथून मी मुंबईला येऊन पुन्हा रोजच्या ठराविक चाकोरीच्या जीवनात गुंतून जाणार होते.

तरीही मुंबईहून निघाल्यापासूनचा एकेक दिवस माझ्या डोळ्यांसमोरून हालत नव्हता. मी ज्या ज्या देशात हिंडले, जे जे पाहिलं, ज्या ज्या सौंदर्यांचा आस्वाद घेतला, मनाला भारावून टाकणारे, विस्मयचकित करणारे आणि हेलावून टाकणारे जे जे अनुभव घेतले ते कधीही विस्मृतीच्या पडद्या-आड जाणार नाहीत. कोणत्याही क्षणी, तितक्याच तीव्रतेने मला हे सर्व आठवत राहील.

मुंबईला परत येताना हे सगळं मला आठवत होतं. रोमची भव्य देवालयं, व्हेनिसचा कालवा, फ्लॉरेन्सची फुलं, टेम्सचा किनारा, एफेल टॉवर, जिनीव्हा सरोवर, निसर्गाच्या कुशीत बसून केलेला छोट्या आगगाडीचा प्रवास, पावलिनीकाका, फिलोमिना, बेटीचे पपा, कॅनेडियन आजी, लिलिया, हेल्गा-सगळं सारखं माझ्या डोळ्यांसमोर दिसत होतं. ते प्रसंग पुन्हा साकार होत होते. ती माणसं पुन्हा सहवासात येत होती, हसत बोलत होती. मला दुसरं काहीच सुचत नव्हतं. मी स्वतःलाच स्वतःचे अनुभव सांगत होते. या सगळ्या दृश्यांमध्ये गुंफले गेलेले स्वर कानात घुमत होते. नकळत शब्दरूप घेत होते.

माझी स्मृतिचित्रं शब्दांचा आकार घेत होती आणि मनाला नकळतच संवेदना होत होती—

नेत्री साठविले
मना उमगले
चित्तात झंकारले
ते ओठी स्फुरले
स्मृतीत उरले
शब्दात साकारले



97202

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम........................ वि: ......................

क्रमांक ........................ नों. दि. ..............

REFBK-0014272

REFBK-0014272